[एक शोकपर्यवसायी नाटक.]

शूर रायबा
अथवा
पण शेवटीं डाव फसला !



लेखकः— हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर, बी. ए.

किंमत ६ आणे.

क्रूर रायबा

अथवा

पण शेवटीं डाव फसला !

Received 3 May 1907.
Register No 2/A of 1907/8

('महाराष्ट्र वाग्विलास' मासिकपुस्तकांत छापून निघालेलें)

शूर रायबा

अथवा

पण शेवटीं डाव फसला !

[एक शोकपर्यवसायी पंचांकीं नाटक.]

हें

फ्रेंच महाकवि व्हिक्तर ह्युगो यांच्या 'रूयीब्ला' ह्या नाटकाच्या आधारानें

हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर, बी. ए.,

"रा. ब. पर्वत्या" नाटकाचे कर्ते यांनीं लिहिलें.

"Heat not a furnace for your foe so hot
That it do singe yourself"

SHAKESPEARE.

मे १९०६.

मुंबई.

PRINTED AT THE "TATVA-VIVECHAKA PRESS"
BOMBAY.

THE ONLY HIGH CLASS SOCIETY -:-
-:- -:- -:- MONTHLY IN MARATHI.

महाराष्ट्र वाग्विलास

सचित्र मासिकपुस्तक.

या पुस्तकास कुशल व प्रसिद्ध लेखकांचें पूर्ण सहाय्य असून स्त्रीलेखकही यास सजवीत आहेत.

संपादक,
श्रीधर व्यंकटेश केतकर
व
बाळकृष्ण संतुराम गडकरी.

वर्षाची वर्गणी ट. ख. सह २ रु. ४ आ. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

संपादकः—महाराष्ट्र वाग्विलास,
गिरगांव—मुंबई.



युवराज श्री. फत्तेसिंगराव महाराज गायकवाड.

युवराज

श्री० फत्तेसिंगराव महाराज गायकवाड

संस्थान बडोदें,

यांची

सुधारणाप्रियता, उदारता, सरलता, व पाश्चिमात्य

विश्वविद्यालयांत संपादन केलेली विद्वत्ता

इत्यादि अनेक सद्गुण मनांत आणून

त्यांच्याच परवानगीनें हें पुस्तक

परमादरानें त्यांच्या सेवेशीं

अर्पण केलें

आहे.

ह. आ. ता.

पुस्तककर्ता.

प्रस्तावना.

गुणाः सर्वत्र पूज्यन्ते पितृवंशो निरर्थकः ।
वासुदेवं नमस्यन्ति वसुदेवं न ते जनाः ॥

* * * *

प्राकाश्यं स्वगुणोदयेन गुणिनो यास्यन्ति किं जन्मना ॥

" Men are equal all ;
" From virtue only true distinction springs,
" And not from birth : There are exalted spirits
" Who claim respect and honor from themselves
" And not their ancestors.

Voltaire.

इंग्लडांतील प्रसिद्ध कविशिरोमणि जो शेक्सपियर त्याच्याच तोडीचा, **व्हिक्टॉर ह्यूगो** नामक फ्रेंच कवि एकोणिसाव्या शतकांत होऊन गेला. त्याच्या कांहीं सर्वोत्कृष्ट नाटकांचा स्वाद मराठी वाचकांस मिळावा अशी जरी माझी फार दिवसांची इच्छा होती, तरी अशा प्रकारचें बिकट काम हातीं धरणें धाष्टर्याचें आहे असें वाटे. परंतु **मोलिएर**च्या प्रहसनावरून तयार केलेल्या माझ्या **रा. ब. पर्वत्या** नाटकासंबंधानें मला जें प्रोत्साहन मिळालें त्यावरून प्रस्तुत भाषांतर करण्याचा मी संकल्प केला. विलसन कालेजांत प्रिव्हीयस परिक्षेचा अभ्यास करित असतांना **व्हिक्टॉर ह्यूगो** ह्याचें **रूयीब्ला** नाटक मूळ फ्रेंच भाषेंत वाचण्याचा मला पहिल्यानें प्रसंग आला, नंतर गेल्या हिंवाळ्यांत ह्याच कवीच्या " हर्नानी " नाटकाच्या आधारानें, रा. हरि नारायण आपटे यांनीं रचलेल्या " जयध्वज " नाटकाचा प्रयोग महाराष्ट्र नाटक मंडळीनें केलेला, माझ्या पहाण्यांत आला, तेव्हां **रूयीब्ला** नाटकाचें मराठी रूपांतर लोकप्रिय होईल असें मला वाटलें. थोडक्याच दिवसांनीं पुढें प्रपंचांतील एक अत्यंत दुःखाचा प्रसंग मजवर आकस्मिक आला, त्यावेळीं चित्त अस्थिर झालें. त्याप्रसंगीं मनाला दुसरीकडे गूंतवून दुःखाचा विसर पाडावा ह्या इराद्यानें **रूयीब्ला** नाटकास मराठी पेहराव चढविण्याचें काम मी हातीं धरलें व लवकरच तें तडीस नेलें. ही कृति कांहीं मित्रमंडळीस वाचून दाखविल्यावर

त्यावरून सहज दिसून येईल कीं ज्यांत एकच रस प्रधान आहे अशा नाटकांत मानवी चरित्राचें खरें प्रतिबिंब दृष्टीस पडत नाहीं. फ्रेंच वाङ्मयांत यामुळें शेक्सपियरच्या तोडीचीं नाटकें मुळींच होत नसत. कवि व नाटककारांचे हें चुकलेलें धोरण सुधारून सर्व रसांचा ज्यांत समावेश झाला आहे अशा नाटकांची उणीव भरून काढण्याचें **व्हिक्टॉर ह्यूगोनें** मनावर घेतलें व लगेंच नवीन धर्तीवर नाटकें रचण्यास सुरवात केली. ह्या नव्या पंथास लोकांनीं "रोम्यान्टीक स्कूल" म्हणून नांव ठेविलें. ह्या प्रकारें वाङ्मयांत सुधारणा करणाऱ्या मंडळीचा जुन्या म्हणजे "क्लासीक स्कूल" बरोबर बराच लढा झाला. व ह्या नव्या पंथाचा पाडाव करण्याचे प्रयत्नहि पुष्कळ झाले. परंतु ह्यूगोच्या व त्याचप्रमाणें नाटकाभिलाषी लोकांच्याहि सुदैवानें ते सर्व निष्फळ झाले! **व्हिक्टॉर ह्यूगो** ह्याचें त्रोटक चरित्र ह्या सोबत दिलें आहे त्यावरून या विषयावरील फ्रेंच वाङ्मयासंबंधानें साधारण कल्पना वाचकांस होईल.

रूयीब्ला नाटकांत जरी शोकरस प्रधान आहे तरी देखील त्यांत हास्य, वीर, शृंगार वगैरे रस कवीनें मोठ्या चातुर्यानें गुंफले आहेत. ह्या नाटकाचा पहिला प्रयोग पारीस येथें इ. स. १८३८ त झाला. इंग्लंडदेशांतदेखील हें नाटक लोकप्रिय झालेलें दिसतें; कारण याची निरनिराळ्या लेखकांनीं इंग्रजींत भाषांतरें* केलीं आहेत. इ० स० १८७९ सालीं इंग्लंडांत त्याचा प्रथम प्रयोग "क्रिस्टल पॅलेस" येथें झाला.

मूळ ग्रंथांतील संविधानक स्पेन देशांतील सत्राव्या शतकांतील इतिहासांतून घेतलें असून त्यांत त्या काळच्या अनेक चमत्कारिक रीतिरिवाजांचें मार्मिकतेनें वर्णन केलें आहे. इकडील मराठी राजेरजवाड्यांतील मराठमोळा, सरदार, शिलेदार वगैरेचीं राजनीति, राजभक्ति, व कारस्थानें वगैरे गोष्टींत, व त्या वेळच्या स्पेनच्या स्थितींत साम्य दिसल्यावरून ह्या रूपांतरांत मराठी रियासतीचा प्रकार गुंफण्यांत आला आहे. माझा मूळ उद्देश **व्हिक्टॉर ह्यूगोच्या** कृतीची मराठी वाचकांस ओळख करून देण्याचा आहे, मराठेशाहींतलि समाजस्थितीचें चित्र रेखाटण्याचा नाहीं; **ह्यूगोच्या** कृतीचें प्रतिबिंब उठवित असतांना मराठी रीतरिवाजास न साजणारे असे

---

* Ruyblas, by W. Terris (Dicks.) Ruyblas, by Mrs. Crossland (Bohn.) Ruyblas, by Rourke (Lacy.) The love, the lugger, and the lackey, by Reece (Lacy.)

प्रसंग टाळतां येतील तेवढे टाळण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि कित्येक ठिकाणीं निरुपायास्तव ते राहून गेले असतील. द्वंद्वयुद्ध खेळण्याचा प्रसंग ह्यापैकींच एक आहे. पिराजीरावास रायबाबरोबर द्वंद्वयुद्ध–"ड्युयल"–लढण्यास लावणें थोडेबहुत चमकारीक वाटेल, परंतु हा प्रकार म्हातारचळ लागलेल्या व मेरेपर्यंत मोर्चेल, दिवटी व छत्रीची घमेंड मिरविणारे वेडे पीर, पिराजीराव ह्यांच्या वेडेपणाखालीं झांकून जाण्यासारखा आहे.

मूळ नाटकांत पांच अंक असून एकंदर २७ प्रवेश आहेत. परंतु त्यांत देखावे फक्त पांचच आहेत. मराठी बालमित्र ज्यांनीं वाचलें असेल त्यांस प्रवेश हा शब्द येथें कोणत्या अर्थी योजिला आहे हें लक्षांत येईल. एखादें पात्र रंगभूमी-वर आलें अथवा पडद्यांत गेलें तर फ्रेंच सांप्रदायाप्रमाणें प्रवेश बदलतो. आपल्या येथें प्रवेश व देखावा हे शब्द एकाच अर्थी योजितात. मूळ नाटकांत देखाव्यांतील वैचित्र्याच्या अभावामुळें प्रयोगदृष्ट्या अंक मनस्वी कंटाळवाणे भासतात. ही अडचण दूर करण्याच्या इराद्यानें व साधारण वाचणारास संविधा-नक सुलभ रीतीनें समजावें म्हणून कांहीं कांहीं ठिकाणीं नवीन प्रवेश घातले आहेत, व जेथें साधण्यासारखें होतें तेथें देखाव्यांत देखील फेरफार करण्यांत आले आहेत. नवीन प्रवेश घातले आहेत ते येणें प्रमाणें:–अंक १. प्र. १; अंक २, प्र० १; अंक. ३, प्र० ३; अंक. ५, प्र, १; प्र.२; प्र ३; मूळ नाटकांत अंक ३ प्रवेश १ मधील रायबाचें आत्मगत भाषण व अंक ४ प्रवेश २ मधील जयंताचें भाषण फारच लांबलचक आहे. त्यांच्या तोंडी असलेले काहीं विचार परदे-शीय असल्यामुळें ते दुर्बोध झाले असते म्हणून हीं दोन्हीं आत्मगत भाषणें थोडीं बहुत कमी करून त्यांत बराच फेरफार करावा लागला. म्लेंच्छांनीं मादरेस संजीवनीची उपमा दिली आहे असें जें म्हटलें आहे तें फ्रेंच भाषेंत मद्यास eau de vie हा शब्द योजण्यांत येतो त्यावरून होय. दुसऱ्या अंकांत गवळणीचें जें गीत देण्यांत आलें आहे तें एका इंग्रजी सोशीआलीस्टीक *गाण्याच्या आधारानें रचण्यांत

"Little drops of water added to the milk,
"Makes the milkman's daughter clothe herself in silk,
"Little grains of sand in the sugar mixed,
"Makes the grocery man soon become well fixed.
"Little acts of meanness little tricks of trade
"All these pass for keenness, fortunes thus are made.

आलें आहे. ह्यूगोनें परटीणीचें गीत दिलें आहे तें असावें तसें चटकदार वाटलें नाहीं म्हणून अजिबात गाळून टाकण्यांत आलें आहे.

दुष्ट सिधोजी यानें एखाद्या विषारी सापाप्रमाणें मनांत द्वेष धरून जो चक्रव्यूह रचिला तो शेवटीं ढांसळून त्याचा डाव कसा फसतो व तो स्वत:शेवटीं कसा प्राणास मुकतो ह्याबद्दल कोणासही वाईट वाटणार नाहीं. शेवटीं सिधोजीस जें प्रायश्चित मिळतें त्यावरून सुडासंबंधानें शेक्सपियरचे उद्गार जे नाटकाच्या मुखपृष्ठावर दिले आहेत त्याची सत्यता दिसून येईल.

जयंतासारख्या शूर, उदार, व गमती पात्रास चवथ्या अंकांत कैद केल्यावर त्याचा शेवट काय झाला ह्याचा कवीनें मुळींच उल्लेख केलेला नाहीं. ह्या दोषाबद्दल कांहीं लेखकांनीं ह्यूगोस नांवें ठेविलीं आहेत. ह्या चुकीची दुरुस्ती व्हावी ह्या इराद्यानें व जयंताचें उत्तरचरित्र चांगलें आहे हें दाखवितां यावें म्हणून, ५ व्या अंकांत प्रवेश १ व ३ हे मुद्दाम नवीनच घालण्यांत आले आहेत. व यांतच रायवास जें पत्र पाठविण्यांत आलें आहे, त्यांत जयंताचा पूर्व वृत्तांत रायवाच्या कानावर जाऊन सर्व गोष्टींचा खुलासा केला आहे. जयंत (Don Cæsar de Bazan) हें पात्र फ्रेंच लोकांस इतकें प्रिय झालें होतें कीं, त्याचें उत्तर चरित्र नाटकरूपानें दोघां फ्रेंच ग्रंथकारांनीं लिहिलें व त्याचे प्रयोग पहावयास झुंडीच्या झुंडी जात.

राणी मिनाबाई इचें तारुण्य, व तिची मानसिक स्थिति, त्याचप्रमाणें महाराजांनीं केलेली तिची हेळसांड, वगैरे गोष्टींकडे पाहतां, कोणासही तिची कींव आल्यावांचून राहणार नाहीं. अंक २ मध्यें तिच्या तोंडीं जें मराठमोळ्यासंबंधानें लहानसें भाषण दिलें आहे त्याचा व्हावा तसा उपयोग होईल अशी उमेद आहे.

ह्या नाटकांतील नायक जो रायबा त्याचें पूर्व चरित्र अंक २ प्रवेश १ मधील त्याच्या स्वगत भाषणावरून समजण्यासारखें आहे. मथळ्यावर दिलेल्या अवतरणां-तील उद्गारांची सत्यतां रायबाच्या चरित्रावरून समजण्यासारखी आहे. हुजऱ्याच्या पदावरून रायबा प्रतिनिधीच्या योग्यतेस चढतो ह्यावरून त्याची कर्तबगारी व हुषारी व्यक्त होण्यासारखी आहे. तो सिधोजीच्या कपट जाळांत सांपडतो याचें कारण त्याचें राणीवरील नि:सीम प्रेम हेंच होय. ह्या पात्रास प्रतिनिधीच्या पदवीस चढवून सिधोजीसारख्या नीच माणसाकडून त्याची पदोपदीं जी मानखंडणा करण्यांत आली आहे; त्याबद्दल ह्यूगोस बऱ्याच

लोकांनीं दोष दिला आहे. इतक्या उच्च पदास चढला असतां सिधो-जीच्या कचाट्यांतून सुटणें व राणीचें रक्षण करणें रायबासारख्या वीर पुरुषास मुळींच कठीण नव्हतें. त्यानें हुजऱ्या असतांना आपल्या यजमानास लिहून दिलेल्या चिटकोऱ्यास भिण्याचेंही प्रयोजन नव्हतें. परंतु आपल्या धन्यास दगा देण्यासारखें पातक अंक ३, प्रवेश ४, यांत त्याच्या हातून कवीनें जर घडविलें असतें तर ५ व्या अंकांत खेळास जो रंग आला आहे तो आलाच नसता! पारीस शहरांत जेव्हां रंगभूमीवर हा खेळ आला तेव्हां रायबाचा (Ruyblas) मानभंग करण्याचा प्रसंग जेव्हां जेव्हां येई त्या वेळेस प्रेक्षक अगदीं खवळून जात व नाटक गृहांत ' अरे मूर्खा, ठोक त्या थेरड्यास पहातोस काय? नको त्याचें तें हलकट काम ऐकूं' असे शब्द ऐकूं येत व हा प्रकार दर वेळेस जेव्हां जेव्हां रुयीब्ला नाटकाचा प्रयोग होई तेव्हां तेव्हां घडून येत असे. रायबा ह्या पात्रांत कवीनें निष्कलंक प्रेम व खरी स्वामिभक्ति यांच्या लढालढीचें दिग्दर्शन केलें आहे. राणीच्या अब्रूस धोका येऊं नये म्हणून स्वतःचें प्रेम एकीकडेस ठेवून राणीचें बरें व्हावें व महाराजांवर तिचें प्रेम बसावें म्हणून तो शेवटीं स्वतःच्या प्राणाची आहुती देखील देण्यास सिद्ध होतो. ह्या गोष्टीवरून ऐन कसोटीच्या वेळीं त्यानें दाखविलेलें धैर्य व मनाची थोरवी व्यक्त होते व

हिरा ठेवितां ऐरणीं वाचे मारीतां जो घणीं।
तोची मोल पावे खरा करणीचा होय चुरा॥


ह्या तुकोबाच्या उक्तीचें स्मरण होतें!

फ्रेंच नाटकांतील रंग हुबेहुब मराठींत उतरविण्याचें काम कितपत साधलें आहे हें येथें सांगतां येणें अशक्य होय. रंगपट्टीच्या खोलींत बसून बरेच परिश्रम करून नटानें कितीही जरी बेमालूम "मेकअप्" केलें तरी प्रेक्षकांत जे मार्मिक आहेत ते कदापि फसत नाहींत; व हें सोंग आहे म्हणून तात्काळ ओळखतात. त्याप्रमाणें **व्हिक्टॉर ह्यूगो**च्या फ्रेंच नाटकास महाराष्ट्र वेश चढवितांना दोष राहिले असतील हें सांगणें नलगे; परंतु ते नजरेस आणल्यास दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं काढून टाकण्यांत येतील.

सदरहु नाटक तयार करीत असतां माझे मित्र रा. गोविंद मल्लीनाथ ठेंगे बी. ए., रा. लक्ष्मण विनायक परळकर बी. ए., एलल्बी, व रा. श्रीधर व्यंकटेश केतकर, यांनीं मला अनेक प्रकारें मदत केली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ह्या नाटकांत दिलेलें गवळणींचें गीत रा. दामोदरपंत चिपळूणकर यानीं तयार करून दिलें त्याबद्दल त्यांचे आभार मानितों.

मालाड, उंबरले
भाऊ रसूलचा बाग
ता. २ मे. १९०६

ह. आ. तालचेरकर.



फ्रेंच महाकवि व्हिक्टॉर ह्युगो.

व्हिक्टॉर ह्यूगो.

व्हिक्टॉर मारी कान्त ह्यूगो याचा जन्म इ. स. १८०२ सालीं, बेझान्साँ येथें झाला. याचें घराणें राजपक्षाकडील होतें तरी त्याच्या वडिलांचा प्रजासत्ताक मंडळीकडे विशेष ओढा होता. त्यानें नेपोलियन बोनापार्त याच्या हाताखालीं नोकरी पत्करली; व ह्या वीरपुरुषानें यूरोपांत जी धुमाकूळ उडवून दिली त्यांत मोठें नांव मिळविलें. व्हिक्टॉर हा आपल्या आईबापाचा तिसरा मुलगा. तो आपल्या आईचा फारच लाडका होता. त्याचें बालपण स्पेन देशांत गेलें. त्यावेळीं स्पेनचीं राज्यसूत्रें जोझेफ बोनापार्त याच्या हातीं होतीं. त्या सुमारास स्पेनदेशांत जी चकमक झाली त्याचें प्रतिबिंब कविच्या कोंवळ्या मनावर जें उठलें होतें त्याचा पुढें ह्यूगोनें आपल्या ग्रंथांत बराच उपयोग केला. फ्रान्स देशांतील "पॅसिआ कॉरदिए" ह्या विद्यालयांत त्याचा अभ्यास झाला. येथें असतांनाच त्यानें आपलें पहिलें काव्य रचिलें. व त्याबद्दल "ऑकादेमी" ह्या विद्वान् मंडळाकडून त्याची वाहवा झाली. त्याचें वय यावेळी अवघें १३ वर्षांचें होतें व त्याच्या अल्पवयाकडे पहातां त्यानें तें काव्य रचिलें हें त्या मंडळीस खरें वाटेना. **शातोब्रिआन्द** नामक फ्रेंच ग्रंथकारानें ह्यूगो हा मोठा कवि होईल म्हणून भाकित केलें होतें. मासिक पुस्तकांत लेख लिहिण्याचा व कविता करण्याचा क्रम लहान ह्यूगो यानें त्यावेळापासूनच ठेविला होता. त्याचें एक काव्य खुद्द अठराव्या लूयी राजास इतकें आवडलें कीं त्यानें त्यावर स्वतःच्या अक्षरानीं 'superb' म्हणजे अत्युत्तम म्हणून शेरा मारीला ! ही गोष्ट बाहेर समजतांच व्हिक्टॉर ह्यूगोची काव्यें वाचून "वेडाऊनी" जाण्याची बडेबडे उमराव लोकांत "फॉशन" निघाली ! ह्याप्रमाणें अल्पवयांत लौकिक मिळविल्यावर ह्यूगोनें आदेलफूशे ह्या तरुणी बरोबर लग्न केलें.

फ्रान्स देशांतील प्रसिद्ध नट **ताल्मा** याची व ह्यूगोची मैत्री जडली. ह्यानेंच प्रथम ह्यूगोजवळ जुन्या धर्तीवर रचलेल्या नाटकांसंबंधानें टीका करण्यास आरंभ केला. आंग्लकवि शेक्सपियर याजबरोबर ताडून पाहातां फ्रेंच नाटकें कशीं पुळपुळीत होतीं ह्याबद्दल त्यानें ह्यूगोची खात्री करून दिली. ही वस्तुस्थिती पूर्णपणें ध्यानांत आल्यावर "रोम्यान्टीक स्कूल" म्हणून नवा पंथ स्थापन करून रासीन,

कॉर्नेइ, व मोलिएर ह्या कवींचे अनुकरण करणाऱ्या, धोपटमार्गी "क्लासिकल स्कूल" बरोबर युद्ध करण्यास त्यानें कंबर बांधिली.

युरोप खंडात प्रथम ग्रीस देशांत नाट्यकला ऊर्जित दशेस आली. ग्रीक साहित्यांत नाटकांविषयीं अनेक नियम आहेत. त्यांत स्थल, काल, व संविधानक (action) हें प्रत्येक नाटकांत एकच असलें पाहिजे असा नियम आहे. ह्या एकत्वाच्या (unities) नियमांमुळें नाटककारांचे हातपाय बांधल्यासारखे असत. इंग्लंड देशांत इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत ह्या एकत्वाच्या नियमामुळें बेनजान्सन व शेक्सपियर ह्या दोघां प्रधान नाटककारांचे दोन पक्ष झाले होते. शेक्सपियरनें आपल्या नाटकांत हे नियम झुगारून दिले, व पुढें जरी मिल्टनसारख्या कवीनें ह्या नियमास थारा दिला तथापि शेक्सपियरच्या बुद्धीकौशल्यानें इंग्रजी नाटकें एकत्वाच्या नियमाच्या कचाट्यांतून सुटलीं असें म्हटल्यास हरकत नाहीं. व्हिक्टॉर ह्यूगोच्या वेळेपर्यंत हा नियम फ्रेंच वाङ्मयांत पाळण्यांत येत असे. त्याच्या वेळीं राजकीय स्वातंत्र्याच्या आरोळीनें फ्रान्सदेश गजबजून गेला होता व वाङ्मयासंबंधानें असलेल्या शृंखला तोडून त्यास मुक्त करण्यास ह्यूगो पुढें सरसावला. त्याच्या पक्षास "सेनाक्ल" म्हणून नांव मिळालें. ह्यानें जुन्या पद्धतीस झुगारून देऊन इ. स. १८२४ त "क्रॉमवेल" व १८२९ सालीं "हर्नानी" हीं नाटकें रचिलीं. त्यानें आणखी एक "मारीऑन द लार्म" नामक नाटक लिहिलें परंतु ह्या नाटकास राजानें बहिष्कार घातला व ह्यूगोचें मन दुखाविलें व ह्याबद्दल मोबदला म्हणून त्यास ४००० फ्रॉंक्‌ची नेमणूक करून दिली. ह्यूगो ह्याप्रमाणें संभावना करून घेण्यास मुळींच खुषी नव्हता. त्यानें नेमणुकीचा धिःकार करून ती उघडपणें नाकारीली, व राजाच्या मर्जीची मुळींच परवा केली नाहीं! ज्यावेळीं "हर्नानी" हें नाटक रंगभूमिवर पहिल्या प्रथम आणिलें त्या वेळेस सर्व पारीस शहर अगदीं हालून गेलें! रोमान्टीक व क्लासीक ह्या दोन पक्षांचा तो एक झगडाच म्हटला पाहिजे! जुन्या पंथाच्या मंडळीनें ह्यूगोचा पराभव करण्यासाठीं आपलेकडून पराकाष्ठा केली! नाटकाचा प्रयोग करण्याच्या कामीं यश मिळावें म्हणून नाटककार किंवा कंपनीचे मॅनेजर पगारी टाळ्या देणारांचा उपयोग करीत असत. यांस क्लाक् (claque) ही संज्ञा असे. ह्यांचें काम योग्यवेळीं टाळ्यांचा गजर करून नटाची किंवा नाटकाची वाहवा करण्याचें असें. ह्या

पगारी टाळ्या देणाऱ्यांस सामील करून घेऊन, ह्यूगोचे प्रतिपक्षी हर्नानी नाटकाच्या प्रयोगाच्या दिवशीं त्यास तोंडघशी पाडण्याच्या बेतांत होते. परंतु ह्यूगो त्यांच्या माथ्याचा मिळाला असेंच म्हटलें पाहिजे. त्यानें कॉलेजांतील तरूण विद्यार्थी व इतर होतकरू लोकांस गांठून त्यांस आपल्या मदतीस बोलाविलें. त्यांस फुकट पास देण्यांत आले, व खेळास आरंभ होण्याच्या पूर्वी पांच सहा तास पीटमध्यें बसविण्यांत आलें. तेथेंच त्यांची फराळाची व्यवस्था ठेविली होती. ह्याप्रमाणें नाटकगृहांत आधींच बंदोबस्त करून ठेविला होता! रात्रीं जेव्हां क्लासीकपंथी शत्रुकडील टोळी आली तेव्हां पीट चिकार पाहून ते थक्क झाले! रात्रीं प्रयोग चालू असतां नाटकाचा रंगभंग करण्याचा प्रयत्न करण्यांत आला, परंतु विद्यार्थी मंडळीनें टाळ्या वाजवून एकच गोंधळ उडवून दिला. त्यानें शत्रू हरले! त्यांचे कांहींएक चाललें नाहीं. हर्नानी नाटक इतकें चांगलें वठलें कीं, पहिल्याच प्रयोगाच्या दिवशीं ६००० फ्रांक् देऊन एका ग्रंथप्रकाशकानें तें विकत घेतलें. एखादेवेळीं आपणांस जास्त पैसे द्यावे लागतील म्हणून त्यानें शेवटचा पडदा पडेपर्यंत वाट पाहीलीच नाहीं! ह्या नाटकाचे एकसारखे ४४ प्रयोग झाले, तरी देखील रोमान्टीक व क्लासीक पक्षाचे दंगे अगदीं बंद पडले नाहींत. शेवटीं शत्रुकडील वर्तमानपत्रकार, ग्रंथकार वगैरेनीं हात टेंकले व दिवसेंदिवस हें बंड कमी होत जाऊन कांहीं वर्षांनीं तें अजिबात नाहींसें झालें असें म्हटलें असतां चालेल. कारण ह्या नवीन धर्तीवर केलेल्या नाटकांचा पुढें जेव्हां प्रयोग झाला तेव्हां दंगेधोपे मुळींच दृष्टीस पडले नाहींत. इ० स० १८३८ त त्यानें आपला **रुयीब्ला** हा खेळ रंगभूमीवर आणला. त्या वेळेस शत्रुकडील झुंडीच्या झुंडी तो खेळ पहावयास गेले व प्रयोग पाहून अगदीं दंग होऊन गेले!

इ० स० १८४१ त ह्यूगोस ‘आकादेमी’ चा सभासद नेमण्यांत आलें रोमान्टिक मंडळीचा पुढारी म्हणून ह्या विद्वन् मंडळानें त्यास चार वेळा झुगारून दिलें होतें, येवढ्या गोष्टीवरून सदरहु मानाच्या महत्वासंबंधानें कल्पना करितां येणें शक्य आहे! नाटककार व कवि या नात्यानें त्यानें खूब कीर्ती मिळविली इतकेंच नव्हे, तर एकोणिसाव्या शतकांतील उत्तम कादंबरीकार म्हणून देखील त्याची ख्याति आहे. ह्यूगोच्या सर्वांत उत्तम अशा कादंबऱ्या म्हटल्या म्हणजे ‘ले मिझेराब्ल’ व ‘नोत्र् दाम द् पारी’ ह्या होत. इ० स० १८४५ त लूयी फीलीफ ह्यानें त्यास लार्डच्या

योग्यतेचा मान दिला. ह्यूगो हा देहांत शिक्षेच्या अगदीं विरुद्ध होता. इ. स. १८५१ सालीं फ्रान्स देशांत जी राज्यक्रान्ति झाली त्या वेळीं ह्यूगो यास हद्दपार करण्यांत आलें. ह्याप्रमाणें स्वदेश सोडल्यावर त्यानें कांहीं काळ बेलज्यम येथें घालविला. तेथून तो गरन्सी येथें येऊन राहिला. ह्या ठिकाणीं १९ वर्षे त्याचा मुक्काम होता. मध्यंतरीं एक दोन वेळां लुयी नेपोलीयन यांनें माफी देण्याचें फर्मावून फ्रान्स देशांत येण्याविषयीं त्यांस सुचविलें, परंतु त्यानें त्याची मुळींच दरकार केली नाहीं! इ. स. १८७० त जेव्हां लुयी नेपोलीयनचा पाडाव झाला तेव्हांच त्यानें फ्रान्स देशांत पाय ठेविला! ह्यूगोस लहान मुलांची फारच आवड असे. त्याचा "ल् फइदोतोन्"-शरदृतूंतील पालवी, व "लार्त देत्र ग्रॉंपेअर"—आजोबा कसें व्हावें?-ह्या दोन पुस्तकांवरून मुलांविषयीं त्याचें वेड किती जबरदस्त असे हें समजण्यासारखें आहे. हद्दपार असतांना त्यानें अनेक ग्रंथ लिहिले. मागसलेल्या मजूर वर्गाचा तो मोठा कनवाळू होता. त्यानें आपल्या ग्रंथांत त्यांच्या स्थितीचें अगदीं हुबेहुब चित्र रेखाटलें आहे. त्यास चित्रकलेचें चांगलें ज्ञान असे. मरेपर्यंत त्याच्या अंगीं स्वदेशाभिमान क़ायम होता. ह्यूगोनें वृद्धापकाळीं "स्की पिएसमॉं सॉं मॉर्त पूर ला पात्री"—स्वदेशासाठीं जे आपल्या प्राणाची आहुती देतात ते पुण्यवान प्राणी—ह्या अर्थाचें काव्य लिहिलें. तें सर्व फ्रान्स देशांचें जणूं काय 'वन्देमातरम्'च होऊन बसलें आहे! हद्दपार असतां बरेच लोक त्याच्या पाहुणचारांचा लाभ घेत असत. तो एकदां लिहिण्यास बसला म्हणजे भूक, तहान, झोंप वगैरे विसरून एकसारखा २४ कलाक देखील लिहित बसे. त्याचा मुलगाहि ग्रंथकार असून त्यास नाटकें लिहिण्याचा नाद असे. त्याची वडील मुलगी संगीतांत मोठी कुशल होती. तिच्या अकाली मृत्युमुळें ह्यूगोस मोठा धक्का बसला व तो खंगत चालला. त्यानें आपलें उरलेलें आयुष्य देशहित व परोपकार करण्याकडे व तरुण ग्रंथकारांस प्रोत्साहन देण्यांत घालविलें. फ्रेंच वाङ्मयांत आपल्या लेखणीनें चांगली भर घालून इ. स. १८८५ त मे महिन्याच्या बेवीसाव्या तारखेस त्यानें देह ठेविला. मरण समयीं त्याचे वय ८३ वर्षांचें होतें. त्याची प्रेतयात्रा मोठी संस्मरणीय झाली व फ्रान्स देशांतील बड्याबड्या लोकांचें "पान्थीअन्" नामक कबरस्थानांत त्यास पुरण्यांत आलें.

"To those who will read between the lines, Ruyblas is surely full of the noblest and most Christian teaching. We pity, it is true, the sorely tried and tempted, but we know as a fact in ethics—and therefore a truth to be upheld in Art—that retribution must follow wrong doing. And as Victor Hugo may be considered the greatest dramatist since Shakespeare, he knew well that his work must be a tragedy. But it is so supreme and perfectly moulded a work of Art because he has, in its proper place, brightened the drama with rich comedy. In this he resembles our own great poet. The wonderful manner in which the character of DonCæsar is sustained and revealed through dialogues flashing with wit, and incidents only to have been conceived by a real humorist—proclaims the master.........never let the moralist forget that in the end Ruy Blas is the conqueror-conquering even himself, and saving the poor outraged Queen. But the death penalty is inevitable, for Nemesis is never absent from the "personages" of Hugo's dramas.............. There is such a glow of eternal youth about Hugo's work,.............. The world is always young! somewhere always noble natures are aspiring, and young hearts beating with their first awakening to a master passion. To faithfully portray the struggles of the heart is one of the poet's missions, and surely in depicting in "Hernani" and "Ruy Blas," love and revenge, ambition and loyalty, remorse and despair, the noblest teaching is embodied—teaching that appeals to many natures more forcibly in the manner in which it is here presented than in a more solemn and didactic form.

I do not deny that here and there a daring thought may displease timid readers—but let them rather turn to those eternal truths which are the basis, the life and spirit of all religious creeds, and which shine illuminously in the poetry of Victor Hugo. Let us thank him for the jewels he gives us, and not bring a lens through which to search for the flaws! Ever is Victor Hugo the defender of the weak and oppressed, the scorner of selfishness and vice, the teacher of self sacrifice in the cause of duty, and the upholder of the dignity of woman."

— C. CROSLAND.

नाटकांतील पात्रें.

सिधोजीराव ... ... एक वृद्ध सरदार, व राजाचा मामा.

जयंतराव उर्फ "फकिऱ्या" ... सिधोजीचा कनिष्ठ बंधू व चोरांचा नाईक.

रायबा [नायक] ... ... सिधोजीचा हुजऱ्या, मोहनपुरच्या राज्याचा प्रतिनिधी, हिम्मत बहादुर इ.

पिराजीराव ... ... राजवाड्यांतील एक वृद्ध जामदार.

साद्या ... ... सिधोजीचा खिदमतगार.

रुपाजीराव,
सूर्याजीराव
कान्होजीराव
पदाजीराव
नेमाजीराव
मकाजीराव
परसोजीराव } ... ... सरदार, मानकरी, अंमलदार इ०.

राणी मिनाबाई—[नायिका] ... मोहनपुरची राणी

बयाबाई उर्फ आत्याबाई... ... राणीच्या तैनातींत असलेली एक वृद्ध स्त्री.

सुगंधी ... ... राणीची दासी.

हुजरे, शिपायी, चपराशी, दासी, पठाण-इ. इ.

स्थळः—मोहनपुर.

शूर रायबा

अथवा

पण शेवटीं डाव फसला!

अंक १

प्रवेश १ ला.

[**स्थळः**–राजवाड्यांतील एक खोली. दारांत सुगंधी दासी उभी असून विचार करित आहे.]

सुगंधी—(आपल्याशींच) साठीं बुद्धि नाठी ह्मणतात तें अगदीं खरं. काय ह्या थेरड्यास ह्मणावं तरी! अरे मीं तुझी नात शोभेन नात ! बरं झालं त्याच्या तडाक्यांतून सुटल्यें. माझं नशिब थोर. आमच्या बाईसाहेबांनीं माझं गाऱ्हाणं ऐकलं व महाराजांच्या कानावर सर्व गोष्टी घातल्या. नाहीं तर, त्या थेरड्या मामा साहेबांपुढें माझं काय चालतं? मी काय दीड दमडीची चाकुरडी. पण मेला लुब्रा मजपाशीं लाळ कस्सा घोटीत होता. आतां नाक कापलं कीं नाहीं. मेल्यानं मजबरोबर लगीन लावावं नाहीं तर चोविस तासांच्या आंत हद्दपार तरी व्हावं. असा, महाराजांनीं त्याला हुकुम केला आहे. अरे अरे मजसारख्या बटुकरीसाठीं मामासाहेबांवर हा प्रसंग यावाना? (आंत पाहून) पण आमच्या राणीसाहेब आहेतच तशा न्यायी व कनवाळू. आज राणीसाहेब कीनइ कशा कशा अगदीं सुस्त झोंपल्या आहेत. गरीब विचारी पोर. असली हजारांत मिळणार नाहीं. अशी सुंदर स्त्री आमच्या महाराजांस मिळाली तरी त्यांच्या वृत्तींत कोठें फरक पडला आहे? जर त्यांना आपला सर्व वेळ जंगलांत राहून शिकार करण्यांत किंवा त्या गोसावड्याच्या सेवेंत घालवायाचा होता, तर मग महाराजांनीं, व्यर्थ लगीन तरी कां केलं? आणि त्या पोरीचा गळा उगाच कां बरं गोवला?

आमच्या राणीसाहेब अगदीं प्रेमासाठीं भुकेल्या आहेत, पण तिकडे महाराजांच, कुठें लक्ष आहे ? परवां रात्रीं आपल्या बाळपणाच्या सुखाच्या दिवसाची आठवण करीत, बाईसाहेबांनीं रडून रडून अगदीं डोळे सुजविले. रडेल नाहीं तर काय करील विचारी ! छे, छे, आज पुरे सहा महिने झाले पण महाराजांची व त्यांची कशी ती भेट नाहीं. ह्या मेल्या मामासाहेबांनींच पोरीचा गळा कापला. आमच्या बाईसाहेब कितीतरी दयाळू व धर्मशील आहेत ह्मणून सांगू ? ह्या नगरींतील गोरगरिबांस त्यांनीं गुप्तपणें कितीतरी दानधर्म केला आहे, शिवाय दररोज मजपाशीं त्यांचीं यासंबंधानें विचारपुस एकसारखी चालूच आहे. त्या खाष्ट थेरडीस आमच्या ह्या गुप्त दानधर्माचें समजलें तर मात्र आमची येथून खास उचलबांगडी होणार ? कोण तरी हा मेला जाच. काल मला तर त्या थेरडीच्या नरडीचा घोंटच घेऊं कीं काय असें होऊन गेलं. आमच्या बाईसाहेबांनीं माहेरून आणलेल्या त्या मैनेचा गळा मुरगळून त्या थेरड्या आत्याबाईस काय मिळालं कोण जाणे? काय पण बाई हा चमत्कार तरी, इतका राजाची राणी असून देखील बापडीला सर्व गोष्टींची चोरी ! (कानोसा घेते) कोणाची वरं हीं हांक ? (" अग सुगंधी, सुगंधी, अग आहेस तरी कोठें ? " अशी हांक आंतून ऐकूं येते.) अहो बाईसाहेब आल्यें, आल्यें.

[जाते.

प्रवेश २ रा.

[**स्थळः**-राजवाड्यांतील एक दिवाणखाना. एके बाजूस टेबलावर लिहीण्याची सर्व सामुग्री तयार ठेविली आहे. वृद्ध सिधोजीराव लोडाशीं बसून अगदिं विचारांत मग्न झाले आहेत. दारापाशीं त्यांचा खिदमतगार साद्या; अदवीनें उभा आहे.]

सिधोजी—(आपल्याशींच) ही पहांटेची वेळ. थंडीचे दिवस, त्यामुळें वाडा पहा अजून कसा अगदीं सामसुम दिसत आहे. माझा सर्वस्वी नाश झाला हें अजून कोणासही माहित नाहीं. पण सूर्यास्त झाल्या बरोबर सर्व कांहीं बाहेर पडून आमचा अस्त झाला हें ह्या शहरभर होऊन जाईल. मग मला तोंड दाखविण्यास जागा उरणार नाहीं. अरेरे (मोठ्यानें) घात झाला, घात !

साद्या—(धन्या जवळ येऊन आश्चर्यानें) काय म्हंगता सरकार ? असं अक्षी काय झालीया. सांगा की बेगी बेगी.

सिधोजी—(उसासा टाकीत) अरेरे ! सर्व कांहीं आटोपलं! (कपाळावर हात मारतो.)

साद्या—काय म्हंगता; आटोपलं !

सिधोजी—मीं आज राजाचा मामा असून व ह्या राज्याचीं सर्व सूत्रें माझ्या हातांत असून, महाराजांची इतराजी होऊन मी पदभ्रष्ट झालों. आं? (दांत ओंठ खाऊन) आणि हें सर्व त्या हलकट सटवीमुळें बरं. अरेरे एखाद्या गगन चुंबित पर्वताच्या शिखरावर वीज पडून जसा त्याचा चुराडा व्हावा तसें झालें. देवा हाय ! हाय ! !

साद्या—(हात जोडून) सरकार हें काय म्हंगता. मर्त्नी तर कायबी उमगत न्हई पघा.

सिधोजी—शिव ! शिव ! (उसासा टाकितो.) अरेरे, त्या बटकीवर म्यां पापी नजरेनें कां पाहिलें बरें ? त्या फटाकड्या सुगंधीच्या वाटेस जाण्याची मला दुष्ट बुद्धी कां बरं झाली ? अरे मीं महाराजांचा मामा. आणखी मजकडून असं वर्तन कां बरं घडलं ? परंतु आपल्या चाकुरडीसाठीं राणीनें मजवर सूड का घ्यावा ? हीच का ती कृतज्ञता ? महाराजांचें पहिलें कुटुंब निवर्तल्यावर महाराजांचें डोकें फिरलें, तेव्हां विचार केला कीं एखादी राजवाड्यांतील, किंवा मोडके सरदार घराण्यांतील अज्ञानी पोर त्यांच्या गळ्यांत बांधण्या ऐवजीं, चांगली प्रौढ, वयांत आलेली, शिकलेली सवरलेली, गरीब कुटुंबांतील सुरेख मुलगी आणून महाराजांचें लग्न केलें म्हणजे तिजकडेस पाहातांच, पहिल्या राणी साहेबांचा त्यांना विसर तरी पडेल. तशांत गरीब घराण्यांतील पोरगी असली म्हणजे आपलं पूर्वींचें वर्चस्व कायम राहील. पण पहा, करायाला गेलों एक व झालें भलतेंच. ज्याचें भलें करावें तोच गळ्याशीं येतो. असें हें कलियुग आहे. एखाद्या थोर सरदारघराण्यांतील पोरगी आणली असती तर बरें झालें असतें. ही चाणाक्ष गोरीगोमटी पोर आपली डाळ का शिजूं देणार आहे ? मी तिच्या सुगंधी दासीवर प्रेम केलें म्हणून तिनें मला असें शासन करावें काय ? आमच्या मराठे दरबारी मंडळीची अशीच चाल आहे. तशांत मीं महाराजांचा मामा. माझ्यासारख्या

कारस्थानी, महत्वाकांक्षी शिलेदारावर हा प्रसंग यावा हं! अरेरे, माझी संपत्ति, माझी सर्व वतनें यांचा नाश व्हावा आणि जगांतील सर्व माणसांनीं मजकडे पाहून हसावें ना? बस पुरे आमचा दिवा मावळला—

साद्या—(आश्चर्यानें) मला तर कायबी उमगत न्हई सरकार—

सिधोजी—होय! उद्यां, उद्यां, तें सारें बाहेर पडेल. मग माझ्या फजितीस पारावार नाहीं. त्याच्या आधीं मला काळें केलेंच पाहिजे! (दांत ओंठ खाऊन जोरानें) पण ह्याचा वचपा काढीन तरच नांवाचा सिधोजीराव शिरके. साखरेच्या सुरीनें जर ह्या गोऱ्या गोमट्या राणीची मान कापणार नाहीं तर मीं मराठ्याचा बच्च्याच नव्हे.

साद्या—(हात जोडून) धनी साब असं झालीया तरी काय?

सिधोजी—(हात आपटून) अरे ती कालची कृतघ्न पोर. ती आपली नवी राणी!

साद्या—काय आपल्या नव्या राणी साहेब. अशी दयाळू सभाव—

सिधोजी—(रागानें) चूप रहा. त्या त्याच पोरीनें माझा गळा कापला. अरेरे, कृतघ्न, कृतघ्न (आपल्याशींच) हाय, हाय, मीं राजाच्या मामानें त्या बटकी बरोबर लग्न लावावें नाहीं तर चोवीस तासाच्या आंत हद्दपार व्हावें. मजसारख्याला महाराजांनीं असा हुकुम सोडावा! अरेरे! ही दुष्ट कामवासना मला कां झाली! माझी नात शोभेल अशा त्या सुगंधी दासी बरोबर मीं असें कां वर्तन केलें? धिःकार असो मजसारख्या कामी व विषयांध सरदारानां. पण मी कुलवान मराठा सरदार असून मजवर असा प्रसंग? बटकी बरोबर लग्न. छे, छे, नाहीं, नाहीं, हें प्राणांतीं देखील होऊं देणार नाहीं.

साद्या—मग धनी साब आपला काय इचार—

सिधोजी—विचार? अरे वस्स. हद्दपार मला हजार वाटेनें पत्करलें, परंतु ही मानहानी नको. (आपल्याशींच विचार करितो) होय राणी तरुण आहे. अल्लड पोरगी आहे. ह्या राणीच्या पदाला व मराठमोळ्याला ती कंटाळलेली आहे. तिला जर युक्तिप्रयुक्ति करून मीं वाईट मार्गास लावीन तर चांगलाच सूड उगवितां येईल. असल्या अल्लड पोरीस फसविणें फार विकट नाहीं. (विचार करितो) होय ठरला आमचा बेत. (मोठ्यानें) अरे साद्या, साद्या—

साद्या—जी सरकार—

सिधोजी—त्या भामट्या जयंताला निरोप दिलास कायरे?

साद्या—व्हय सरकार, आपला हुकूम अक्षी वजावला. अन् धाकले सरकार वाड्याच्या गेटावर आपली वाट पहात बसल्याती.

सिधोजी—(विचार केल्या सारखें करीत) काय ह्मटलेंस? वाट पाहतोय? हं हें पहा साद्या आज रात्रीं आपण कूच करणार. असे आंबेघांटावरून कोंकणांत उतरूं—काय ह्मणे ह्या कृतघ्न चाकळभवानी करितां ह्मणून मजवरती हा प्रसंग—(आठवल्यासारखें करून) अरें बरी आठवण झाली, माझा तो नवा हुजऱ्या रायबा कोठें आहे? माझ्या दोन दिवस नजरेस पडला नाहीं, ह्मणून विचारतो.

साद्या—धनीसाब हा हतच हायकी. (दाराजवळ जाऊन) अरं रायबा, रायबा धनीसाहेब बोलिवत्याती. ये बेगीन. (रायबा हुजऱ्याच्या पोषाखांत प्रवेश करितो व दारातूनच शिधोजीस मुजरा करितो. सिधोजी त्यास जवळ येण्यास हातानेंच खुणवितो.)

सिधोजी—अरे रायबा ये. पुढें ये. (आपल्याशींच) आतां आपण जें कपटजाल पसरणार त्यांत आपल्या नव्या हुजऱ्याचा आपण उपयोग करूं या. कारण, साद्या आपला जुना नोकर असून त्याची त्या जयंतावर मर्जी आहे खास. तर यास येथून घालवून दिलेले बरें. (मोठ्यानें) अरे साद्या आज तुला फार काम पडलें, माझ्या प्रवासाची तयारी करण्यास जा. हं चल. (साद्या मुजरा करून जातो.) रायबा, अरे होतास तरी कोठें?

रायबा—(अदबीनें) सरकार आपल्या वाड्यांत. आपलेंच तेथें येणें झालें नाहीं. व आज साधूजीनें इकडे बोलावलें ह्मणून सरकारांच्या पायापाशीं आलों. आपली काय आज्ञा आहे?

सिधोजी—त्या बारींतून पहा गेटापाशीं कोणीं उभें आहे काय?

रायबा—होय सरकार. डोकीवर घोंगडी पांघरून कोणी वाट पहात उभा आहे.

सिधोजी—आत्तांच्या आतां जा. व त्यास आपल्या ह्या मागल्या गुप्त

दारानें राजवाड्यांत घेऊन येथेंच ये. मीं वाट पहात आहे. लवकर जा बरं. नीट खबरदारी ठेव. आपल्या वाड्यांतील पठाण लोक चाहूल ऐकतील. त्यांचा पहारा आहे. संभाळ.

रायबा—आज्ञा महाराज. (मुजराकरून जातो.)

सिधोजी—मी ऐन संकटांत येण्यास आणि जयंताची ब्याद येथें येण्यास एकच गांठ पडली. त्याचं नांव साद्यानें सांगितल्या बरोबर आपली तर बुवा पांचावर धारण बसली. ह्या बेट्याचा कांटा कसा काढावा ह्याच विवंचनेंत मीं होतो. हा बेरड भिल्ल व रामोशी लोकांचा नाईक झाला आहे. व जेथें तेथें पुंडाई माजवून अगदीं हाहाःकार उडवून सोडला आहे. (विचार केल्यासारखें करून) परंतु हा कारटा सुंदर आहे. भरज्वानींत आहे. फक्कड आहे. चांगला देखणा आहे. होय, सहज मोह पाडील. आपला सूड उगविण्यास ठीक पडेल. (हांसतो) हा ! हा ! हा ! जयंताचा चांगलाच उपयोग करतां येईल (इतक्यांत दार खडबडल्याचा आवाज होतो.) होय, रायबा त्यास घेऊन आलाच वाटतें.

(रायबा जयंतास घेऊन येतो. जयंतानें डोकीवरून घोंगडीचा झगा पांघरला आहे कमेरस तरवार लटकाविली आहे व अंगात जुना सरदारी थाटाचा जरीचा पोषाख घातला आहे. आंत येतांच, आपला झगा पाठीमागें सारतो व रायबाकडेस पाहून चकित होतो, रायबा व जयंत एकमेकांस ओळखल्यासारखें दाखवितात.)

सिधोजी—(हळूंच आश्चर्यानें) हे दोघे एकमेकांस ओळखत तर नाहींत ना? मग या उभयतांनीं ऐकमेकांकडे असें कां बरें पाहिलें? (रायबास मोठ्यानें) अरे रायबा तूं बाहेर दारापाशीं अस. मला जरूर पडल्यास हांक मारीन (रायबा मुजरा करून निघून जातो) कसें काय ? (जयंताकडेस पाहून, हांसत हांसत) कसें काय पेंढारीराव आपण आलांत वाटतं!

जयंत—(तिरस्कारयुक्त मुद्रेनें व गालांतल्या गालांत हांसत) होय दादासाहेब. आपल्या भेटीसाठीं ह्मणून मुद्दाम आलों आहे.

सिधोजी—तुझ्या सारख्या लफंग्याला भेटायाला मला फार आनंद वाटतो.

जयंत—होय तसें वाटणें साहाजिकच आहे. कारण आपण माझे वडील बंधु पडलांत व माझ्या मालमिळकतीवर ढेंकर देऊन आज आपण हें वैभव उपभोगीत आहांत, याचें आपणांस स्मरण होऊन आनंद वाटणें अगदीं बरोबर आहे.

सिधोजी—(रागानें) अरे ए उडाणटप्पू भामट्या, जास्त कशासाठीं बोलतोस? तुझीं सर्व कारस्थानें माझ्या कानांवर आलीं आहेत.

जयंत—(वेडावून) व त्याबद्दल मला शाबासकी देण्याचा आपला मानस आहे असें आपलें तोंड सांगत आहे. आह्मीं दादासाहेबांचा कित्ता गिरवूं नये तर मग गिरवावा तरी कोणाचा?

सिधोजी—कायरे गेल्या दिपवाळींत त्या आमच्या हंबीररावाचें जवाहीर आपणच लांबविलेंत नव्हें काय?

जयंत—(हांसून) आपला तर्क अगदीं बरोबर आहे. कारण मजशिवाय त्यांचें जवाहीर हुडकून काढणारा दुसरा कोण वस्ताद आहे? पण ऐकलेंत काय दादासाहेब? त्या तुमच्या हंबिऱ्याला जवाहिरांचा उपयोग कोठें माहित होता? आह्मीं ते जवाहिर विचित्रपुरच्या सावकारांस विकून दुष्काळांत पिढून गेलेल्या व उपाशी मरणाऱ्या लोकांस मदत करून त्यांचे जीव तरी वांचविले व उरले तें आमच्या भुकेबंगाल रामोशीं व बेरड गड्यानां वाटून दिले. ह्या तुमच्या जयंतानें त्यापैकीं एका पैला सुद्धां स्पर्श केला नाहीं. पाहिजे ती शपथ घेऊन सांगतों—

सिधोजी—काल रात्रीं येथल्या कोतवालीवर दरोडा घातला ते तुझेच साथीदार नव्हे का?

जयंत—(मिशीवर हात फिरवून) ती आमचीच बहादुरी (हांसतो) बदमाष शिपुर्डे, कुत्रे, निवळ कुत्रे, आह्मांस पहातांच शेंपटी घालून पळणारे व आह्मीं नसतांना यंव करूं त्यंव करूं अशी फुशारकी मारणारे. नामर्द. त्यांची खोड आह्मीं चांगलीच जिरविली.

सिधोजी—अरेरे! तुझी एक एक कृति पाहून मला लाज वाटते. त्या खंडोबाच्या देवळांतील खजिना लुटून तुझ्या साथीदारांस काय मिळालें? असें अपवित्र काम करून हात विटाळणें तुला बरें दिसलें काय?

जयंत—(हांसतो) अहो ताळमेळ सोडून देऊन, देवळांतील गुरव व पुजाऱ्यांनीं व्यसनाधीन होऊन जे रंगढंग मांडिले आहेत त्याची आपणांस माहिती आहे काय? नाच तमाशे करून पैसा पाण्यासारखा खर्चून टाकण्या ऐवजीं देवळांतील खजिना आमच्या टोळीवाल्यांनीं लुटलेला हजार वाटेनें चांगला. ह्या गुलामांचे अनाचार, व अमंगल कृत्यें, दादासाहेब आपणांस सारी माहित असून मला विचारतां? माझ्या गड्यांनीं त्या पैशाचा फारच चांगला उपयोग केला. आपल्या पोटाची खळगी तरी भरली, समजलांत काय दादासाहेब?

सिधोजी—अरे तुझे लोक नीच, व हलकट आहेत. सोद्या मला तूं ठकवितोस?

जयंत—(मोठ्यानें हांसतो.) दादासाहेब, उगीच त्यांस नांवें ठेवूं नका. हेच माझे साथीदार, मोठ्या धर्मगुरूंपेक्षांही वस्ताद आहेत. (हांसतो) तुमचे शंकराचार्य त्यांच्यापुढें कांहींच नाहींत. ज्या नास्तिकांस ईश्वराचें स्मरण कदापिही होत नसेल, अशांस एका क्षणांत परमेश्वराचें नामस्मरण करण्यास लावतात. आणखी काय सांगूं—

सिधोजी—पुरे, पुरे, कर. मोंगलाईंत जाऊन जबर धुंडावा माजविला आहे, तो फकिऱ्या भिल्ल तुझ्याच टोळींतला नव्हे काय? त्यानें चार नबाबांची नाकें कापिलीं ह्मणून ऐकतों.

जयंत—(हसंत, हसंत.) होय दादासाहेब तें सारें कबूल करायाला मला लाज वाटत नाहीं. ज्यास फकिऱ्या ह्मणतात तोच हा पठ्या! (छातीवर हात मारतो व मिशीस पीळ देतो.) रामोशी व भिल्लांचा नाईक-व सरदार सिधोजी रावांचा बंधु (मुजरा करतो.) दादासाहेब, काय सागूं, आपल्या मराठेशाहींत जसे सरदार आपले पूर्वीचे शौर्य विसरून ढंगी, ख्याली व विषयासक्त झाले आहेत त्यापेक्षां हे मुसंडे अधिकच खीलंपट व उच्छृंखल! गांव गांवच्या वरील तरुण कोंवळ्या मुलीस फुसलावून दुराचारास लावणाऱ्या ह्या नबाबांचा म्यां सूड घेतला, ह्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. कायहो, दादासाहेब, मी आपल्या मराठे सरदारांस विषयांध ह्मटलें यांत आपल्याला कां बरें वाईट वाटलें व तोंड कां अगदीं फिक्क केलेंत?

सिधोजी—चूप, चूप! नामर्दा, लाज नाहीं वाटत तुला बोलायला? त्या वृद्ध पदाजीरावाचा पोषाख काढून घेऊन त्यास चोप देऊन तडफडत उघडा बोडका झाडास बांधून ठेवण्यांत मोठी तरवार गाजविलीस नाहीं? अरे बेरडा, सरदार घराण्यांतील त्या जखुड म्हाताऱ्यास हात दाखविण्यापेक्षां भागूबाई कां नाहीं झालास?

जयंत—एकून दादासाहेब, (हांसून) मी जे गूण उधळले ते सर्व आपणांस माहीत आहेत! त्या थेरड्या पदाजीस चोप देणारा मीच (अंगावरील घोंगडीचा झगा एके बाजूस करून,) हा पाहिलात का त्याचा जरीचा कळीदार अंगरखा. वाहवारे अंगरखा, यानें नगरींतील स्त्रियांस भुलविण्याचें आतां सोडून देऊन अस्मादिकांचें हा थंडीवाऱ्यापासून रक्षण करित आहे. धन्य, धन्य तुझी! दादासाहेब, ह्या अंगरख्यामुळें आणखी एक मौज उडाली ऐकलंत काय? हा संभावित दिसणारा थेरडा मोठा विलंद असून, गरीब सुंदर स्त्रियांस फुसलावून वाईट मार्गास कसें लावावें ह्या सर्व युक्त्यांत फार तरबेज आहे. ही पहा मला या त्याच्या अंगरख्याच्या खिशांत त्याच्या दुष्कृत्यांचीं कागद पत्रें सांपडलीं आहेत! (आठवल्यासारखें करून,) दादासाहेब! (हांसतो) तुम्हांस फार काय सांगूं, ह्या स्वारीचें लक्ष तुमच्या देखील पाखरांवर. (हांसून) तें आपणांस मिळावें म्हणून स्वारीनें केलेला सर्व बेत मला अचानक समजला. (सिधोजी चपापल्यासारखें करितो.) पण कायहो दादासाहेब. आपण राजाचे मामा, आणि त्या बटकीवर आपला डोळा? छे! छे! हें मला तर बुवा खरें वाटतच नाहीं. मला ही पत्रांची शिकार सांपडली त्यामुळें त्या रंगेल थेरड्याची सर्व कृष्णकर्में उघडकीस आणण्यास अगदीं सुलभ झालें आहे! (मोठ्यानें हांसून,) दादासाहेब, काय सांगूं तरी? त्या विलासी बुड्ढेरावांचा तो कळीदार अंगरखा, आणि त्या पिळदार मिशा, अन् तो अणीदार जोडा आणि कंगणीदार पागोटें, यांची आठवण झाली म्हणजे मला पोट धरधरून हांसू येतें! (हांसतो.)

सिधोजी—(संतापून) धिक्कार असो तुला आणि तुझ्या ह्या नीच कृत्यांना. अरे कुलांगारा, तूं आपल्या कुळास काळिमा आणलास.

जयंत—अहो दादासाहेब? तोंड व्यर्थ दुखवूं नका. मला जरी माझ्या मित्रांनीं, आप्तवर्गानें, चाकरमाणसांनीं सोडून दिलें तरी माझ्या सावकारांनीं माझा त्याग केला नाहीं समजलांत? मी आपणांप्रमाणेंच सरदार घराण्यांतील आहे.

आपल्या अंगांत् जें पवित्र क्षत्रियरक्त संचार करीत आहे तें माझ्यांतही आहे, हें विसरलांत वाटतें? आपण आज इतकं वैभव भोगीत आहा. माझीं सर्व वाडेवतनें आपल्या तडाक्यांत आलीं आहेत, पण आपणांपाशीं मी एक कवडी सुद्धां मागितली नाहीं आणि म्हणूनच मला हा पंथ् धरावा लागला. पैसा–पैसा– ह्या जगांत पैसा असला तर दोस्त नि आप्त. बरें दादा, आज मला शंभर कलदारांची फार निकड आहे, द्याल कायहो ?

सिधोजी––आतां कसा आलास बेतावर? अरे तुला मदत करण्यास मी कधीं तरी माघार घेईन काय ? पण मी तुला सांगतों तें अगोदर तूं ऐकशील? तरच त्यांत तुझा फायदा आहे.

जयंत––(आश्चर्यानें) काय म्हणतां ?

सिधोजी––पहा जयंता, मला मूल नाहीं बाळ नाहीं. तुझ्याशिवाय मला वारस नाहीं. तूं सुधारावेंस हीच माझी एक इच्छा. तुझें कर्ज केव्हां फेडून टाकीन असें मला होऊन गेलें आहे. हे वाडे, हीं माझीं वतनें, सर्व तुझींच आहेत. तर बाबा नीट विचार कर, व शहाणा हो. तें फकिऱ्या नांव व त्या बरोबर तो लुटारुपणाचा धंदा यांस, या घटकेपासून फांटा दे पाहूं? अरेरे !(त्याच्या गालास हात लावितो.) तूं माझा सोन्यासारखा भाऊ असून, मी तुला केव्हां सुखानें वाड्यांत राहातांनां पाहीन असें मला होऊन गेलें आहे. तुला अशा विपत्तींत पाहून माझा आत्मा अगदीं तळमळतो. (जयंत त्याजकडेस चकित मुद्रेनें पाहातो.)

जयंत–(आपलें डोकें चांचपतो.) काय मी आज शुद्धीवर आहे का? आपण बोलत आहांत ते दादासाहेबच कीं दुसरें कोणीं ?

सिधोजी–मीच मीच तो. व ह्याकरितांच तर आज तुला भेट दिली. (पेटींतून रुपयांची थैली काढतो.) तुला पाहिजे होते शंभर पण मी तुला देतों पांचशें, घे. (जयंत थैली घेऊन आनंदानें नाचतो.) याशिवाय आणखी पांचशें लवकरच देण्याची व्यवस्था करितों.

जयंत—(आनंदानें) काय आणखी रुपये ?

सिधोजी—होय, बाबा, होय. मीं आणखीही देईन. पण माझें थोडेसें तुजपाशीं काम आहे.

जयंत—(तरवार म्यान्यांतून काढून,) सांगा दादासाहेब आपलें काय काम आहे तें? मी ह्याप्रसंगी आपल्या सेवेस हजर आहे. सांगाल तर आपल्या शत्रूंबरोबर देखील लढण्यास ह्या घटकेस तयार आहे! बोला, बोला, लवकर–

सिधोजी—शाबास जयंता. (हांसून) अरे मला तुझ्या तरवारीची मुळींच जरूर नाहीं. ठेव तिला म्यान्यांत?

जयंत—(उतावळीनें) मग आपलें काय काम आहे?

सिधोजी—हें पहा जयंता, आज तुझ्या इतका सामर्थ्यवान् कोण आहे? ह्या क्षणांत मनांत आणलेंस तर आपले सर्व साथीदार शहरांत आणून तूं धुमाकुळ माजविशील.

जयंत—(पुढें होऊन) असे घाबरतां कां दादा बोला, बोला, कोणाच्या वाड्यावर तुम्हांस हल्ला घालायाचा आहे. आज शंभर वाघेर शहरांत आणतां येतील.

सिधोजी—बाबारे शांत हो. मीं ह्या घडीस जयंताबरोबर बोलत आहे, फकिऱ्या नायकाबरोबर बोलत नाहीं, हें विसरूं नकोस. मला कोणाची हवेलंडी उडवायाची नाहीं. मला बंडावा नको, दरोडा नको, तुझे भिल्ल नकोत, वाघेर नकोत, कांहीं नको. माझें काम नाजुक आहे. अक्कलहुषारी पाहिजे. एका पाखरास पकडण्यासाठीं मला जाळें पसरायाचें आहे. एका माणसावर नाजूकरीतीनें मला सूड उगवायाचा आहे, सूड.

जयंत—निराश होऊन (स्वगत) मोठें बहादुरीचें काम दिसत नाहीं बुवा. (मोठ्यानें) कोणावर सूड उगवायाचा आहे? बोला, दादासाहेब, जलदी. नांव सांगा कीं त्याला करतोच लांब!

सिधोजी—(त्याच्या जवळ जाऊन हलक्या आवाजानें,) माझें वैर पुरुषाबरोबर नाहीं.

जयंत—(आश्चर्यानें) मग कोणाबरोबर?

सिधोजी—(हळूंच) मला एका स्त्रीवर सूड घ्यावयाचा आहे. व त्यांत मला तुझी मदत पाहिजे.

जयंत—(आश्चर्यानें)—काय म्हणतां? दादा, स्त्रीजातीवर आणखी सूड?

सिधोजी—होय–एका–तरुण–सुंदर स्त्रीवर सूड—

जयंत—(आपली तरवार फेंकून देऊन तिरस्कारानें,) पुरे, पुरे करा दादा! अरे अरे, काय ऐकतों हें मी ? तुम्हीं जातीनें पुरुष असून, स्त्रीचा सूड घेणार, त्यापेक्षां तोंडाला काळें फासून जगांतून निघून गेलांत तर काय वाईट ? आग लागो तुमच्या पैशाला ? (थैली फेंकून देतो.) आणि तुमच्या सरदारी बाण्याला ! थुः तुमच्या वैभवावर! आपल्याकडून असे शब्द ऐकण्याऐवजीं माझे कान फुटले असते तरी बेहेत्तर.

सिधोजी—(घाबरून) अरे जयंता, अरे अरे हळु.

जयंत—(आवेशानें व मोठ्यानें,) दादासाहेब, धिःकारअसो तुमच्या सरदारीला ! तुमच्या नीच व गळेकापू दरबारी लोकांपेक्षां माझे विश्वासू रामोशी, भिल्ल व पाळेगार लोक हजार वाटेनें चांगले. केसानें गळे कांपण्यापेक्षां लांडग्यांची धाड बरी. मी जरी चोरांचा नाईक आहे, लुटारू आहे, तरी देखील दादासाहेब इतकें ध्यानांत ठेवा कीं ह्या कुडींत जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत एखाद्या अबलेवर हत्त्यार उचलणें, मजकडून कदापिहि होणार नाहीं. मला मोठें राज्यपद जरी दिलें तरी मी त्यावर लाथ मारीन. पण असलें पातक माझे हातून कधींहि होणार नाहीं. (थैलीस लाथ मारितो) हा मी निघालों.


सिधोजी—(हांसून) शाबास ! बच्चा, शाबास ! (हांसतो.) हां ! हां ! मी केवळ तुझी कसोटी पाहिली. तुझ्या अंगीं इतका थोरपणा आहे हें पाहून मी अगदीं कृतकृत्य झालों. असा रागावतोस काय ? थट्टा देखील तुला समजत नाहीं–

जयंत—थट्टा ? दादासाहेब ही काय थट्टा ! ! एका अबलेवर सूड–सूड उगविण्याची ही थट्टा ? (रागानें पाहातो.)

सिधोजी—(जवळ जाऊन आनंदानें पाठ थोपटतो.) शाबास ! बेटा शाबास !

जयंत—बरें मग, दादासाहेब, मला सुधारण्याचा आपण विचार केलांत व वाड्यांत पुनः राहण्यास बोलावलेंत, ती तर सर्व थट्टा कीं काय? व पांचशें रुपये देण्याचें कबूल केलें तें देखील थट्टेंत कीं काय ?

सिधोजी—अरे बावा घाबरतोस कशासाठीं मी आतां आणून देतों. तुझ्या पुढें पैशाची काय बिशाद आहे ? (जाऊं लागतो. दाराजवळ जाऊन रायबास दारांतून आंत येण्यास इषारा करितो. रायबा अदबीनें येतो. सिधोजी जातो.)



जयंत--तुम्ही जातीनें पुरुष असून, स्त्रीचा सूड घेणार ?

[पृष्ठ १२

जयंत—अरे चांडाळा! मी तुझा कावा समजत नाहीं कीं काय? पण माझ्याशीं गांठ आहे. (इतक्यांत रायबाकडे पाहून,) कोण दोस्त रायबा? अरे तूं येथें कोणीकडे?

रायबा—(आश्चर्यानें) कोण फकिऱ्या नाईक! तूं येथें कसा आलास? (एकमेकांस भेटतात.)

जयंत—मला तर बुवा उघड्या हवेंत रहाणें फार आवडतें. परंतु जरा लहर लागली म्हणून वाड्यांत सहज आलों. पण रायबा तूं हुजऱ्याच्या पोशाखांत कसा—

रायबा—(खंती होऊन) अरे तें राहूं दे रे. मला कांहीं साध्य करून घ्यावयाचें आहे म्हणूनच येथें सिधोजीरावांचा हुजऱ्या झालों आहें. माझे मनोरथ ईश्वर केव्हां पूर्ण करील तें करो. तोंपर्यंत आपण तर बुवा येथेंच राहाणार.

जयंत—(आश्चर्यानें) अरे तुझ्यासारख्या शूर शिपायी गड्यानें नीच हुजऱ्यासारखें राहावें?

रायबा—मित्रा फार दिवसांनीं आपण आज भेटलों म्हणायचें. आपण आपल्या भिल्ल, रामोशी गड्यावरोबर रानांत व दरींत जे मजेचे दिवस काढले त्यांची आठवण झाली म्हणजे कंठ भरून येतो. आपले सर्व साथीदार बरे आहेतना?

जयंत—खरेंच रायबा, आपली ताटातुट झाल्यापासून आज आपण बऱ्याच दिवसांनीं भेटलों. आपले गडी, (हांसून) अजूनपर्यंत सर्व खुशाल आहेत.

रायबा—पण कायरे, मी असें ऐकलें होतें कीं तुला मोंगलाईंत पकडलें म्हणून?

जयंत—(हांसून) तुला काय सांगूं, दोस्त. मला पुंडाई चांगली करितां यावी, वाटा मारणें सुलभ व्हावें, व शत्रूस नीट हात दाखवितां यावा, म्हणून तर मी निरनिराळ्या गांवीं आपल्या साथीदारांपैकीं, मजसारखेच सात आठ 'फकिरे' तयार करून ठेविले आहेत. हा! हा! हा! (हंसतो.) त्यांपैकीं एखादा तोतया फकिऱ्या त्या मुसंड्यांच्या तडाख्यांत सांपडला असेल झालें. (हंसतो.) खरा फकिऱ्या कोठें आहे ह्याची त्या बेट्यांस कल्पना तरी आहे? मी असातसा नाहीं. समजलास बेट्या? (हंसतो.)

रायबा—धन्य आहे गड्या तुझी. नाहीं तर हा पहा मी, जो जन्माचा दरिद्री तो दरिद्री! शेवटीं नीच हुजरेगिरी करून पोट भरण्यास सिद्ध झालों आहे.

जयंत—होय बाबा, क्षुधा ही एखाद्या सोसाट्यानें वहाणाऱ्या वाऱ्या-प्रमाणें आहे. कितीही प्रौढी मिरविणारा प्राणी असेना, तिच्या तडाक्यांत येण्याची खोटी कीं तो हवा तितका वाकण्यास सिद्ध होतो ! रायबा? हे सारे नशिबाचे खेळ आहेत. पण असें हलकें काम करित बसण्यापेक्षां तूं कांहींतरी रोजगार कां नाहीं करीत—

रायबा—(गोष्ट उडविण्याच्या हेतूनें,) मित्रा, आमच्या धनीसाहेबांची व तुझी चांगली ओळख आहे वाटतें ?

जयंत—(हांसून) मी त्यास चांगलाच ओळखतों. हे सिधोजीराव शिरके आमचे जुने दोस्त आहेत. : पण अरे रायबा, येथें राजवाड्यांतच तुला रहावें लागतें कीं काय ?

रायबा—नाहीं. माझी नेमणूक सिधोजींच्या त्या वेताळ गंजेतल्या वाड्यावर आहे. राजवाड्यांत येथें येण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग. बाबारे, आमच्या धनीसाहेबांची जीं काय खलबतें व मसलती होतात तीं विचारूंच नको. त्यांच्या वाड्यांत मजशिवाय आणखी कांहीं नोकर आहेत, पण त्यांतील कित्येक बहिरे व मुके आहेत. त्यांना माझें नांव माहित नाहीं. नेहमीं पहावें तों तोंडें झांकलेलीं अशीं माणसें आमच्या यजमानांच्या भेटीस येतात. काय खलबतें असतील कोण जाणें ?

जयंत—(आपल्याशींच) आहेतच आमचे दादा तसे ठक! (मोठ्यानें) मित्रा, मग येथें राजवाड्यांत तूं आज कां आलास ?

रायबा—राजवाड्यांत आल्यानें तर माझा मनोरथ पूर्ण होईल अशी मला आशा आहे. व तसें झालें तर हुजऱ्याचा पोषाख चढवून मिरवावें लागत असल्याबद्दल मला मुळींच वाईट वाटणार नाहीं.

जयंत—मित्रा, ईश्वर तुला लवकरच सुखाचे दिवस दाखवील. अरे असा कष्टी कां होतोस ?

रायबा—माझ्या मनाची स्थिति तुला काय सांगूं फकिऱ्या ! माझें सर्वांग विस्तवांत होरपळल्यासारखें झालें आहे. माझ्या अंतःकरणाची जी तळमळ चालली आहे त्याची तुला कल्पनासुद्धां होणार नाहीं. (इतक्यांत हलकेंच सिधोजी डोकावून कानोसा घेतो.)

जयंत—अरे असें काय वरें करतोस ? मोकळें मन करून मला सांग तर पाहूं ?

रायबा—अरे, सांगून हसें करून घेऊं कीं काय ? तुला स्वप्नांत सुद्धां तें खरें वाटणार नाहीं. पण तूं सांगच म्हणतोस तर सांगतों बापडा. अरे. फकिऱ्या दोस्ता, मीं जे दिवशीं आपल्या राणीसाहेबांस पाहिलें त्या दिवसापासून खरेंच सांगतों, माझें मन माझ्या स्वाधीन नाहींसें झालें आहे. (सिधोजी कान पुढें करून ऐकतो.) त्यांच्या रूपानें मला अगदीं मोहून टाकिलें आहे.

जयंत—(हांसतो) वेडारे वेडा, खास वेडा! काय तूं राणीवर आषक झाला आहेस ? (सिधोजी हे शब्द ऐकून आनंदानें हांसतो.) चल, दे सोडून हा भलताच नाद. जें स्वप्नांतसुद्धां प्राप्त होणार नाहीं त्याची व्यर्थ कां आशा करितोस ? मूर्खरे मूर्ख !

रायबा—काय सांगू फकिऱ्या, माझें भान हरपल्यासारखें झालें आहे. राणीसाहेबांस रानटी फुलांचा फार नाद हें मी कोठें ऐकिलें. तेव्हांपासून कोसांचे कोस चालत जाऊन तसलीं फुलें मी वेंचून आणतों, व त्यांचे सुंदर गुच्छ तयार केल्यावर, राजवाड्याचा तटावरून चढून जाऊन, बगीच्याजवळ जें सरोवर आहे तेथें राणीची बसण्याची जागा आहे, त्या ठिकाणीं हळूच गुच्छ केव्हां ठेवीन असें मला होऊन जातें, व त्याप्रमाणें ठेविल्यावर मग माझ्या आनंदास पारावार राहात नाहीं! कालच राणी साहेबांस एक प्रेमपत्रिका पाठविण्याचें धाडस केलें. कारण मी तटावरून उडी मारीत असतां माझ्या हातास जखम झाली व तींतून रक्त वाहूं लागलें, तेव्हां त्या रक्तानेंच पत्र लिहिलें. मित्रा, वाटेल तर मला वेडा समज. मला मूर्ख म्हण. एखादे दिवशीं राजवाड्यांतील पहारेकऱ्यानीं तटावरून चोरून येतांना मला पाहिलें म्हणजे मी चोर किंवा दरोडेखोर आहेसें समजून मजवर ते गोळी झाडतील. तसें झालें तर राणीवर प्रेम करीत असतांना माझा प्राण गेला, म्हणून मी स्वतःस धन्य समजेन व आनंदानें प्राण सोडीन ! !

जयंत—अरे रायबा, हा नाद सोडून दे. उगीच वेड्यासारखा जीव धोक्यांत घालूं नकोस. आपल्या सोन्यासारख्या प्राणाची आहुति कां देतोस बाबा?

रायबा—मला जर राणीसमोर येण्याजाण्यास मिळेल—मला तिचें नुस्तें दर्शन होईल, तर माझा प्राणही मी देण्यास तयार आहें. अरे जीवाची काय कथा घेऊन बसला आहेस ? (कोचावर पडतो.) जा. दूर दूर, हुजऱ्याचा पोषाख चढवून राणीवर प्रेम करणार मूर्ख रायबा तो मीच—

जयंत—जिवलग मित्रा, (त्यास प्रेमानें उठवितो.) अशा स्थितींत तुझा मीं कसा त्याग करूं? शिव, शिव ! गड्या, मी जरी लुटारू आहे, माझें हृदय कठोर आहे, निष्कलंक प्रेम काय आहे याची मला कल्पनासुद्धां नाहीं, तरी देखील तुझी ही स्थिति पाहून मला फार दुःख होतें. अरे सोड हा दुर्विचार (त्यास आलिंगन देतो. इतक्यांत सिधोजी रुपयांची थैली वाजवीत प्रवेश करितो व उभयतांकडे टक लावून पाहातो.)

सिधोजी—(आपल्याशींच) उभयतांचा तोंडवळा अगदीं सारखा ! (खोंकतो.) हं, हं, हे घे पांचशे रुपये. (सिधोजीस पाहून रायबा खालीं मान घालून दाराजवळ निघून जातो व अदबीनें उभा राहातो.)

जयंत—(आपल्याशींच) ह्या स्वारीनें आमचें भाषण ऐकलें तर नाहींना ?

सिधोजी—(आपल्याशींच) माझ्या हुजऱ्याचें राणीवर प्रेम ! वाहवारे वाहवा ! आणि हें मी खुद्द आपल्या कानानीं ऐकलें ! झालें बस्स, आपलें काम झालें ! राणीवर सूड उगविणें आतां अगदीं सुलभ झालें. ह्या दोघांचें भाषण मला ऐकायास मिळालें हें फार बरें झालें. (मोठ्यानें) घे. घे.

जयंत—(थैली घेऊन) दादा, मी आपला आभारी आहे.

सिधोजी—बाबा, अंमळ मोजून घे. बरोबर पांचशे आहेत कीं नाहींत याची मला खात्री नाहीं, म्हणून सांगतों. मी हाच जाऊन येतों आतां.

जयंत—बरें आहे, दादा.

[सिधोजी जातो, जयंत पैसे मोजित आहे तोंच पडदा पडतो.

प्रवेश ३ रा.

[**स्थळः**–राजवाड्यांतील एक ओसरी. सिधोजी आपल्याशींच बोलत प्रवेश करितो.]

सिधोजी—बरें झालें. (हांसतो.) ह्या उभयतांचें भाषण मला ऐनवेळीं ऐकायास मिळालें. देव पावला ! आतां जयंताची तरी ऐट कशाला पाहिजे ! (विचार करून) होय, होय, तसेंच करावें. जयंताचीच वाट लावावी. कारण प्रथम त्या राजेश्रीस नाहींसे केल्याशिवाय तर इलाजच नाहीं. (विचार करितो) तसेंच करावें. आपल्या विश्वासू पठाणांकडून हा कांटा सहज काढतां येईल. (हलकेंच टाळी वाजवितो, त्यासरशी दोन पठाण पुढें येऊन उभे रहातात व मुजरे करितात.) बाबांनो असे या. मला तुमचेंच काम आहे. (द्वारी उघडून बोटानें दाखवितो.) पाहिला काय ? तो–तो–इसम. घोंगडीचा झगा पाठीवर सोडला आहे तो, पाहिलात ? पैसे मोजीत आहे व माझ्या हुजऱ्याबरोबर बोलत आहे. तो येथून निसटला म्हणजे त्याचा हलकेच पाठलाग करून त्यास कैद करा. प्रसंग पडला तर साफ करून टाका समजलांत ?

दोघे पठाण—(मुजरा करून) जो हुकूम.

सिधोजी—ह्या कामगिरीबद्दल तुम्हांस चांगलें बक्षीस देण्यांत येईल.

[पठाण मुजरे करून निघून जातात व त्यांच्या मागून सिधोजी जातो.

प्रवेश ४ था.

[**स्थळः**–दुसऱ्या प्रवेशाप्रमाणेंच. जयंत रुपये मोजीत आहे व रायबा उभा आहे.]

जयंत—(रुपयांचे सारखे दोन हिस्से करून) मित्रा रायबा, घे हे रुपये.

रायबा—(आश्चर्यानें,) नको, नको, मला, त्यांची मुळींच जरूरी नाहीं.

जयंत—अरे नादान रे नादान. घे. मित्रा भलताच आग्रह धरूं नकोस. आपला हा वेडा नाद, व हा हुजऱ्याचा पोषाख या दोहोंना एकदम रजा दे. (रुपये घेऊं कीं नको अशी स्थिति रायबाची होते. सिधोजी विस्मित मुद्रेनें दारांतून चोरून त्यांजकडे पहातो.)

रायबा—छे ! छे ! ! माझें मन माझ्या राणीसन्निधच रहा म्हणून मला सांगत आहे. मी हुजऱ्यासारखाच राजवाड्यांत राहीन म्हणजे मला माझ्या प्रियेकडे मनसोक्त पहायास मिळेल. मी येथेंच राहाणार.

सिधोजी—(आपल्याशींच दारांतून) अरे बैला, मलाही तुझीच जरूरी आहे.

जयंत—(पैसे थैलींत भरून,) बरें तर मग, मी घेतों रजा. ईश्वर तुझें भलें करो. पण मित्रा, जरा जपून वागहो. वेड्यासारखें करशील तर भलत्याच पेंचांत सांपडून जिवाला मात्र मुकशील. रामराम, दोस्त.

रायबा—रामराम. (दोघे एकमेकांच्या गळ्यांत हात घालून दारापर्यंत जातात. तेथें सिधोजीस पाहून जयंत सिधोजीचा निरोप घेऊन जातो.)

सिधोजी—(आपल्याशींच)—मला जें हत्त्यार पाहिजे होतें तें ईश्वरानें अचानक दिलें. तरूण, सुंदर व राणीवर प्रेम करणारा आमचा रायबा हुजऱ्या! वहावारे, सोळा आणे काम! (रायबाजवळ येऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवून,) अरे रायबा, कसला विचार करितो आहेस ?

रायबा—सरकार, कांहीं नाहीं.

सिधोजी—बरें पण, ह्या राजवाड्यांत तुला येतांनां कोणी पाहिलें कायरे ?

रायबा—फकिऱ्या व साधुजी या दोघांशिवाय मला कोणींच पाहिलेलें नाहीं सरकार.

सिधोजी—तूं यापूर्वीं कधीं हुजऱ्याचें काम केलें होतेंस कायरे ? तुला लिहितां वाचतां येतें काय ?

रायबा—नाहीं, सरकार. मीं पूर्वीं कधींच हुजऱ्याचें काम केलेलें नाहीं. पण मला लिहितां वाचतां येतें.

सिधोजी—बरें तर, हा हुजऱ्याचा पोषाख काढून टाक. मला आधीं ठाऊक असतें कीं तूं लिहिणारा वाचणारा आहेस तर तुला हुजऱ्यासारखा ठेवलाच नसता. मला तूर्त एक चांगला कारभारी पाहिजे, व तूं त्या कामाकरितां मला ज्या प्रकारचा मनुष्य हवा आहे तसाच आहेस. बैस. घे ही लेखणी आणि आमच्या चिटणीसाचें काम कसें करितोस तें मला पाहूं दे. (हांसून) मला एक प्रेमपत्रिका लिहावयाची आहे. आमचें

गुह्य फोडणार नाहींसना ? पण माझा तुजवर पूर्ण विश्वास आहे. माझी प्रिया कोण हें मीं तुला सांगणार नाहीं. (डोळे मिचकावतो) हं चल. (रायबा कागद लेखणी घेऊन लिहूं लागतोः–) "प्रिये, मजवर मोठा प्रसंग येऊन गुजरला "आहे. तर जिवलगे मला रात्रीं येऊन जरूर भेट. करितां जर न "आलीस तर मांझा सर्वस्वी घात होईल. तुला सुखरूप माझ्या रंगम- "हालांत पोंहचविण्यास माझा विश्वासू मुका व बहीरा खिदमतगार मुख- "वटा घालून राजवाड्यांत मध्यानरात्रीस येईल, तर लाडके, येण्यास विलंब करूं "नकोस. तुझा प्रियकर जयंत." बस. पुरे. (हांसतो.) तूं कालचें पोर. तुला काय समजणार आहे ? एखाद्या स्त्रीचें आपणांवर खरें प्रेम आहे कीं नाहीं ह्याची कसोटी पहावयाची असली म्हणजे आपणांवर मोठा प्रसंग गुदरला आहे असें चापून लिहावें. म्हणजे बस. माझ्या प्रियकरणींस लिहितांनां मी नेहमीं "जयंत" म्हणून सही कारितों.

रायबा—(नम्रतेनें) पण हें भलतेंच अक्षर पाहून आपली प्रिया शंकित नाहीं का होणार महाराज ?

सिधोजी—(हांसून) अरे तुला आमच्या दरबारी मंडळीच्या खुब्या कोठें माहित आहेत ? आम्हीं आमची ही मुद्रिका पत्रासोबत पाठविली कीं झालें. असें जर आम्हीं स्वतः सह्या करूं लागलों, तर आमचा निभाव तरी लागेल काय ? हें पहा रायबा, तुला पाहिल्यापासून तुझी मला फारच दया येऊं लागली आहे. व मजकडून जें होईल तें तुझ्याकरितां करण्याचा मी निश्चय केला आहे. तूं विश्वासू दिसतोस. आजपासून तूं माझ्या या वाड्यांत रहा. मला आज रात्रीं बहुतकरून कांहीं कामानिमित्त ह्या शहरांतून बाहेर जावें लागेल. तर माझ्या पाठीमागें येथें नीट व्यवस्थेनें रहा. विश्वासानें वागलास म्हणजे झालें. समजलास ?

रायबा—जसा आपला हुकूम, सरकार. (लखोटा पुढें करून) ह्यावर पत्ता लिहावयाचा राहिला.

सिधोजी—मजजवळ दे पत्र. मीच त्यावर पत्ता लिहीन. (पत्र हातांत घेऊन नीट जपून खिशांत ठेवितो.) कायरे, रायबा माझ्या मनांतून तुला सरदार बनवावें असें देखील येतें, परंतु मी जी कामगिरी सांगेन ती तूं मागें पुढें पाहिल्याशिवाय बजाविशील काय ?

रायबा—यांत काय संशय? हा रायबा कधींहि मागें पुढें पहाणारा गडी नाहीं, सरकार, आपल्यासाठीं मीं प्राण देखील ठेवीन.

सिधोजी—तर मग घे पाहूं आणखी एक ताव. हं, आणि मी सांगतों असें लिहि. (रायबा लिहूं लागतोः—) "मी खालीं सही करणार "रायबा हुजऱ्या सिधोजीराव शिरके यांचा आज्ञाधारक नोकर असून ते मला जी "कामगिरी सांगतील ती करण्यास सिद्ध आहे." चल त्याच्या खालीं तुझी सही कर. (रायबा सुचविल्याप्रमाणें लिहितो, व कागद सिधोजीच्या हातीं देतो. सिधोजी त्याची घडी करून नीट खिशांत ठेवितो, व टेबलावरील पोषाख व तरवारीकडे बोट करून) ती पाहिलीस का तरवार व तो पोषाख? तो तुजकरितांच आहे. घे. व घालून दाखीव मला. (रायबा तरवारीसहीत पोषाख चढवितो.) रायबा, आजच्या ह्या पोषाखानें जर तूं आपल्या शहरांतून गेलास, तर तुझी ऐट व स्वरूप पाहून सर्व तरुण स्त्रिया तुजवर मोहित होतील यांस संशय नाहीं. मला वाटतें मी तुला जर दत्तक घेतलें तरी देखील तूं शोभशील, कारण तूं सरदार घराण्यांतला काय पण एखाद्या राजपुत्राप्रमाणें शोभत आहेस. (कानोसा घेऊन,) राणीसाहेबांची सकाळच्या देवदर्शनास निघण्याची वेळ झालीसें दिसतें. म्हणूनच हे आमचे शिलेदार इतक्या तांतडीनें बाहेर येत आहेत. (पडद्याकडे पाहून) होय, हे आलेच पिराजीराव जगताप. आतां संशयच राहिला नाहीं. आमचे हे वृद्ध पिराजीराव जामदार राणीच्या लवाजम्याच्या शिरोभागीं ठेवलेले आहेतच. (चाहूल ऐकलेंसें करून लगबगीनें जवळ पडलेला रेशमी झगा रायबाच्या अंगावर टाकितो.) चल हो पुढें रायबा. पलीकडल्या सज्जांत जाऊन आपणांस राणीसाहेबांस मुजरा केलाच पाहिजे.

[लगबगीनें निघून जातात.

प्रवेश ५ वा.

[स्थळः–राजवाड्यांतील एक सज्जा. भालदार व चोपदार उभे आहेत. पिराजीराव मोठ्या लगबगीनें मिशीस पीळ देत देत येतात, व हातांतील लहान आरसीनें तोंड पहातात. इतक्यांत एकामागून एक रूपाजीराव, कान्होजीराव, सुर्याजीराव, मकाजीराव इ० शिलेदार भपकेदार पोषाखानें आपापल्या खिदमतगारांसह येऊन अदबीनें उभे रहातात. सर्वांच्या मागून सिधोजीराव व रायबा येतात. सर्व सरदार एकमेकांस दरबारी थाटाचा मुजरा करितात. खिदमतगार मुजरे करितात, व एकच गोंधळ उडून जातो.]

सिधोजी—सरदारहो, (रायबाकडे पाहून) आमचे बंधु जयंतराव शिरके, यांस आपण ओळखलें नसेल. (रायबाकडे सर्व सरदार मंडळी पाहाते व मुजरे करिते. रायबा गोंधळल्या सारखा होऊन खालीं पाहूं लागतो.) काल रात्रीस हे राजेश्री आमच्या वाड्यांत आले. दहा वर्षांनीं! अहो सर्व हिंदुस्थान भटकून ही स्वारी आली आहे!

कान्होजी—अरे जयंता लाजतोस कां ? तूं तर आमचा सोयरा लागतोस. (आठवल्यासारखें करून) मला वाटतें तूं आमचा भाचा–होय भाचाच लागतोस. इतका बचा होतास तेव्हां तुला मी पाहिलें आहे. तुला पाहून मला फार आनंद झाला. (रायबास आलिंगन देतो.)

सिधोजी—स्वारीस कृतकर्माबद्दल पश्चाताप होतो आहे. अरे मागच्या सर्व गोष्टी विसर बाबा. (हांसतो.) अरे वर पहा, लाजूं नकोस.

सूर्याजी—(आश्चर्यानें) काय म्हणतां ? दहा वर्षेंपर्यंत स्वारीनें तोंड दाखविलें नाहीं ? अबब ! !

कान्होजी—अहो आपण देखील तरुणपणीं असे गुण उधळले आहेत नाहीं कीं काय ? (ह्यः ह्यः म्हणून सर्व सरदार हांसतात.)

सिधोजी—कान्होजीराव तें राहूं द्या. अहो झालें तें झालें. आमचें शिरक्यांचें घराणेंच तसें आहे. (डोळे मिचकावितो.) याचें सर्व कर्ज फेडून टाकून त्यास पूर्व स्थितीस आणणें हें माझें कर्तव्य आहे. पण भाऊसाहेब जयंताची आपण कोठें तरी दरबारांत व्यवस्था करा बुवा. बहिरीबहादुरांस कारभारी पाहिजे म्हणून

कालच मीं ऐकिलें. तर एकदाचें इतकें काम करून टाका. नाहींतर राणीसाहेबांच्या तैनातींत कसा तरी ठेवून द्या. अहो एकदां कोठें उद्योगास लागला म्हणजे मग कोणाचे बोल ऐकायास नकोत. कसें मकाजीराव, मी बोलतों तें बरोबर आहे कीं नाहीं ?

मकाजी—(हांसून) हां! हां! हां! मामासाहेबांचें बोलणें रास्त आहे. (इतक्यांत दोन हुजरे बरोबर घेऊन मिशीस पिळ देत, वृद्ध पदाजीराव थोरात प्रवेश करितात. त्यांजकडेस पाहून, सर्व सरदार मंडळी मुजरे करिते.)

सिधोजी—राम राम. पदाजीराव राम राम. आपली स्वारी इतका उशीर करूनशी आली ? कसें काय तब्येत वगैरे ठीक--

पदाजी—काय करूं मामा साहेब. माझा तो नवा किनखाबी अंगरखा चोरीस गेल्यापासून, राणीसाहेबा समोर कोणत्या पोषाखांत यावें, याचा विचार करित बराच वेळ बसून होतों. मग आमच्या हुजऱ्यानें हा रूपेरी झीकाचा अंगरखा दिला. कसें काय, हा नामी दिसतो कीं नाहीं? तरी पण मामासाहेब, माझ्या त्या किनखाबी अंगरख्याची सर येणार नाहीं. आग लागली त्या फकिऱ्याच्या तोंडास ! (रायबा आश्चर्यानें, पदाजीकडे पाहतो, व सिधोजी मोठ्यानें हांसतो.) पुनः तो बेटा माझ्या तावडींत तर मिळूंद्या, मग त्यास हात दाखवीन तरच नांवाचा मराठा—

सिधोजी—(हांसून) एकून पुनः आपल्या भेटीस यावयाचें त्या बेट्यानें वचन दिलें आहे कीं काय ?

रूपाजी—(त्याच्या जवळ जाऊन) वाहवारे! पदाजीराव किती तरी पण खुमासदार हें कापड आहे.

पदाजी—(कष्टी होऊन) तरी माझ्या त्या किनखाबी अंगरख्याची सर नाहीं येणार. अरेरे, दुष्ट चोरटा फकिऱ्या रामोशी—

एक हुजऱ्या—(सरदारांस लवून मुजरा करितो, व पडद्याकडे बोट दाखवून,) सरदारहो, राणीसाहेबांची स्वारी आली. (निघून जातो. रायबा उत्कंठेनें पडद्याकडे पहात राहातो. सर्व सरदार पडद्याकडे तोंडें करून अदबीनें उभे रहातात.)

सिधोजी—(रायबास हळूंच) आतां माझ्या वाड्यांत राहून जयंतराव नांव चालवून राहिलें पाहिजे बरेंका ? सरदार मंडळीस आपला खरा संबंध काय

याची कल्पना सुद्धां नाहीं. घाबरूं नकोस. माझें जें आहे तें सर्वस्वी तुझेंच आहे. आणि शिवाय कान्होजीराव मामासाहेब लवकरच तुला दरबारांत मोठ्या हुद्दयाची नोकरी देणार आहेत. आज रात्रीं ह्या मोहनपुरातून मला बाहेर गेलेंच पाहिजे. तसेंच निकडीचें काम आहे. बाबारे नीट व्यवस्थेनें रहा. माझें हें सर्व वैभव भोगण्यास ईश्वर तुला उदंड आयुष्य देवो, हाच माझा आशिर्वाद. (पडद्यांतः-" मिनाबाई मोहनपूरच्या महाराणी साहेब यांचा जयजयकार " असे शब्द ऐकूं येतात.)

रायबा—(विस्मित मुद्रेनें पडद्याकडे पाहातो,) कोण राणीसाहेब— (भांबावल्यासारखें करितो. सर्व सरदारलोक पडद्याकडे पहात पहात मुजरे करितात. सिधोजी रायबास मुजरा करावयास लावितो.)

सिधोजी—(हळूंच) शाबास, अरे असा कचरतोस कां? बाबा कर असा सरदारी थाटाचा मुजरा.(रायबा सरदारी थाटाचा मुजरा करून दाखवितो.)

रायबा—(हात जोडून,) महाराज,:आणखी आपली काय आज्ञा आहे?

सिधोजी—(हळूंच) चूप, चूप. मला महाराज म्हणूं नकोस. मी आतां तुझा दादा, उर्फ दादासाहेब समजलास? मला हात जोडायाचे नाहींत. बरें झालें. सरदार मंडळीनें पाहिलें नाहीं. नाहींतर फजिती झाली असती. आतां ऐक. (पडद्याकडे बोट दाखवितो.) त्या चालल्या आहेत आपल्या राणीसाहेब, त्यांजवर अनिवार प्रेम करून त्यांना आपल्या प्रेमपाशांनीं जखडून टाक हीच माझी आज्ञा. समजलास ?

[रायबा विस्मित सिधोजीकडे पहातो.

[पडदा पडतो.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**:-जंगलांतील रस्ता, रायबा हातांत चाबूक घेऊन घोडेस्वाराचा पोषाख चढवलेला, असा शिलेदारी थाटानें प्रवेश करितो.]

रायबा—माझें घोडें आतां ताजेंतवानें झालें असेल. होय येथें आतां विसावा घेत बसण्यांत अर्थ नाहीं. अजूनपर्यंत तर (हांसतो.) अगदीं मनासारख्या गोष्टी होत आहेत ! कान्होजीराव कांकड्यांचा वशिला खबरदार. त्यांनीं महाराजांजवळ गोष्ट काढतांच आमची बहिरीबहादुर सुभे यांचे दरकदार म्हणून खास नेमणूक झाली. मोहनपुरांत एकदांच काय ती राणी माझ्या दृष्टीस पडली. देवळांत जातां जातांना तिला पाहिल्यापासून आपल्याला तर बुवा कसंसंच होऊन गेलें आहे ! परवां आमच्या यजमानांनीं राईंत महाराजांकडे काहीं कामानिमित्त पाठविलें, तोंच महाराजांची स्वारी आम्हांस पाहून अगदीं खुष झाली. मला पोषाख, तैनातजाबता व महाराजांच्या शिक्क्या सुद्धां इनाम पत्रें देऊन, सध्यां दोन दिवस आमच्या स्वारींतच मुक्काम करावा म्हणून ठेवून घेतलें. येथें मात्र सर्व बिनसलें होतें. (तोंड वाईट करितो.) कारण आतां ह्या रानांत मला राणीचें दर्शन तरी कसें होणार ? पण जो साखरेचें खाणार त्यास देव देणार तें काहीं खोटें नाहीं. पहा गुरुनाथबावानीं कसा आमच्या मनासारखा बेत जुळवून दिला. आह्मीं खुद्द राणीसाहेबांच्या तैनातींत असावें म्हणून महारांजास सुचविलें. (हांसतो.) वाहवा गुरूनाथबावा, तुम्हीं आपल्या अलौकिक शक्तीनें माझ्या मनांतलें ताडलेंत वाटतें ! झालें. लागलेंच महाराजानीं, जयंतराव शिरके तुम्हांस राणीसरकारचें खुद्द खासगीकडील कारभारी नेमिलें आहें, म्हणून हुकूम फर्मावला. पुनः राजेसाहेबांचा बेत फिरतो कीं काय म्हणून माझी छाती धडधडत होती, कारण हे आमचे स्वच्छंदी राजे लोक. जें मर्जीस येईल तें करणार ! ना ताळ ना मेळ ! इतक्यांत पहातों तों महाराजानीं पुनः जवळ बोलावून मला राणीसाहेबांस पत्र लिहिण्यास सांगितलें ! (हांसून) वाहवारे पत्र लिहिण्याची ही विलक्षण तऱ्हा ! होय कदाचित आमच्या मऱ्हाठेशाहींत अशींच प्रेम पत्रें पाठविण्याची चाल असेल ! बाकी

माझें नशिब खात्रीनें उदयास आलें म्हणायाचें. सर्व गोष्टी कशा अगदीं मनासारख्या होत आहेत. आतां रायबा राणीच्या दर्शनानें आपले डोळे निववून घे! जर ईश्वरानें पंख दिले असते तर, ह्यावेळेस असाच राणीच्या महालांत उडत गेलों असतों. मी ज्यावेळीं सिधोजीरावांच्या हुजऱ्याचें काम पत्करिलें, त्यावेळीं माझे इष्ट हेतु हळु हळु ह्याप्रमाणें सफल होतील हें स्वप्नींही नव्हतें. आमचे यजमान सिधोजीराव कोठें नाहींसे झाले आहेत, त्यांचा अजून पत्तादेखील नाहीं. कोणी म्हणतात महाराजांची इतराजी झाली म्हणून त्यांस महाराजांनीं हद्दपार केलें आहे. हें सारें जर खरें असेल तर आमचें नशीब थोर म्हणायचें! कारण आमची ही वेगडी सरदारी कदापिही उघडकीस येणार नाहीं. कान्होजीराव तर मी खास सिधोजींचा बंधु म्हणून समजतात; व मला आपला खरा भाचा समजून त्याप्रमाणें मला मानही देतात. मी देखील त्यांस मामासाहेब म्हणून हांक मारितों. माझा जरी अगदीं हलक्या कुळांत जन्म झाला, तरी माझ्याकडून थोडासा विद्याभ्यास झाला, हें सुदैवच म्हणायचें. आमच्या कपाळीं पुरतें सुख कोठें होतें? एकदां आमच्या खेड्यांत एक पिसाळलेला कोल्हा अंगावर चालून आला असतां, त्याजवर गोळी झाडिली व स्वतःचें रक्षण केलें. परंतु त्याबद्दल तारीफ व्हावयाची ती एकीकडेस राहून, उलट परवान्याशिवाय हत्यार वापरलें म्हणून अस्मादिकांस पकडण्याचा कोतवालीतून हुकुम सुटला. म्हणून नाइलाजास्तव पोबारा करावा लागला. व असाच रानोमाळीं भटकत असतांना त्या फकीऱ्याच्या पुंडखोर लोकांस सामील होऊन बंडावा माजविला. ह्याप्रमाणें अरे रायबा, तूं त्या फकीऱ्याबरोबर वाटा मारीत होतास, तेव्हां तुझें नशिब असें उदयास येईल, म्हणून कोणी सांगितलें असतें तर तें कोणासही, खरें तरी वाटतें काय? आज मी मोठा सरदार होऊन ह्या राज्यांत डामडौलानें मिरवीत आहे. पण माझे हे चांगले ग्रह असेच कायम राहातील तरी कशावरून? (पडद्यांत पाहून ऐकलेंसें करितो.) होय हें आमच्या घोड्याचेंच खिंकाळणें? आमचा घोडा कसा अगदीं चारा खाऊन ताजातवाना झाला आहे! आतां केव्हां निघूं असें मला होऊन गेलें आहे. (चाबूक वाजवितो.) तर चला. घोडा भरधांव सोडून मोहनपुराची वाट धरूं या. विलंब कशासाठीं?

[धांवत धांवत आंत निघून जातो.

प्रवेश २ रा.

[**स्थलः**—राणीचा महाल. राणी चिंतातूर व उदास अशी, कोचावर विचार करीत पडली आहे. जवळच तिची दासी सुगंधी वारा घालीत उभी आहे. एकेबाजूस वृद्ध बयाबाई, चष्मा लावून पोथी वाचीत बसली आहे. दुरून, वृद्ध पिराजी राणीकडे टक लावून पहात दाराजवळ उभा आहे.]

राणी—(विचार करीत) त्या सिधोजीस हद्दपार केलें तेव्हां बाई माझ्या जिवांतजीव आला ! थेरडा मेला महा खराब—

सुगंधी—आपल्या मनासारखं झालेंना बाईसाहेब ? आतां त्या मेल्याचें नांव काढून आपल्या तोंडाला व्यर्थ कां बरें शिणवितां ? त्याची खोड सरकार आपण किनई चांगलीच मोडली.

राणी—आतां तो थेरडा ह्या आमच्या शहरांत कसा पाय देतो तें मी पहातें. अग सुगंधी, माझा डोळा असा कां बरें आज दोन दिवस लवत आहे ? काल रात्रीं तो मेला तीन वेळां माझ्या स्वप्नांत आला ! माझा गळा कापण्याच्या विचारांत तो काळतोंड्या आहे कीं काय नकळे ? ते दिवशीं मेला वाड्यावरून जातांजातानां कस्सा, कस्सा पण बाई मजकडे टवकारून पाहात होता ! जणूं दंश धरलेला सर्पच ! त्याला वाटलं होतं कीं मला श्रृंगारपुरहून आणिली व राजाची राणी केली म्हणून मी त्याच्या ओंजळीनं पाणी पिईन. मी अगदीं कुकुलबाळ पडलें कीं नाहीं ? माझ्यावर ताबेदारी चालविण्यास थेरड्यास लाज कशी नाहीं वाटली ?

सुगंधी—आतां बाईसाहेब त्याचें नांव कशापायीं काढतां ? त्यानें काळें केलेंना ?

राणी—अग माझा डोळा लवूं लागला, म्हणून त्याचें स्मरण झालें. मोठा राजाचा मामा झाला म्हणून मजवर अरेरावी करावी काय ?

सुगंधी—असेल बाईसाहेब येरव्हींच लवत. त्याची पर्वा एवढी कशाला करतां ? (पिराजी राणीकडे चोरून पहातो, तेथें पाहून दचकते.) हेंग कोण ? काय मेला म्हातारडा लुच्चा ? कसापण राणीसाहेबांच्या तोंडाकडे टकमक पहातो आहे, मेल्याला लाजच नाहीं ! (राणीस) बाईसाहेब, हे मेले सारे सरदार असेच निलाजरे आहेत—



राणी---आग लागो ह्या पराठमोळ्यास ! [पृष्ठ २७

राणी—(हांसून) कोण ? पिराजी जगताप जामदार ? (स्वगत) अरेरे ! त्या मोडक्या शिलेदाराची मला कींव येते. म्हातारा असून त्याला तरूण म्हणवून घेण्याची किति तरी हांव ! मी त्याजपाशीं दोन गोड शब्द बोलूं का ? होय, त्या म्हाताऱ्यास त्यापासून आनंद वाटेल तर कां बोलूं नये ? (सुगंधीस) पिराजीस येथें येऊंदे.

(सुगंधी पिराजी जवळ मुरडत मुरडत जाते. पिराजी मोठ्या लगबगीनें लहान आरशींत तोंड पाहातो त्यास जवळ येण्याविषयीं खुणाविते. पिराजी हांसत पुढें येतो, व राणीस मुजरा करितो.)

राणी—(हास्यवदन करून) पिराजीराव जामदार, आपली तब्येत ठीक आहेना ?

पिराजी—(आनंदानें दोन तीन मुजरे करितो.) होय सरकार. (राणी-कडे पहाण्याचा त्याला धीर होत नाहीं. खालीं पहातो. व सुगंधीकडे डोळे मिचकावून, हळूंच.) आज सरकारस्वारी आपल्याला तर बुवा आनंदी दिसत आहे. नेहमींप्रमाणें उदास नाहींत. (डोळे मिचकावून हांसतो. व मुजरे करीत करीत दाराजवळ जातो.)

सुगंधी—(स्वगत) ह्या वृद्ध छेलछबेल्याला राणीचे दर्शनानेंच ब्रह्मानंद होतो आहे ! (राणी चंदनी पेटी घेऊन खेळत आहे तीस,) बाईसाहेब ही चंदनी पेटी किती तरी सुबक आहे ?

राणी—(पेटीचें चुंबन घेऊन) मला किनई ती माझ्या माहेरीं पाठवायाची आहे. त्यांत मी माझ्या भावंडांकरितां काहीं मौल्यवान् पदार्थ पाठविणार आहे. मला शृंगारपुराची आठवण झाली म्हणजे छातींत कसें धस्स होतें. (कपाळा-वर हात मारिते.) अहो बाबा, आई ! मी आपल्या घरीं कितीतरी सुखी होतें ? मला ह्या कोंडवाड्यांत मेलं चैनच पडत नाहीं. आग लागो ह्या मऱ्हाठमो-ळ्यास ! आज सहा महिन्यांतून तिकडचें मला सारें एकदांच कायतें दर्शन झालें ! राजांच्या राण्यांना असंच वागविण्याची चाल आहे काय ? मी खरोखरच दुर्दैवी ! आपले तारुण्याचे दिवस असे गोषांत घालविण्यापेक्षां तुरुंगवास बाई हजार वाटांनीं बरा ? पुरुषांनां ज्याप्रमाणें सुखदुःखें होतात त्याप्रमाणें आम्हां स्त्रियांनां होत नाहींत कीं काय ? (बयाबाई राणीकडे टवकारून पाहाते.) हाय ! हाय ! मग आम्हांस असें अज्ञातवासांत कां बरें कोंडून ठेवायचें ! बायकांस पडदपोशींत

कोंडून ठेवणाऱ्या आमच्या मराठ्या शेंदाड शिपायांस धिःकार असो ! ह्या मेल्या पुरुषांस म्हणावें कीं महिनाभर तुम्हांस एखाद्या नबाबाच्या झनानखान्यांत बेगम करून ठेवितें, तर तें तुम्हांस पत्करेल काय ? आज बाबांनीं शिक्षण देऊन पुढें आजन्म पारतंत्र्यांत बुचकळ्या मारायास जिवंत ठेविलें त्यापेक्षां लहानपणींच गळा दाबून माझा प्राण कां बरं नाहीं घेतला ? हायरे देवा ! बायकांनां परपुरुषाचें तोंड आणि सूर्याचा उजेड न दाखविण्यांतच सारी कुलीनता भरली आहे काय ? बाकी सर्व स्त्रिया पापाचरणी कीं काय ? शिव, शिव, आमच्या राजे लोकांचे देवा तूं डोळे केव्हां उघडशील कोणजाणें ?

बयाबाई—सरकार उगीच कष्टी होऊं नका. उंच दरजाच्या मराठ्यांच्या बायका नेहमीं पडद्यांतच असतात. गोषाची चाल फार दिवसांपासून चालत आलेली आहे. बायकांनीं पुरुषांच्या नजरेस पडणें ही मोठी लांछनाची गोष्ट आहे. आपलें राणीचें पद आहे हें बाईसाहेब आपण विसरतां—(राणी कंटाळल्यासारखी होऊन उठते.)

राणी—(सुगंधीस,) अग सुगंधी, चला आपण बाहेर बागेंत जाऊं या. जरा उघड्यावर गेलें म्हणजे मला बरें वाटेल. (बाहेर जाऊं लागते, तों बयाबाई तिला अडविते.)

बयाबाई—(नम्रतेनें)बाईसाहेब, मी आपणांसारख्यांस सांगावें असें मुळींच नाहीं. आपण जाणत्या आहांत. आपल्या सारख्या राजघराण्यांतील स्त्रियांनां बाहेर जावयाचें असल्यास तशाच डामडौलानें गेलें पाहिजे. आपला मानमरातब कसा ठेवावा हें आपणांस शिकलेंच पाहिजे. आपण पडलांत गोषांतल्या. तसं आपणांस मला जाऊं देतां येणारच नाहीं. येथल्या राजवाड्यांतल्या रीतीभाती शिकविण्यासाठीं तर माझी खास नेमणूक झाली आहे. हें राणीसाहेबांस माहित आहेच—

राणी—(संतापून,) मग मला कोंडून ठेवण्यासाठीं येथें आणलें कीं काय ?

बयाबाई—(नम्रतेनें,) सरकार क्षमा करा मी काय हुकमाची तावेदार.

राणी—(जांभया देत देत,) मग आत्त्याबाई मी अशीच रिकामी माशा मारीत बसूंना ? मला कंटाळा येतो असं रिकामं बसायला. (सुगंधीस,) अग सुगंधी, चल. सोंगट्या तरी आण, आपण चार डाव खेळूं—

बयाबाई—(सुगंधीस दरडावून,) हं, भलतंच ? खबरदार. (राणीकडे पाहून नम्रतेनें,) सरकार, आपली व या सुगंधी दासीची योग्यता सारखीच कीं काय ? बाईसाहेब, आपणां मराठ्यांत अशी चाल नाहीं. आपणांस जर सोंगट्या खेळणें कर्तव्य असेल, तर आपण खुद्द महाराजांबरोबर किंवा राजघराण्यांतील थोर स्त्रियांबरोबर खुशाल डाव खेळा—

राणी—(वेडावून,) राजघराण्यांतील स्त्रिया ! व महाराज ! आत्त्याबाई यांपैकीं येथें कोण आहे ?

बयाबाई—(हांसून,) आपले महाराज राईच्या जंगलांत आहेत, हें राणी सरकार आपण जाणतच आहांत. (दुःखानें) आमच्या महाराजांच्या मातोश्री तर नुकत्याच वारल्या. त्यांस आतां कोणीच नातेवाईक नाहीं. ते एकटेच आहेत—

राणी—(त्रासून,) चला उठूंया आतां. (उठते.) आपण एकत्र फराळ करूंया ? सुगंधी ! अग सुगंधी !

बयाबाई—(हात वर करून,) हें आज भलतेंच काय आरंभलें आहे आपण राणीसरकार ? महाराजांच्याच बरोबर आपण फराळ करायचा अशी इथली पद्धत आहे. छे ! छे ! आपल्या बटकीबरोबर फराळ ! लोक ऐकतील तर काय म्हणतील ! पण मी आपणांस असें करून तरी कशी देऊं ?

राणी—(राणी उसासा टाकिते.) अरे देवा कोण माझा हा छळ ! मी कसली राणी ? मला फिरायची चोरी. खेळायची बंदी ! चारचौघांत फराळ करण्याची सुद्धां मनाई ! (कपाळावर हात मारते.) ह्या जाचांतून माझी केव्हां सुटका होईल ती होवो. जळो हें राणी होणें ! (रडते.)

सुगंधी—(आपल्याशींच,) राणीस असा शोक करितांनां पाहिलें म्हणजे मला तर बाइ कसंसंच होऊन जातं. कसची राणी ? बिचारीचा उगीच छळ मात्र चालला आहे. येथें राजवाड्यांत मेली सर्व गोष्टींची चोरी (बयाबाईकडे रागानें पाहाते.) येथें सभोंवार म्हातारीं माणसें. घटकाभर एक तरूण दृष्टीस पडण्याची मुष्कील ! आम्हीं तरणीताठीं माणसें, पण ह्या वृद्ध माणसांच्या नित्य संसर्गामुळें,

जणूं आमचा वृद्धापकाळ समीप येऊन ठेपला आहे कींकाय असा भास होऊं लागला आहे! महाराज तर जंगलांत! आमच्या बाईसाहेब ऐन तारुण्याच्या भरांत! शिवाय जवळपास त्यांच्या जिव्हाळ्याचें असें करमणुकीकरितां दिखील कुणी नाहीं! त्यांनीं दिवस तरी कोणाच्या जीवावर कंठावेत? खरंच बाई, राणी होण्यापेक्षां एखाद्या गरीब तरुणाबरोबर प्रेमाचे घुटके घेत सुखांत दिवस घालविणें कितीतरी चांगलें! आमच्या राणीसाहेबांची काय बरें तळमळ होत असेल? विचारीच्या नशिबांत काय लिहिलें आहे कोण जाणें?

राणी—(स्वगत,) मी माझ्या महालांतील बागेंतल्या सरोवरापाशीं केव्हां जाईन, असें मला होऊन गेलें आहे? तो पुष्पगुच्छ सदोदित पहात रहावेसें वाटतें मीं शृंगारपुरांत असतांना किती तरी सुखी होतें? मला रानोमाळ फिरतांना कोणीही अडविलें नाहीं. एकेदिवशीं मी मांजराच्या पिलांबरोबर खेळत असतां, तो मेला थेरडा सिधोजी बाबांबरोबर आला आणि मजकडे पाहून म्हणाला, 'होय, हीच आमची राणी शोभेल.' झालें, हें शब्द ऐकतांच आमच्या बाबांस अत्यानंद झाला. पण आई मात्र दु:खानें रडली माझ्या माहेरून आणलेली मैना, कोणी दुष्टानें मारली कोणजाणें? मला माझ्या घरचें पत्र वाचण्याची देखील पंचाईत! एक सुखाचा शब्द येथें माझ्या कानीं पडत असेल तर शपथ. आणि मी राणी झालें आहे! देवा ह्यांतून तूं मला केव्हां मोकळी करशील ती कर. (बाहेर गाण्याचा मधुर स्वर ऐकूं येतो. तेव्हां उठून बारीतून डोकाविते.) अहाहा! किती तरी मधुर हें गवळणींचें गाणें. ह्या मजपेक्षां हजार वाटेनें सुखी आहेत—(गवळणी पडद्यांत गातात:—)

गवळणीचें गीत.

कण कण पाणी, मिसळ गवळणी, मोत्याच्या वाणी ॥
मण मण विकुनी दुध तुझ्यावर पडेल मोत्याच पाणी ॥
कण कण वाळू भेळूनि साखर विकील जो वाणी ॥
मण मण साखर खपुनि त्याची भरेल पैशानें गोणी ॥
थोडी थोडी व्यापारीं ज्या लबाडिची गोडी ॥
खोडी जोडी ही शहाणा तो मिळवी घोडा नी गाडी ॥

बयाबाई—(रागानें उठते व पिराजीस मोठ्यानें,) अहो जामदारसाहेब, पाहातां काय ? त्या बाहेर गाणाऱ्या हलकट बायांस हांकून द्या पाहूं कसे ? आपल्या राणीसरकारांस त्यांपासून त्रास होत आहे, चला निघा.

राणी—(आश्चर्यानें) भलतेंच काय म्हणता आत्त्याबाई! उलट त्यांचें गाणें कितीतरी गोड वाटतें? मला तें ऐकावेंसेंच वाटतें. (पिराजीस बाहेर जाण्याविषयीं बयाबाई सुचविते. पिराजी कांकूं करीत शेवटीं जातो.) अग बाई! सूर्य कितीतरी वर आला ? राणी साहेबांची शिवलीलामृत वाचण्याची वेळ झालीच. (सुगंधीस,) राणीसरकारची पोथी आण पाहूं ? (सुगंधी पोथी आणून चौरंगावर ठेविते व निघून जाते. बयाबाई राणीस पोथी वाचण्यास सुचविते, व हळूहळू निघून जाते.)

राणी—(चौरंगासमोर बसते व पोथीकडे पहात, पहात.) ह्या शिवलिलामृताकडे माझें कसचें लक्ष लागणार ? (कपाळावर हात मारिते.) आई जगदंबे मजवर कृपा कर. मला ह्या कारागृहांतून सोडीव. मला हें राजसुख नको. प्रेम, प्रेम, तूं कुठे आहेस ? प्रेमाशिवाय तारुण्य कशाला ? ह्या राणीपदाचा मला काय बरें उपयोग–? मी प्रेमसुखाकरितां चातकाप्रमाणें तान्हेलेली आहे. तृषेनें व्याकूळ झालेला प्राणी, कितीही विषारी किंवा गढूळ पाणी असलें तरी तें प्राशन करण्यास सिद्ध होतो. त्याप्रमाणें माझी स्थिति होऊन गेली आहे. ह्या जगांत मजवर प्रेम करणारा प्राणी आहे काय ? (आठवल्यासारखें करून हळूच आपल्या चोळींतून चांदीच्या सळ्यामध्यें खोंवलेला सुकलेल्या फुलांचा गुच्छ काढून त्याचें चुंबन घेते.) हे तरुणा! मी तुला जरी पाहिलेलें नाहीं, तरी ह्या फुलांकडे पाहिलें म्हणजे, तुझें मजवर अनिवार प्रेम आहे ह्याबद्दल माझी खात्री होते. अरेरे! इतकं साहस करून तूं राजवाड्यांतील बागेंत येण्याचें धाडस केलेंस ? (इतक्यांत आणखी आठवल्यासारखें करून, चोळींतून पत्र काढते. व त्याचें चुंबन घेते.) आई जगदंबे! भलते सलते विचार माझ्या मनांत येत असतां, माझें पोथीकडे कसचें चित्त लागणार? मी हें पत्र वाचूं काय ? (पत्राचें चुंबत घेतें.) कितीदां मेलं वाचलं असेन पण समाधान होत नाहीं. (पत्र वाचते:–)" माझे मनमोहिनी, "माझी बिलकुल योग्यता नसतांही मी तुजवर अनिवार प्रेम करण्याचें धाडस करित "आहें. क्षमा कर. एखाद्या दुर्गंधांत रूतून गेलेल्या कीटकाप्रमाणें माझी स्थिति

"झाली आहे. प्रिये! तूं केवळ आकाशांतील एक तेजस्वी तारा आहेस. तुझ्या "दीव्य तेजाकडे पहात मी क्षूद्र कीटक तसाच चिखलांत आनंदानें राहून, माझ्या "जन्माचें सार्थक्य झालें असें मानीन. तुझ्या वाड्याचा तट ओलांडित असतांना, "माझ्या बाहूस जखम पडली व तींतून जें रक्त निघालें त्यानेंच हें पत्र लिहिलें "आहे. इतकें धाडस केल्याबद्दल आपल्या सेवकास क्षमा कर." ह्या तरुणाचे हे प्रीतीचे शब्द वाचून माझी अगदीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली आहे. (कपाळावर हात मारून,) महाराजांनीं मजवर असें प्रेम कां बरें करूं नये? तसें जर ते करते तर आज असल्या पापी विचारांनां मी कधीं तरी थारा दिला असता काय? (कपाळावर हात मारते.) पण कसले हे राजे? मला एकटीला असें टाकून त्यांची स्वारी रानोमाळ भटकत आहे. केव्हां माझें नशीब उघडेल तें उघडो! जगदंबे आई, तूं मला पाव! (दार उघडून हुजऱ्या प्रवेश करितो. राणी पुष्पगुच्छ व पत्र लगबगीनें पदराखालीं लपविते.)

हुजऱ्या—(लवून मुजरा करितो) सरकार, महाराजांकडून हें पत्र आलें आहें. (पत्र देतो व मुजरा करून निघून जातो. राणी दचकल्या सारखी होते.)

राणी—(पत्र घेऊन बारकाईनें पाहाते.) महाराजांचें पत्र! (आनंदानें) मी खरोखरच पापिणी! महाराजांस विनाकारण दोष दिला. आई जगदंबे मला क्षमा कर. (पत्राचें चुंबन घेते व आनंदानें,) यांत कितीतरी प्रेम भरलें असलें पाहिजे! (लखोटा उघडते व वाचायास लागते तोंच बयाबाई मोठ्या तांतडीनें प्रवेश करिते, व राणीच्या हातांतून पत्र ओढून घेते.)

बयाबाई—(नम्रतेनें) बेअदबी माफ असावी सरकार! हुजऱ्यानें एकदम आंत येऊन बाईसाहेबांस पत्र दिलें ही त्यानें मोठी चूक केली. मोठमोठ्या राजघराण्यांत अशी चाल आहे कीं, राणीनें वाचायाच्या आधीं आमच्यासारख्या सेवकाजनानीं पत्र वाचून पाहिलें पाहिजे. बाईसाहेब, भलताच एखादा मजकूर आपल्या सारख्यांनीं वाचतां कामा नये. माझी राजवाड्यांत जी नेमणूक झाली आहे ती ह्याच करतां! क्षमा करा. मजवर उगाच अशा रागावूं नका. महाराजांची स्वारी शिकारीस गेली आहे. हें पत्र त्यांनीं राईच्या जंगलांतून पाठविलें आहे.

राणी—(रागानें) पुरे करा अत्त्याबाई आपलें भारूड? (स्वगत) येथें

बाई सर्वच प्रकार उलट. राजाचें पत्र राणीनें वाचायाचें नाहीं. चमत्कार म्हणायचा ? नशीब माझें ! (मोठ्यानें) बरें, आत्त्याबाई, कांहीं प्रेमाचा निरोप तिकडून आला असेल तर मेहरबानी करून वाचून दाखवावा. मी तिकडल्या बातमिसाठीं अगदीं भुकेली आहे.

बयाबाई—सरकार, ऐका (पत्र वाचते:-) " राणी मिनाबाई यांस " कळावें कीं, आम्हीं राजेसाहेबानीं चार रानडुकर ठार केले, व बाजरीच्या भाकरी-" वर न्याहारी केली. जंगलांत सोसाट्याचा वारा सुटला आहे."

राणी—(छातीवर हात ठेवून) हाय ! हायरे देवा ! हाच कायतो प्रेमाचा निरोप. हेंच कायतें महाराजांचें पत्र. आत्त्याबाई, पत्र तरी त्यांच्या हातचें आहे काय ? मला त्यांचें अक्षर पाहून तरी डोळे निववून घेऊं द्या.

बयाबाई—भलतेंच काय विचारतां ? बाईसाहेब, कारकुनांनीं पत्रें खरडायाचीं. आमचे महाराज कोठें रिकामे आहेत ? राजे लोक कधीं पत्रें लिहितात काय ? हें पत्र त्यांच्या चिटणीसानें लिहिलें आहे. (पत्र देते.) पहा सरकार. (राणी पत्र हातांत घेऊन निरखून पाहाते व अक्षर ओळखल्यासारखें दाखवून चपापते.)

राणी—(स्वगत) पत्रांतलें अक्षर ओळखीचें दिसतें. (आठवल्यासारखें करून,) होय ! तेंच, तेंच. मला जी प्रेमपत्रिका आली आहे, त्या सारखें हुबेहुब. काय बाई हा चमत्कार तरी ? (मोठ्यानें,) आत्त्याबाई हें पत्र आणलें तरी कोणी ?

बयाबाई—मला हें दुसरें पत्र आलें आहे त्यावरून इतकेंच समजतें कीं हें पत्र घेऊन येणाऱ्या इसमाचें नांव जयंतराव शिरके आहे. हे शिलेदार कान्होजीरावांचे भाचे लागतात. त्यांची महाराजानीं खुद्द आपले खासनिस म्हणून नेमणूक केली आहे. अरे कोण आहेरे तेथें ? (पडद्यांत पाहाते. हुजऱ्या पुढें येतो त्यास,) ते नवे शिलेदार बाहेर आहेत त्यानां आंत येऊंदे. (हुजऱ्या मुजरा करून जातो.) ऐकलेंत काय बाईसाहेब ? महाराजांचें पत्र जयंतराव शिरके घेऊन आले बरेंका ? (इतक्यांत रायबा प्रवेश करितो. राणीस पाहातांच त्याची अगदीं चमत्कारीक स्थिति होऊन जाते. तरी मोठ्या लगबगीनें मान खालीं घालून उभा राहातो.)

बयाबाई—जरा सरदार पुढें या. (राणीस) राणीसरकार हेच आपले नवे कारभारी. शिलेदार जयंतराव शिरके.

रायबा—(स्वगत) काय मी स्वप्न तर पहात नाहींना ? मी खरोखरच राणीसाहेबांसमोर उभा आहे काय ? (धांपा टाकीत राणीच्या जवळ येऊन मुजरा करितो.)

राणी—(रायबास) आपण दमलेले दिसतां ! राईंतून भरधांव घोडा फेंकीत आलांत वाटतें ? तिकडची स्वारी कशी काय आहे ?

रायबा—(नम्रतेनें) महाराज खुशाल आहेत. त्यांच्याच हुकुमावरून हें पत्र लिहिण्यांत आलें आहे. (दम टाकितो.)

राणी—महाराजांबरोबर कोणकोणते मानकरी आहेत ?

रायबा—(हात जोडून,) राणीसरकार, त्यांची सर्वांचीं नांवें मला माहिती नाहींत. मी राईंत सरकारस्वारींत गेल्याला सारा एकच दिवस झाला असेल. (दम टाकितो.) तेथें जाण्याच्या आधीं मी येथें शहरांतच होतो.

राणी—(विस्मित होऊन) काय म्हणतां ? गांव सोडल्याला सारा एकच दिवस झाला ?

रायबा—(लवून) होय सरकार. (स्वगत) काय हें सौंदर्य ! धन्य आमचे महाराज कीं त्यांस असलें रत्न लाभलें ? मला आज ग्लानी आल्यासारखें कां बरें होत आहे ?

बयाबाई—(रायबास) ऐकलेंत काय ? जयंतराव शिरके आपणांस महाराजानीं राणीसाहेबांचें खासनिस नेमिलें आहे. (रायबा भांबावल्यासारखें करून एकाएकीं मूर्च्छा येऊन खालीं पडतो. वृद्ध पिराजी दुरूनच त्याजकडे टवकारून पाहातो.)

राणी—अगबाई ! ह्या सरदारास कांहींतरी होत असलें पाहिजे, त्याशिवाय हा असा एकदम मूर्च्छा येऊन पडणार नाहीं ! सुगंधी, धांव धांव, पाणी आण, त्याला सावध करूंया. (रायबाच्या बोटांतील सलयाकडे पाहून चकित होते.) अगबाई ! (स्वगत) हें काय मी पाहातें आहे ? तो पुष्पगुच्छ ज्या सलयांत रोंवलेला आहे तो अगदीं ह्यासारखाच आहे. (आपल्या चोळींतून हलकेंच पुष्पगुच्छ काढते व सलयाकडे पाहाते, तोंच रायबाची व तिची दृष्टादृष्ट होते.)

रायबा—(स्वगत) काय राणीनें माझा पुष्पगुच्छ आपल्या हृदयाजवळ ठेविला आहे अं ? आतां मला मरण आलें तरी पत्करेल ! (पूर्ववत् मूर्च्छा

येऊन पडतो. सुगंधी लगबगीनें त्याच्या डोळ्यांस पाणी लावते व अंगावरही गुलाबाचें पाणी शिंपडते.)

राणी—(आपल्याशींच) होय ! हाच ! हाचतो तरूण, मजवर जिवापाड प्रेम करणारा तो हाच ! अंतरखूण पटली ! (मोठ्यानें सुगंधीस) तिकडून पत्र लिहिण्याची आज्ञा होऊन, नंतर भरधांव घोडा सोडून राईंतून एकदम येथें पाठवून देण्यांत आलें, मग ह्या शिलेदाराची अशी स्थिति व्हावी यांत नवल तें कोणतें ?

सुगंधी—(आश्चर्यानें) सरकार, पण यांनीं पत्र लिहिलें हें आपण कसें ताडलें ? (राणी दांत चावते.) मी तर बाईसाहेब यांना असें बोलतांना ऐकलेंच नाहीं ? (रायबा सावध होतो व उठूं लागतो त्यास,) हं, शिलेदार उठूं नका, तसेच पडून रहा. पुनः घेरी येईल म्हणून सांगतें. (स्वगत) येथें राजवाड्यांत आमच्या राणीसाहेबांच्या महालाभोंवतीं मेलीं सारीं म्हातारीं माणसें ठेविलीं आहेत. त्यामुळें मला तर बाई ह्या तरुणास पाहिल्यावर चैन पडेनासें झालें आहे ? तसें वाटणार नाहीं तर काय ? मी तर बोलूनचालून चाकर माणूस, पण आमच्या राणीसाहेबांचें मन देखील चलबिचल होऊन गेलें आहेसें दिसतें ! (राणीकडे पाहून,) पहा आमच्या बाईसाहेबांची अगदीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली आहे. ह्या तरूण सरदाराची आमच्या महालावर नेमणूक झाली हें फार बरें झालें. (पिराजी तडफडल्यासारखें करितो तिकडे पाहून,) अगबाई ! हा मेला थेरडा असा वेड्यासारखा चवताळून कांवरें येथें पहात आहे ?

राणी—(सुगंधीस,) ह्या शिलेदारास उघड्यावर न्यावयास हुजऱ्यांस सांग बरें ? त्यास तेथें नेल्यावर खात्रीनें बरें वाटेल. (सुगंधी जाते. राणी रायबाकडे प्रेमानें पहाते. दुरून पिराजी टवकारून पाहातो व बयाबाई राणीकडे पाहून डोळ्यास आंढ्या चढविते.)

बयाबाई—रागानें (स्वगत) छे ! छे ! गोषांतील वायकांस हें शोभत नाहीं. राजघराण्यांतील स्त्रियानीं एखाद्या तरुणाकडे असें पहाणें अगदींच अयोग्य. (मोठ्यानें) राणीसरकार चला आपण दुसरीकडे जाऊं या. (सुगंधी हुजऱ्यास घेऊन येते. हुजरे रायबास उचलून आंत नेतात. सुगंधी त्यांच्या मागोमाग जाते, तीस थांबवून,)

राणी—अग सुगंधी! तूं कोनई ह्या शिलेदाराच्या तैनातींत जवळपास ऐस समजलीस. त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था लाव. ध्यानांत ठेव बरें.

सुगंधी—(मोठ्या लगबगीनें) बरें आहे सरकार. (जाते.)

राणी—(जाता जातानां) काय बापड्याची ही अवस्था. मला वाटतें हा धांपा टाकित व मध्यें विश्रांति घेतल्याशिवाय आला म्हणूनच हें असें झालें असावें.

(राणी व बयाबाई जातात. पिराजी चवताळल्यासारखा तरवार उपसून, ज्या बाजूनें रायबा गेला तेथें पडद्याकडे पहात पुढें येतो.)

पिराजी—हें पहाण्यापेक्षां माझे डोळे फुटले असते तरी हरकत नाहीं ? येथें महालांत आमच्या सारखे पोक्त शिलेदार असून हें कालचें कारटें आमच्यावर गमजा लावणार कीं काय ? अरेरे! मी इतकी मेहनत घेऊन कलप लावून माझे केंस काळे भोर केले ते सर्व व्यर्थच कीं काय ? नाहीं. नाहीं. जोंपर्यंत माझ्या ह्या हाता-मध्यें ताकद आहे तोंपर्यंत मी तिळभरसुद्धां असल्या तरण्या बांडांची डाळ शिजूं देणार नाहीं! अरे गबरू! तुझ्या तोंडाचा अजून जार वाळला नाहीं. तूं काय समजतोस ? येथें राजवाड्यांत राणीकडे प्रेमपूर्वक पहाण्याचा हक्क तुझा कीं माझा याचा निर्णय माझी ही तरवार, लेका ही तरवार, करील!

[निघून जातो.

प्रवेश ३ रा.

[**स्थळः**—राजवाड्यांतील एक खोली. रायबा विचार करीत कोचावर पडला आहे.]

रायबा—(आपल्याशींच,) मजसारखा ह्या जगांत दुसरा कोणी सुखी प्राणी नसेलच ? आज तर मी अगदीं कृतकृत्य झालों. ह्या सुंदरीच्या मजवरील प्रेमा-विषयीं माझी आतां वालंबाल खात्री झाली आहे. रायबा, तूं राजापेक्षां देखील जास्त नशिबवान् आहेस खास. आहाहा! बा पुष्पगुच्छा तुझें केवढें भाग्य कीं, ज्या ठिकाणीं आमच्या सारख्यांना नुस्ती दृष्टी फेंकणेंसुद्धां अशक्य तेथें तुला सन्मा-नपूर्वक राहाण्यास मिळावें ? काय तें सौंदर्य! आणि कितीतरी दयाळु स्वभाव ? आमच्या महाराजांस म्हणावें तरी काय ? अहो असलें अलौकिक स्त्रीरत्न साध्य झालें असतां त्यांनीं त्याचा उपभोग कां बरें घेऊं नये ? आजचा प्रकार पाहून मला एका तऱ्हेचा हर्षवायु झाला म्हणायचा! येरव्हीं माझ्या

डोळ्यासमोर अंधेरी आलीच नसती. राजवाड्यांतील माणसें प्रेमासाठीं भुकेलेलीं दिसतात. जशी धनीण तशींच तिची चाकरमाणसें. मजबरोबर त्या दासीनें किती तरी प्रेमाचें वर्तन केलें? व मी जेव्हां तिचे आभार मानले तेव्हां तिला केवढा तरी आनंद झाला!

(पिराजी जामदार हळूहळू हातांत नागवी तरवार घेऊन प्रवेश करितो. जवळच टेबलावर ठेविलेल्या रायबाच्या तरवारीबरोबर आपली तरवार लावून पहातो व आपली तरवार लहान आहे असें पाहून, ती म्यान्यांत घालतो. हा सर्व प्रकार पाहून रायबा चकित होतो व पिराजीकडे पाहात तटस्थ राहातो.)

पिराजी—(पुढें येऊन,) अहो राव त्यांत काय मोठें आहे ? मी दोन सारख्या तरवारी मागवितो म्हणजे पुरे—

रायबा—(उठून,) अहो वृद्ध शिलेदार, आपण काय बोलतां? कोणाशीं बोलत अहांत ?

पिराजी—(मिशीस पीळ देतो व हांसून) अहो बहादुर, मला वृद्ध म्हणतां ? आपण चुकतां ? मी कोण आहें हें कदाचित् आपणांस माहित नसेल. मी येथला वाड्यांतील जामदार असून, खुद्द शाहुमहाराजांकडून आमच्या आजे सासऱ्यास, मोत्याचा तुरा व पदक बक्षीस देण्यांत आलीं होतीं. इतकेंच नाहीं बरें ? आमच्या घराण्यास मोर्चेल, दिवटी व छत्रीचा मान होता समजलांत ! (श्वास टाकितो.)

रायबा—बरें मग आपलें काय म्हणणें आहे ?

पिराजी—अहो नवे तरणे गृहस्थ जरा धीर धरा मी काय सांगतों तें ऐका. मी भरज्वानींत असतांना, मिसरूट कोठें नुकतीच फुटली असेल नसेल तोंच एका फटाकडीवर आमचा दिल जडला. (दम टाकितो.) अहो जवानमर्द ऐकलंत काय ? तुमच्यासारखा एक अक्कडबाज आमच्या गांवीं आला आणि लागला आमच्या छबकडीच्या पाठीशीं. (दम टाकितो.) ऐकलेंत काय ? हा पत्राजखोर होता आमच्या पलटणींत एक दफेदार. पण आमच्या पुढें त्याचें काय चालणार आहे ? मी त्याच्या बरोबर लढलों व त्यास एकदम जमिनदोस्त करून टाकिलें ! (श्वास टाकितो.) मला कोठें साठावें वर्ष लागलें असेल नसेल, तोंच एका चटकचांदणीवर माझें मन बसलें. पण तिच्या पाठीमागें तो बुवाजी पवांर अगदीं कुत्र्याप्रमाणें लाळ

घोंटीत होता. (मिशीस पीळ देतो व श्वास टाकितो.) पण ह्या पठ्यानें काय केलें ? (तरवार म्यान्यातून काढून फिरवितो.) त्याजबरोबर युद्ध करून त्यास आपल्या पूर्वजांच्या भेटीस पाठविलें—

रायबा—(आश्चर्यानें) मग आजोबा आपण मोठे जाहांबाज कागडे दिसतां ! (हांसतो.) पण तुमचें म्हणणें तरी काय ? माझ्या लक्षांत येत नाहीं अजून—

पिराजी—बाबारे, गड्या, ऐक ! आतां माझी उमर असेल पाऊणशेंच्या घरांत. (इतक्यांत सुगंधी हलकेंच दारापाशीं येऊन ऐकत उभी राहाते.) माझ्यातलें सारें पाणी आटलें नाहीं बरें. चल उद्या पहांटेस त्या पिंपळाचे पारावर आपण चार तरवारींचे हात खेळूंया. राणीकडे प्रेमपूर्वक पाहण्याचा हक्क तुझा आहे कीं माझा याचा एकदांचा निकाल लावून टाकूं. (जयंतराव चकित होऊन पाहतो.) तुमचें नांव काय बरें ? जयंतराव शिरकेना ? मला म्हणतात पिराजीराव जगताप, राजवाड्यांतील जामदार.

रायबा—अहो वृद्ध शिलेदार, मी राणीसाहेबांकडे प्रेमानें पाहिलें. बरें, मग ? ईश्वरानें आम्हांस जे नेत्र दिले आहेत त्यांचा आम्ही उपयोग केला त्यांत तुमचें घोडें कोणीं मारलें ? (हांसून) अहो कुरापतखोर म्हातारेबाबा, यांत आपला निव्वळ जुलूम आहे.

पिराजी—म्हातारा कोणास बोलतोस ? (रागानें डोळे वटारतो.) घोडें मारलें म्हणजे यांत काय संशय ? असा नामर्दासारखा काय करतोस ? आमच्याबरोबर लढाई करण्यास तयार हो. समजलास.

रायबा—(खंती होऊन) आपली मर्जी आहे, मग तसें होऊं द्या.

सुगंधी—(स्वगत) अगबाई ! हा थेरडा यांच्याबरोबर लढणार वाटतं ! मोठाच चमत्कार म्हणावयाचा. राणीसाहेबांस हें सर्व जाऊन सांगतेंच आतांच्या आतां. (धांवत निघून जाते.)

पिराजी—अहो कुरेंबाज छोटे गृहस्थ, मी कोण आहे हें आपणास कदाचित् बरोबर ठाऊक नसेल तर सांगतों. (मिशीवर हात फिरवून,) आमच्या घराण्यास मोर्चेल, दिवटी व छत्रीचा मान मिळालेला आहे. मी दिसतो जरी फाटका तरी त्यावर जाऊं नका. मी आपल्यासारखे नादान बच्चे खेळविलेले आहेत समज-

लांत काय? मी जरी म्हातारा आहें, तरी आपल्यासारखे काळे कुळकुळीत केंसाचे मुसमुशीत अलबेले पाहिले कीं, माझा संताप होऊन जातो. पण त्याच तरुणांकडे रूपवती स्त्रियांनीं प्रेमयुक्त पाहिलें म्हणजे माझ्या पायांची आग मस्तकास जाऊन पोंहोंचते. (श्वास टाकितो.) अहो छोटे गृहस्थ आपलें मूर्छा येऊन पडण्याचें काम फार सुबक झालें. आपण कधीं तरी नाटकांत रंगला आहांत असें वाटतें!

रायबा—(त्रासून) अहो खुळावलेले वृद्ध सरदार—आपणांस खात्रीनें म्हातारचळ लागला आहे. त्याशिवाय आपण ही अशी व्यर्थ वटवट लाविली नसतीत.

पिराजी—(त्वेषानें) अरे बेरडा! बच्चाजी कोण खुळावले आहे हें तुला उद्यां समजेल बरं? माझे दांत पडले आहेत. संधीवात झाल्यामुळें माझा हात थरथरतो, तरी देखील तुझ्या सारख्या पोराला केव्हां हात दाखवीन असें मला होऊन गेलें आहे. अरे तूं मला असा तसा समजतोस कीं काय? (हांसून, मिशीवर हात फिरवून,) अरे बाबा, आमच्या घराण्यास मोर्चेल, दिवटी व छत्रीचा मान आहे. अरे तुझ्यासारख्या छप्पन्न पोरांस मी खेळविलें आहे! मजपुढें तुझी लटपट ती काय चालणार?

रायबा—(नमस्कार करून,) नाहीं शिलेदार. मी तर आपणास पहा-तांच घाबरून गेलों आहें. (हांसतो.)

पिराजी—अरे घाबरलों असें म्हणून सुटण्यास पाहातोस कीं काय? पण मजपुढें तें कांहीं चालावयाचें नाहीं. ऐकलेंस काय? उद्यां पहांटेस त्या पिंपळाच्या पारावर–हं! खबरदार विसरशील तर. आपणांपैकीं जो जिंकील त्यासच राणीसाहेबांकडे पहाण्याचा हक्क. नीट ध्यानांत ठेव.

रायबा—(कंटाळून स्वगत) हें मध्येंच कसलें विघ्न आलें? उगीच ह्या म्हाताऱ्यानें डोकें पिकविलें आहे. (मोठ्यानें) फार उत्तम आहे बरें. म्हातारे शिलेदार, राम राम. (निघून जातो.)

पिराजी—(मोठ्यानें हासतो.) हां! हां! हां! कशी पण अगदीं त्या दिमाखखोराची त्रेधा उडवून दिली. दिसतोय बेटा अगदींच शेंदाड शिपायी. माझी चर्पटपंजरी ऐकून अगदीं भिऊन गेला! (हांसून) ह्या कालच्या पोरट्याची काय छाती राणीकडे पहाण्याची. जोंपर्यंत ह्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत तरी तशा रीतीनें पहाणारांची बत्तीशीच रंगवीन! कसापण मी घाबरलों असें म्हणून माझ्या

तावडींतून सुटायास पाहात होता ! अरे भ्याडा, उद्यां सकाळीं तुला पाहून घेईन. तूं आमच्या ह्या तरवारीस खात्रीनें बळी पडणार. अरे रणभिरू ! तूं काय लढणार तें दिसतच आहे. (पडद्याकडे पहातो) अरेच्या ? ही तर राणी-साहेबांची दासी सुगंधी ! हिचें येथें काय बरें काम ? काय मला भुलवायाला तर नाहींना येत ? (आपली आरसी काढून तींत पहातो. सुगंधी येते तीस,) कायग ? ए पोरी तूंग कशाला येथें आलीस ? बोल, बोल ! बोल ! (सुगंधी नखरा करीत करीत पिराजीकडे पहाते. पिराजी तिजकडे पहात पहात जातो व एकदम तिचा मुका घ्यावयास जातो. ती दूर पळते.)

सुगंधी—इश्शग बाई ! आपण एवडे मोठे शिलेदार आणि हें काय भल-तेंच ? (मुरका मारिते.)

पिराजी—(हांसून) अग ए, मग येथें कां आलीस. सांग सांग लवकर, नाहीं तर पहा पुन्हां एकदां-हं ! घेतल्याशिवाय राहाणार नाहीं.

सुगंधी—(नखरा करीत) अहो पिराजीराव जामदार, अहो राव, आपल्यापाशीं कीनई आमच्या राणीसाहेबांचं कांहीं नाजूक काम आहे. त्यांनीं आतांच्या आतां त्यांच्या महालांत आपणाला बोलाविलें आहे. चला, चला झटपट—

पिराजी—(हांसून) काय म्हणतेस तरी ? राणीसाहेबांनीं मला बोला-विलें. असें त्यांचें काय काम आहे तें तर सांग मला आधीं ?

सुगंधी—तें काय मला माहीत ? पण अहो राव चला लवकर.

पिराजी—अग जरा वेळानें आलों तर नाहीं का चालायाचें ? तूंच पहा बरें माझा अंगरखा कसा अगदीं चुरून गेला आहे. म्हटलें राणीसरकारापुढें याव-याचें. तेव्हां नीट व्यवस्थेनें नको का नको का यायला ? (तिच्या हनवटीस हात लावितो ती हात झिडकारिते.)

सुगंधी—(हांसून) अहो राव, आपण पडलांत शिपायीगडी, नी कसली बायल्याप्रमाणें टाकमटिकली घेऊन बसलांत ? आपल्यासारख्या वयोवृद्ध पुरुषास हें शोभतें तरी काय ? अहो चला असेच या.

[पिराजी मंदिल सारखा करीत करीत मिशीवर पीळ देत देत व लहानशा आरशींत पहात पहात पडद्यांत जातो. सुगंधी दिवे ओंवाळावे असें खुणवीत त्यास वेडावीत त्याचे मागून जाते.

प्रवेश ४ था.

[स्थळ:—राणीचा महाल. राणी कोचावर विचार करीत बसली आहे.]

राणी—ह्या तरुणास पाहिल्यापासून माझी तर बाई अगदींच चमत्कारिक स्थिति होऊन गेली आहे. त्याच्या त्या रम्य मूर्तीशिवाय मला कांहींच दिसत नाहीं ! त्यास केव्हां डोळे भरून पाहीन असें मला होऊन गेलें आहे. ह्या तरुण शिलेदाराबरोबर आमचे जामदार उगाच कुरापत काढून लढायास सिद्ध झाले आहेत असें सुगंधीजवळून कळलें. हा थेरडा खुळावला आहे यांत संशय नाहीं. (विचार करिते.) होय. तसेंच करावें. म्हणजे आमच्या दरबारी मंडळींत बभ्रा झाल्याशिवाय ह्या स्वारीची उचलबांगडी करितां येईल. चला तर आपण बाबांसच लिहूं या. (पत्र लिहिते व लखोट्यांत बंद करून तें चंदनी पेटींत ठेविते.) हा म्हातारडा एकदां अटकेंत पडला म्हणजे मग प्रियकरास धोका नाहीं. (पडद्याकडे पाहून चाहूल ऐकल्यासारखें करिते.) ही सुगंधी पिराजीस घेऊन आलीच. (सुगंधी व पिराजी प्रवेश करितात. पिराजी मोठ्या अदबीनें राणीस मुजरा करितो.)

राणी—(हास्य मुख करून) पिराजीराव जामदार, आपण लवकर आलांत फार बरें झालें. आपल्याजवळ माझें तसेंच निकडीचें काम होतें. (हांसून) तसेंच अगदीं नाजूक काम आहे, म्हणून मुद्दाम बोलाविलें बरका ? आपल्या तोडीचा विश्वासू नोकर येथें राजवाड्यांत दुसरा कोण आहे ?

पिराजी—(राणीकडे न पाहतां हात जोडून) राणीसाहेबांच्या तैनातींत हा सेवक हजर आहे. आज्ञा करावी सरकार.

राणी—(सुगंधीकडे पाहून हांसते.) माझी ही सुगंधी म्हणत होती कीं, आपण मजकरितां हवें तें कराल. खरंच का पिराजीराव ? (सुगंधी हांसते.)

पिराजी—(हात जोडून) आपल्यासाठीं मी प्राण देण्यास सुद्धां तयार आहें. हवी ती शपथ घेऊन सांगतों.

राणी—(हांसून) आपण बोलतां ते खरें कीं काय याचीच मला प्रचीत पहावयाची आहे.

पिराजी—काय आज्ञा आहे सरकार. विलंब लावूं नका. बोला एकदाच्या. (हात जोडून) मी तयार आहें.

राणी—पिराजीराव, आपली म्यानांतून तरवार काढा पाहूं? आपण शूर मराठे पडलांत तेव्हां तरवारीची शपथ पुरे.

पिराजी—(तरवार बाहेरकाढून) ह्या पवित्र तरवारीची शपथ घेऊन सांगतों कीं, ह्या कुडींत जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत, आपणांकरितां हवें तें करण्यास हा बंदा तयार आहे.

राणी—बरें आहे जामदार. ही पाहीलीत का चंदनी पेटी ? (पेटी दाखविते.) ही पेटी घेऊन ती कोणासही न दाखवितां, माझ्या माहेरीं ह्या घडीस निघून जा. ती बाबांस द्या व येथील क्षेमसमाचार त्यांस कळवा. आपण श्रृंगारपुरास गेलांत हें येथें कोणासही समजतां कामां नये.

पिराजी—(हात जोडून,) सरकार, उद्यां निघालों तर नाहीं का चालायाचें ?

राणी—नाहीं बरें. आतांच्या आतां मोहनपुर सोडिलें पाहिजे. आपल्यासाठीं बगीखान्यांतून घोडीं तयार ठेविलीं आहेत, तर निघा एकदम.

पिराजी—(स्वगत) अरेरे घात ! घात! एकीकडे आड आणि एकीकडे विहीर असें मला होऊन गेलें आहे. ह्या सुंदर राणीचें मन दुखविणें माझ्या अगदीं जिवावर येतें. परंतु इकडे त्या कार्ट्याची आठवण झाली म्हणजे पुन्हा अंगाची अगदीं लाही लाही होऊन जाते. (दांतओंठ खाऊन,) काय करूंरे ! बरें आहे लेका पाहून घेईन. बचा तूं कोठें सुटणार आहेस माझ्या तडाख्यांतून. माझ्याशीं गांठ आहे! (सुगंधीकडे पाहातो.) अग सुगंधी, बाई इकडे ये. (सुगधी जवळ येते, हा तिच्या कानाशीं लागतो.) ऐकलेंस काय ? विसरूं नकोस बरें? त्यास जरूर इतका निरोप पोहोंचेलसें कर. आणि सांग कीं, श्रृंगारपुराहून परत आल्यावर आपण त्या गोष्टीचा विचार करूं. मी सांगतों तसें जाऊन सांग बरें का? (सुगंधी जाते.) राणीसरकार, हा सेवक आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. (राणीजवळून चंदनी पेटी हातांत घेतो व मुजरा करून मोठ्या झपाट्यानें निघून जातो.)

राणी—(आनंदानें) कसें तरी करून ही पिडा गेली हें एक बरें झालें ! नाहीं तर ह्या थेरड्यानें त्या बिचाऱ्यास उगीच त्रास दिला असता. प्रियकरा, आतां निर्धास्त रहा !

[निघून जाते.

[पडदा पडतो.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

[**स्थळः**—प्रतिनिधींच्या कचेरीस जाण्याचा मार्ग. मानकरी व दरबारी मंडळी आपआपसांत खलबतें करीत चालली आहे. कित्येकांच्या हातांत कागदपत्रें आहेत.]

सूर्याजी—अहो याला म्हणावें नशीब. हं हं म्हणतां ह्या आगंतुक गृहस्थानें, सर्वांच्या वर तान केली कीं नाहीं पहा! (कान्होजीकडे पाहून) अहो कान्होजीराव, याचें सर्व खापर आपल्या डोक्यावर फोडलें पाहिजे. (रागानें) अहो आम्हां दरबारी मंडळींत कोणीचक योग्य नव्हते? आम्हीं सर्व सरदारांनीं व्यर्थच का काळ्याचे पांढरे केले? काय परसोजीराव, कां बोलत कां नाहीं?

परसोजी—(हांसून) सूर्याजीराव, आपण म्हणतां तें अगदीं खरें आहे. हे सर्व नशिबाचे खेळ होत. नाहींतर आमच्यासारखे कसलेले दरबारी लोक पदरीं असतांना असें व्हावें म्हणजे आमचें सर्वांचें दुर्दैव म्हटलें पाहिजे. मामासाहेबांच्या अमदानींत असें कदापीही घडलें नसतें. बाकी सूर्याजीराव ह्या छिचोर पोराचा भाग्योदय, त्याची राणीसाहेबांकडे नेमणूक झाल्यापासून तर बुवा फार झपाट्यानें झाला. (डोळे मिचकावतो व हांसतो.)

नेमाजी—(हांसून) अगदीं अगदीं ठीक बोललांत. ठीक. तेथूनच स्वारीबद्दल शिफारस झाली—

पदाजी—(मिशीवर पीळ देत) अहो शिफारस शिफारस काय घेऊन बसलांत? शिफारस केली म्हणून महाराज कांहीं बोळ्यानें दूध पीत नव्हते. त्यांनीं कांहीं तरी विचार करायाचा होता कीं नाहीं? जयंतरावाचे ओंठ पिळले, तर दूध निघेल! महाराजांस खरोखर वेड लागलें आहे.

कान्होजी—अगदीं बरोबर. अगदीं बरोबर! अहो माझा भाचा झाला म्हणून खरें बोलायाला काय चोरी आहे? खऱ्याला मरण नाहीं समजलांत. दरबारच्या मंडळीवर सर करावी म्हणून त्यास हिंमतबहादुर केला! असा थोरला किताब त्या कोंवळ्या पोरास दिला तो दिला. पण तेवढ्यानें कोठें पुरें झालें आहे? बस डोक्यांत काय शिरलें कोणजाणें. एकदम आमच्या ह्या जयंताला प्रतिनिधि

केलें ! याचा अर्थ तरी काय? अहो अंगीं कर्तबगारी असली म्हणून काय झालें? वयाकडे पहायाचे नाहीं कीं काय ?

पदाजी—अगदीं अगदीं रास्त बोललांत. (मान हालवितो.)

नेमाजी—यांत आपणां सर्व सरदारांची मानखंडना झाली आहे. आपण सर्वांनीं महाराजांस राग दर्शविलाच पाहिजे.

रुपाजी—(हांसून.) अहो भलतेंच काय घेऊन बसलांत? तुमच्याआमच्या सारख्यांच्या हांतून काय होणार आहे ? "तुका म्हणे उगी रहावे जें जें होईल तेंतें पहावें" तें अगदीं बरोबर आहे. अहो जोंपर्यंत सर्व सूत्रें आपल्या राणीसाहेबांच्या हातीं आहेत, तोंपर्यंत आपणां सरदारांचें काय चालणार आहे ? मग व्यर्थ वाचाळता कां करा ? (डोळे मिचकावितो.) अहो, आपला जयंतराव रुपानें देखणा आहे. बोलणारा बांका आहे ! आपल्या राणीसाहेब मोठ्या गुणग्राहक आहेत. मग तो प्रतिनिधि झाला यांत विशेष तें काय ? (हांसून.) त्याच्या गुणांचें चीज राणीसाहेबच करूं शकतील. (सर्व सरदार हांसतात. रायबा प्रतिनिधींचा भव्य पोषाख चढवून हळूंच येतो, व एकेबाजूस लपून उभा रांहातो.)

नेमाजी—कोतवालसाहेब आपण अगदीं स्पष्टवक्ते आहांत! आमच्या राणीसाहेबांमुळेंच तर ह्या जयंताचें इतकें नशीब फळफळलें ! खरोखरच महाराजांचें डोकें ठिकाणावर नाहीं. तसें जर असतें तर राज्यकारभार असल्या तरण्या बांडाचे हातीं देऊन, ते त्या गोसावड्याबरोबर रानोमाळ भटकत राहिले नसते. येथें राजवाड्यांत बाईसाहेबांनीं नाहीं नाहीं ते ढंग आरंभले आहेत. पण बोलावें कोणी ? आपल्या सारख्यांस तर डोळ्यावर कातडें ओढून मुकाट्यानें रहावें लागत आहे !

पदाजी - (हांसून) अहो राव, ह्या कालच्या पोराचें अजून बाळकडू जिरलें नसेल आणि त्यास काय म्हणे 'हिंमतबहादूर' किताब दिला व राजाचे प्रतिनिधि, केलें! वः माकडाच्या हातांत कोलीत त्याप्रमाणें ही स्थिति झाली आहे, आणखी काय ? तुमच्या आमच्यासारख्या वयोवृद्ध सरदारांत पाणी कोठें उरलें आहे ? झांबडझुंब हत्ती, अबदागीर, पालखी, घोडे, इनामगांवें हीं आपण व्यर्थच पटकाविलींत, अरेरे व्यर्थ केंस पिकविले म्हणावयाचे !

कान्होजी—ह्या मानहानीसाठीं तर हें मोहनपूर सोडून कोठें तरी निघून

जावेंसें वाटत आहे ! आमच्या राजेसाहेबांस जर वैताग आला होता तर अंगास राख फांसून बैरागी तरी व्हावयाचें होतें. मग असल्या तरण्या ज्वान पोरीबरोबर लग्न कां केलें ? अहो ही भल्याची दुनिया नव्हे. सिधोजीरावांनीं ती हलकट पोर आणून राजाच्या गळ्यांत बांधिली. तिचें सौंदर्य पाहून हा संबंध जुळविला. पण जी मुळापासून हलकट ती हलकट ! तिनें मामासाहेबांचा उपकार कसा फेडला हें आपणांस सांगावयास पाहिजे असें नाहीं अहो सौंदर्याबरोबर कुलीनता असतेच असें नाहीं ! राणीचें प्रेम राजावर नाहीं. ही अल्लड पार आमच्या जयंतावर भाळली आहे. अहो रूपाजी अरेराव, आम्ही बोलून दाखवीत नाहीं इतकेंच. बाकी डोळे असून अजून तर बुवा आंधळे झालों नाहींत. ह्या चाणाक्ष पोरीमुळें तर आमच्या जयंताला हें पद प्राप्त झालें आहे. महाराज रानोमाळीं हिंडत बसले आहेत. पहिली बायको मेली म्हणून काय झालें ? अशा कोणाच्या बायका मरत का नसतात ? आपल्या ह्या राज्याची अशी स्थिति होईल हें कोणाच्या स्वप्नीं तरी होतें काय ?

रुपाजी—(हांसून) कायहो कान्होजीराव, हे तुमचे भाचे लहान असतांना असे दिवे लावतील असें तुम्हास वाटलें होतें तरी का ?

पदाजी—(हांसून) ते कान्होजीरावांनां कशाला विचारतां ? मला सारें माहित आहे ! अहो मामासाहेबानीं त्यास ताळ्यावर आणला नसता तर त्याचे कुत्रा देखील हाल न खाता. त्याचे ते पूर्वींचे रंगढंग आठवले म्हणजे आमचे सध्यांचे प्रतिनिधि हिंमतबहादूर जयंतराव, व पूर्वींचा दिवाळखोर जयंत्या, ही एकच व्यक्ती आहे असें कोणीही कबूल करणार नाहीं !

परसोजी—कर्जांत अगदीं बुडून गेली होती स्वारी म्हणून ऐकलें होतें. (पडद्याकडे पाहून, स्वारीची वेळ झाली येण्याची.

पदाजी—(मकाजीस एकेबाजूस,) आपल्या खात्यांत एक जागा रिकामी झाली आहे म्हणून ऐकतों. खरेंच काय ? तसें जर असेल तर पहा बुवा आमच्या त्या मेव्हणीच्या भाच्यास ठेवतां येईल तर ?

मकाजी—(कांकूं करित) पण–तरी–पण–(डोकें खाजवितो,) होय, पण पाहिलेंत काय ? त्याचें कांहीं विशेष नाहीं, म्हणा; पण आमच्या मावशीचा

पुतण्या तो उदाजी त्यास तेवढी किल्लेदाराची जागा कसेंही करून देण्यास विसरूं नका. तो असा तसा नाहीं बरें. हा मकाजीराव आपला तळीराम गार करीलच.

रुपाजी—(हांसून) मोठी बुवा मजा आहे ज्याचें चालतें तो हात मारतोच आहे. कायहो मकाजीराव ? त्या मक्तेवाल्याचें काम केलेंत ना ? तुमचे हात ओले करून, आमची देखील तुंबडी भरण्याचें त्यानें वचन दिलें आहे. नाहीं तर गरज सरो आणि वैद्य मरो, त्यांतला प्रकार व्हावयाचा म्हणून आपणास विचारतों.

कान्होजी—(हांसत हांसत) अहो रूपाजीराव अरेराव, कोतवाल साहेब कसें काय ? गणेश शेटजींस आपण सोडून दिलेंत म्हणून ऐकलें ? शेटजींच्या दोन सुरेख मुली आहेत ! (सर्व सरदार हांसतात.) खरेंच कीं काय ? तसें जर असेल तर बुवा आपली चैन आहे. ह्या आपल्या मोहनपुरांतील श्रीमान शेट सावकारांनीं गरीब लोकांच्या सुंदर बायकापोरी पळविण्याचा नी आपल्या तडाख्यांत सांपडण्याचा आणि आमचे खिसे चापून भरण्याचा जणू काय विडाच उचलला आहे. ओढाना बापडे पैसे खोऱ्यांनीं ! संभाळाहो पण. आमच्या हिंमत बहादुरांच्या कांनीं गेलें तर पंचाईत व्हावयाची. (हांसून) म्हणून मी म्हणतो कीं, अगदीं बेतानेंच होऊं द्या बरें काय ? मराठी राज्याची रीतच ही. ज्याच्या हातीं अधिकार त्यानें बेलाशक रयतेस लुटावें कोणी विचारता ना पुसता !

रुपाजी—(रागानें) काय म्हटलेंत ? माझी थट्टा आरंभली आहे वाटतें ! राव पण माझ्याशी गांठ आहे, समजलांत काय ? शिपायी गड्यांचा पगार गिळंकृत करून त्यांस ठकविण्यासारखा हरामखोरपणा, कान्होजीराव आपणच करावा !

कान्होजी—(तरवार उपसून) मला हरामखोर म्हणतां चला व्हा पुढें. मी जरी म्हातारा आहे तरी असला अपमान निमूटपणें सोसून घेण्याइतका नामर्द नाहीं समजलांत ! चला या पुढें हरामजादे !

रूपाजी—(तरवार उपसून) चला, चला,

(सर्व मानकरी एकमेकांच्या तोंडांकडे आश्चर्यानें पाहात उभे आहेत. रूपाजी व कान्होजी एकमेकांबरोबर लढत आहेत, तोंच रायबा एकदम पुढें येतो. त्यास पाहून सर्व सरदार भिऊन जातात व माना खालीं घालून उभे राहातात.)

रायबा—(रागानें) सरदारहो, काय आरंभलें आहे हें? तरवारी घाल, आपआपल्या म्यानांत. असलें असभ्य वर्तन आपणांसारख्या थोर सरदारांस मुळींच शोभत नाहीं. मीं तुमचीं सारीं खलबतें ऐकलीं व तुमच्या नीचपणाबद्दल माझी बालंबाल खात्री झाली. आपण मोठे विश्वासू व कार्यदक्ष म्हणून शेखी मिरवितां व ह्या राज्यांतील मोठमोठे हुद्दे मिळविण्यासाठीं आपण हापापलेले दिसतां. (हांसून)आपण आपल्या राजाची चांगलीच सेवा बजावीत आहांत. धन्य आहे आपली ! तुमचीं सर्व कारस्थानें मला समजून चुकलीं आहेत. तुम्हीं आरंभलें आहे तरी काय? आमच्या महाराजांची तब्बेत सध्यां ठीक नाहीं. तशांतून करामुळें आपली प्रजा हवालदील होऊन गेली आहे, याचें तुम्हांस कांहीं वाटत नाहीं काय ? ह्या दरबारांत पहावें तों ज्याचें फावेल तो खुशाल स्वतःचे खिसे चापून भरण्यास तयार ! देशहिताच्या लांबलांब बाता मात्र आपणांस चांगल्या ठोकतां येतात; पण प्रसंग पडेल तेव्हा एकही उपयोगी नाहीं अशी स्थिति होऊन गेली आहे ! (कान्होजी व रूपाजीकडे रागानें पाहून) राजनिष्ठ व सचोटीचे कामगारहो, सरकारची तिजोरी लुटण्याकरितांच आपली नेमणूक झाली आहे नव्हे काय ? अरेरे! तुमच्या ह्या चांडाळचौकडीची भाषणें मला ऐकाण्यास मिळालीं त्याऐवजीं माझे कान कां नाहीं फुटले ? दुष्काळामुळें आपल्या देशांत हाहाकार उडाला आहे. दरोडेखोरांच्या भीतिमुळें प्रजा त्रासून गेली आहे. गरीब शिपायांचा पगार न मिळाल्यामुळें ते बंड करण्याच्या विचारांत आहेत. सतत दंगे होऊन मुलूख उजाड झाला आहे आणि इज्जतदार सरदारहो, तुम्ही हा देशबुडवेपणा आरंभून एकमेकांचे गळे कापण्यास सिद्ध झालां अहांत, तर तुम्हांस म्हणावें तरी काय ? चला येथून चालते व्हा.

सूर्याजी—(खालीं मान घालून) प्रतिनिधि साहेब, असले शब्द ऐकून घेण्याची आम्हांला संवय नाहीं, आम्हांला राजीनामा द्यावा लागेल.

कान्होजी—(आपल्याशींच) अरे मी तुझा मामा त्याची कांहीं तरी लाजलज्जा ! मीच तुला या योग्यतेस आणलें त्याची फेड चांगली केलीस. (मोठ्यानें) आम्हांस राजीनामा देण्याची परवानगी असावी.

रायबा—(आवेशानें) राजीनामा देण्याला तयार झालांत याची शरम वाटली पाहिजे. समजलांत ! जा आतां येथून सर्वजण. चालते व्हा—

(रायबा रागानें पाय आपटीत निघून जातो. सर्व मानकरी खालीं मान करून एकामागून एक हळूहळू निघून जातात.)

मकाजा—(जातांजातांना) जबरी आहे ही स्वारी. आम्हां सरदारांस ह्याच्यासारखा तंबी देणारा वस्ताद अजून कोणींच भेटला नव्हता.

[निघून जातो.

प्रवेश २ रा.

[**स्थळ**:—राजवाड्यांतील एक खोली. रायबा सरकारी कागदाचें दप्तर पाहाण्यांत गढून गेला आहे तोंच हुजऱ्या प्रवेश करितो.]

हुजऱ्या—(मुजरा करून) सरकार, आपणाला हें पत्र पिराजीराव. जामदारांकडून आलें आहे. (पत्र देतो व हात जोडून उभा राहातो.)

रायबा—(पत्र वाचल्यावर) एकंदरीनें हा म्हातारडा श्रृंगारपुराहून परत आला. वेडारे वेडा ! मी ह्याचें काय घोडें मारलें कोणजाणें ? वेडा मज-बरोबर लढायास सिद्ध झाला आहे. (हुजऱ्यास) पिराजीरावास म्हणावें बरें आहे. उद्यां भेटल्यावर सर्व खुलासा करीन. त्यांस म्हणावें आमच्या वाड्यावरच या. येथें राजवाड्यांत बोलायास मिळायचें नाहीं ! (हुजऱ्या मुजरा करून जातो.) ह्या मूर्खशिरोमणीस म्हणावें तरी काय ? (पुनः कागद पत्रें चाळून वाचीत बसतो इतक्यांत राणी हलके हलके जवळच्या एका पडद्यामागून गुप्तद्वारानें पुढें येते व रायबाकडे पहात पहात, एके बाजूस उभी रहाते.)

राणी—(स्वगत) शाबास जयंतराव आपल्या नेकीची व कर्तबगारीची मला पूर्ण ओळख पटली ! असेच जर सर्व अधिकारी लोक असतील तर राज्यावर परचक्रें कां येतील ? अशा वीर पुरुषांची ज्यांस संगती प्राप्त होते त्या खरोखरच धन्य होत. (दीर्घ उःश्वास टाकून) मला राजवैभव प्राप्त झालेलें पाहून माझ्या माहेरच्या मंडळीला अगदीं आकाश पाताळ एक झालें आहे ! खरें जर पाहूं गेलें तर, माझ्या आप्तानां धन्य वाटण्यासारखें त्यांत काय बरें आहे ? बरोबर

आहे. गुलाबांची फुलें दुरून पाहाणारास अशींच मनोहर दिसायाचीं. खुडणारालाच काय ती कांट्यांची ओळख ! ह्या राज्यांत राणी म्हणवून घेण्यापेक्षां प्रतिनिधीण म्हणवून घेणें हेंच खरें भाग्याचें लक्षण समजलें पाहिजे ! या राजवाड्याची स्वामिणी मोठी भाग्यवान असें या शहरच्या स्त्रियांना वाटत असेल. पण बायांनों तुम्ही किती चुकत आहांत ! आपल्या नवऱ्याकरितां शेतावर भाकरी घेऊन जाणाऱ्या कुणब्रिणी, तूं देखील मजपेक्षां कितीतरी सुखी आहेस ! तुला सारा दिवस काबाड कष्ट काढावे लागतात हें खरें. पण तें सर्व प्रेमासाठीं आहे ! त्याची सर्व फेड प्रेम करित आहे ! तुला कदाचित् त्याचें कांहीं वाटत नसेल. पण जे प्रेमासाठीं भुकेले आहेत त्यानांच त्याचें महत्व कळेल ! तें जर मला प्राप्त होईल तर हा राजवाडा नंदनवन भांसेल. पण तें जर असेल तर राजवाडा कशाला? एखादी झोंपडीसुद्धां तशीच वाटेल ! मनाचा राजवाडा जर रिकामा असला तर असले हे दगडी राजवाडे हजार असले तरी काय उपयोग ? माझ्या प्रेम-मंदिरातील देवा ! छे ! छे ! तुझ्यावांचून हें जग मला शून्य झालें आहे. मी आपणांकडून पुष्कळ यत्न केला पण माझ्यानें मन आवरून धरतां येत नाहीं ! जयंतराव, मी आपणांस हे प्राण केव्हांच अर्पण केले आहेत. कांहीं होवो माझ्यानें आतां नाहींच राहवत, (पुढें होऊन उघड, जयंतराव !

रायबा—(राणीकडे पाहून विस्मित होतो.) कोण-कोण ?

राणी—काय मला ओळखलें नाहीं काय ? (रायबाकडे प्रेमानें पाहाते.) भले शाबास, प्रतिनिधि, आपण अगदीं बहार केलीत. आमच्या राज्यांतील या शेफारलेल्या सरदारांची आपण मघांशीं फारच चांगली कानउघाडणी केलीत. मी आपली फार ऋणी झाल्यें आहे. स्वतः येऊन आपले उपकार केव्हां मानीन असें मला झालें आहे!

रायबा—(आश्चर्यानें) काय म्हणता सरकार आपण माझें सर्व भाषण ऐकलेंत ? आपण होतां तरी कोठें ?

राणी—(पडद्याकडे बोट दाखवून,) तेथें. तेथूनच मला आपल्या मंत्री-मंडळीची खलबतें ऐकावयास मिळतात. ह्या मेल्यांची चाल चलणूक मी सदो-दित त्याच ठिकाणाहून पहात असतें. तिकडची स्वारी जी वैतागून रानोमाळीं चालती झाली आहे यांत कांहीं मोठें नवल नाहीं ! आपलें तें जोरदार भाषण

ऐकून, आपल्या कर्तबगारीविषयीं माझी तर बाई पूर्ण खात्री होऊन गेली आहे! काय मेलीं कुतर्क काढणारीं हीं दरबारीं माणसें तरी? त्यांची ती कुत्सित भाषणें ऐकून माझ्या तर अगदीं काळजाला घरें पडलीं. व येथून काळें करून कोठें तरी जावेंसें वाटूं लागलें आहे! जळो हें राज्यपद! आपलें तें झोंकदार भाषण ऐकून, आमच्या राज्यांतल्या शिलेदारांत तुम्ही एक रत्न आहांत अशी माझी खात्री झाली. राजकुलांतच आपला जन्म झाला असावा! खरें, खरें सांगा जयंतराव!

रायबा—(कष्टी होऊन) सरकार, माझ्या कुलाविषयीं मात्र विचारूं नकात. आपली कृपा आहे तशीच मजवर कायम रहावी असें जर आपणांस वाटत असेल, तर तेवढें मात्र मला पुसूं नका. कारण माझी आपल्याठायीं जी निष्ठा आहे तिची कोणासही कल्पना करितां येणार नाहीं! (हात जोडून) कृपा करून माझा खरा वृत्तांत विचारूं नका—

राणी—(स्वगत) असले प्रेमाचे गोड शब्द मीं हतभागिनीनें पूर्वी कधीं तरी ऐकिले आहेत काय? आज मीं स्वप्नांत तर नाहींना? (प्रेमानें रायबाकडे पहात पहात हांसून,) जयंतराव, मी आपणास पक्की ओळखतें. मजकडे आधीं प्रेमानें पहात असतां मग नजर फिरवितांनां मी आपणांस कितींदां तरी पाहिलें आहे! आज वर्षभर हा प्रकार चालला आहे. मला काय ईश्वरानें डोळे दिले नाहींत? आपलें वक्तृत्व, कार्यदक्षता वगैरे गुण कौतुकानें पाहात मी रोज पडद्याआड घटकाच्या घटका उभी राहातें. याप्रमाणें मी माझी कालक्रमणा करीत आहें. आज आपणांस गांठून केव्हां खरा प्रकार आपल्या कानावर घालीन असें मला होऊन गेलें होतें! छे आतां माझ्यानें कांहींएक बोलवत नाहीं!

रायबा—(नम्रतेनें) सरकार, आपल्या भाषणानें मी काय बरें समजावें? सेवकास काय आज्ञा असेल ती बेलाशक सांगण्याची कृपा व्हावी! मी आपला ताबेदार आहे.

राणी—(आकाशाकडे बोट दाखवून) आपण म्हणता तेंच खरें. (प्रेमानें रायबाकडे पाहाते.) जयंतराव, मजपासून दूर दूर राहाण्याचा निश्चय केलात. मजपाशीं येण्याचा प्रसंग जितका टाळतां येईल तितका टाळलांत. पण तें सारें मला केव्हांच समजून चुकलें व तुमच्या अगदीं सान्निध येऊन राहाण्याचा मीं संकल्प केला आहे. (पडद्याकडे दाखवून) येथेंच दररोज मी घटकाच्या घटका आपले मनोहर



राणी—छे ! आतां माझ्यानें कांहीं एक बोलवत नाहीं !

[पृष्ठ ५०

भाषण ऐकत उभी राहातें. प्रथमतः क्षुधेनें व्याकुळ झालेला प्राणी ज्याप्रमाणें हवें तें भक्ष स्वाहा करितो त्याप्रमाणें माझी स्थिति झाली! (चोळींतून पुष्पगुच्छ काढते.) पहा ही आपलीच प्रेमाची खूण! ओळखलींत काय? ही मी कितीतरी मनोभावानें माझ्या हृदयाजवळ ठेविली आहे! आणखी मी काय सांगूं, प्रिया? माझ्याच्यानें जास्त बोलवत नाहीं—

रायबा—(दचकल्यासारखें करुन,) हां! हां! हें काय आपण बोलतां? राणीसाहेब, (हात जोडतो व गुच्छाकडे बोट दाखवून) मला क्षमा करा. मी अशी बेअदबी केल्याबद्दल मजवर दया करा. राणी सरकार, मी आपला गुलाम आहे. (स्वगत) इतके दिवस मी अगदीं मारून मुटकून काढिले. हीच काय ती माझी परीक्षेची वेळ आहे! देवा, माझ्या स्वामिणीबरोबर अद्बूनें वागण्यास मला सामर्थ्य दे. (मोठ्यानें) सरकार, मी आपला दास आहें.

राणी—(सद्गदित होऊन,) काय म्हणता प्रियकरा? छे, छे! राणी ह्या नांवानें मला हांक मारूं नका. इतरांनां जरी मी आज्ञा करणारी राणी आहे तरी, प्रिया तुमची मी आज्ञाधारक दासी आहे. माझें सर्वस्व मीं आपणांस अर्पण केलें आहे. मी आपलीच आहे. प्रिया, मी आपल्या सौंदर्यास व गुणांस लुब्ध झालें आहें. ह्या राज्यांत मला सुखी करण्याचें सर्वस्वीं तुमच्याच हातीं आहे. (रायबाच्या हाताचें चुंबन घेते.) माझ्यानें आतां जास्त बोलवत नाहीं. प्रेमासाठीं भुकेलेल्या राणीस प्रेमाची भिक्षा देऊन सुखी करा. आज मला किती तरी आनंद होत आहे. कारण माझ्या प्रियकरास मी सर्व मन उघड करून सांगितलें. (कावऱ्या बावऱ्या इकडे तिकडे पाहाते) अगबाई! (स्वगत) मी वेडी तर नाहींना? मला असें जर दरबारच्या मंत्रीमंडळीनें पाहिलें तर माझी धडगत नाहीं! मेले माझ्या नांवानें आधींच खडे फोडीत आहेत (मोठ्यानें) तर आतां येतें बरें प्रिया. ह्या दासीस विसरूं नका. हीच माझी विनंती आहे. (रायबाकडे प्रेमानें पहात पहात पडद्यामागील गुप्तद्वारानें निघून जाते)

रायबा—(स्वगत, हात जोडून) ईश्वरा, मला साह्य कर. देवा, मजवर कृपा कर. ह्या संस्थानांत सर्वांत श्रेष्ठ पदास मी चढलों आहें. मजपाशीं संपत्ति आहे. सर्व कांहीं आहे व खुद्द राणी मजवर प्रेम करीत आहे. आतां माझ्या सुखास पारावार नाहीं. तरी पण हे दयाघना, माझ्या स्वामिनीबरोबर नीट वागायास

मला शक्ति दे. (डोळे चोळतो.) काय, राणी ? राणी येथें आली होती ? हें सगळें स्वप्न तर नाहींना ? (पुनः डोळे चोळतो.) अरे खरोखरच ! होय. तर परमेश्वरा, राणीचें संरक्षण करण्यास मला सामर्थ्य दे. आमची येथली सरदार मंडळी पडली टवाळखोर ! राणीसाहेब आपल्या महालांत नीट सुखरूप गेल्या कीं नाहीं तें स्वतः जाऊन पाहिल्या शिवाय मला चैनच पडणार नाहीं तर चला— [जातो.

प्रवेश ३ रा.

[**स्थळः**—मोहनपुरांतील एक रस्ता. जयंत दाढी लावून भिकाऱ्याच्या वेषानें प्रवेश करितो]

जयंत—(स्वतःचे खिसे चाचपून,) भूक व तहान हीं ईश्वरानें मनुष्यास कां बरें दिलीं ? व ती शांत करण्यास सर्वांस सारखी साधनें न देतां एकास जबर श्रीमान तर दुसऱ्यास अत्यंत कंगाल असें त्यानें कां निर्माण केलें ? ज्यापाशीं पैसा आहे तो त्याजवळ इतका विपुल कीं, त्याचें काय करूं असें त्यास होऊन जातें ! लक्ष्मी म्हणतात चंचल आहे. आहेच बया ती तशी ! तशी जर नसती तर ह्या जगतामध्यें समता करण्याचें अस्मादिकांच्या कधीं तरी मनांत आलें असतें काय ? मग आमच्या सारख्या मंडळीस भामटेगिरी करण्याचें प्रयोजन तरी पडतें काय ? ह्या पृथ्वीच्या पाठीवर, आमच्यासारखे ठक, चोरटे व लुटारू आहेत ते कितीतरी चांगले. त्यांच्यासारखे जगाचें हित चिंतणारे कोठेंच मिळायाचे नाहींत. ते रिकामे बडबडत नाहींत व व्यर्थ वाचाळताही करीत नाहींत ! ह्या जगांत सर्वत्र समता पाहिजे हें तत्व पूर्णपणें जाणून आपल्या कृतीनें दरघडीस तसें करून दाखवितात. अरे फकिऱ्या, पण तूं हें पांडीत्य लेका सांगत आहेस कोणाला ? भुकेनें तुझ्या पोटांत कावळे ओरडूं लागले आहेत, त्याचा कांहीं तरी विचार कर बाबा ! (खिसे चांचपतो. आज मजपाशीं एक कवडीसुद्धां नाहीं. ह्या खेपेसारखे माझे हाल कधींच झाले नसतील. त्या फिरंग्यांच्या शिपायांनीं तर मला दे माय धरणी ठाय करून सोडिलें. बेट्यांच्या बरोबर इतके शिपायी असतील हें कोणास ठाऊक ? नाहीं तर त्यांबरोबर टक्कर देण्याचें सोडून देऊन आम्हीं तेथून पळच

काढला असता. बरें झालें माझें घोडें चपळ होतें म्हणून; नाहीं तर माझी कांहीं धडगत नव्हती. आज दोन तीन दिवस उपाशीं रानोमाळ फिरत इकडचा रस्ता धरला. आज सकाळीं उपास व थकवा यामुळें आमच्या घोड्यानें प्राण सोडला. बरें झालें मोहनपूर गांठल्यावर हें सर्व झालें नाहीं तर मोठी पंचाईत झाली असती. आतां येथें दादासाहेबांस भेटावें. (हांसतो.) मी अजून या लोकीं आहे ह्याबद्दल त्यांची खात्री करून द्यावी. न जाणों कदाचित् मला भूत किंवा पिशाच समजून आमचे दादा घाबरतील? कारण, आम्हीं त्यांच्या त्या विश्वासू पठाणांच्या कचाट्यांतून सुटलों हें तरी त्यांस कसें समजणार? अरे हा समोरून कोण येत आहे (पडद्यांत डोळ्यावर हात ठेऊन पाहातो) होय ओळखलें. हा तर आमच्या दादासाहेबांचा विश्वासू खिदमतगार साद्या. हा बेटा मला ह्या वेशांत ओळखील तरी का? (साद्या येतो त्याजकडेस कांकुतीनें पाहातो.) राम राम! दादा राम राम! गरीब माणूस आहे. उपाशि आहे. देव आपलें भलें करील.

साद्या—(मोठ्या अकडीनें,) बाजू, बाजू हो गाढीच्या? भिकारड्याचा राम राम घ्यावयास कोणा लेकाला वखत हाय. चल! चल!

जयंत—(कांकुतीनें,) अहो भले गृहस्थ, संभावित खिदमतगार—राम राम, गरीबाचा राम राम—

साद्या—(नखशिखांत स्वतःस पाहून आश्चर्यानें, स्वगत) अर ह्यानं कसर ताडलीया? (मोठ्यानें व रागाचा आवेश आणून,) लईच पाघळला हा अरं गाढीच्या? तुला शरम न्हई का? मला तूं खिदमतगार म्हंगतोस? हं! (त्यास मारायास जातो, तोंच जयंत दाढी काढून त्यास ओळख देतो व हांसतो.)

साद्या—(आश्चर्यानें,) कोण? धाकटे सरकार. अन् हत कव्हां आलात? (मुजरा करितो.)

जयंत—होय मी जयंत. साद्या मला दादास भेटायाचें आहे.

साद्या—(कानावर हात ठेवून) हं! हं! त्ये हत् न्हाईत—

जयंत—तर ते कोठे आहेत तें सांग. माझें त्यांजपाशीं निकडीचें काम आहे. ह्याच घटकेस मला त्यांस भेटलें पाहिजे. सांगतोस कीं नाहीं आधीं—

साद्या—त्ये इचारू नकात. तुमच नांव घेतल्याबरोबर दादा सायबानीं मला बेगुमान चोप दिला. (मोठ्यानें) त्ये कोठे गेल्याती ते मला काय ठाव ?

जयंत—तूं भल्या रीतीनें सांगतोस कीं नाहीं? साद्या माझ्याशीं गांठ आहे?

साद्या—व्हय त्यानीं आम्हा समद्याना ताकिद केलीया कीं आपनाह्मीं वोळाख बी न्हई द्योवी! तुमास्नी लई लई वंगाळ शिव्या दिल्या—

जयंत—(डरडावून) चूप! दादा कोठें आहेत तें सांग आधीं?

साद्या—(कानावर हात ठेवून) ते मला नाय ठाव!

जयंत—(रागानें एकदम साद्याच्या अंगावर जाऊन त्याची गचांडी धरतो.) बोल दादा कोठें आहेत ते.—

साद्या—(भ्याल्यासारखें करून) माफ करा. अक्षी चुकलो सरकार. मीं खरोखर बेमान झालोया! (जयंताच्या पायां पडतो.) सरकार आपून लई उपाशि दिसता. घरीं येऊन दोन घांस खाल काय?

जयंत—साद्या, ह्यावेळेस मला भूक तहान कांहीं नाहीं! दादासाहेबांज-बळ मला घेऊन चल. मला तूं आणलेंस म्हणून मी सांगणार नाहीं! ते घरांत आहेत इतकें मला कळूं दे. म्हणजे मी एकदम आंत शिरेन—

साद्या—सरकार–पन–पन–सिधोजीराव हत नायती. देवाच्यान्.

जयंत—अरे लबाडा! उगींच शपथ कां घेतोस? (आठवल्यासारखें करून) बरें आहे तर मग आमचा दोस्त रायबा असेल ना वाड्यांत? अरे तो हुजऱ्या रायबा! त्यासच मला गांठून दे.

साद्या—(मोठ्यानें हांसून,) अहो सरकार, ते सार इसरून जा! तुमच ते रायबा आता म्होट दिवान झाल्याती. अन् त्यांच्यासारखा ह्या समद्या मोह-नपुरांत कोनीबी न्हई पघा.

जयंत—(आश्चर्यानें) काय बोलतोस?

साद्या—म्या जे जे ऐकलीया तें अक्षी सांगतुया. माला यातल कायबी ठाव न्हई. अदुन त्ये अंबेघाटावरून धनीसायबासंगाती ग्येलो तोना? हकड आमी आल्यास दोनच दिस झाल्याती. सिधोजी रावांचा दिसतोया कायबी बे-गुमान कावा.

जयंत—(पडद्यांत पाहून,) अरे हे इकडे कोण येताहेतरे ? (दाढी लावतो.) चल तर आतां इकडे उभें राहण्यांत हांशील नाहीं—

साद्या—झाला, झाला माझाबी ध्येत झाला. आतां हा साद्या कदीबी बेइमान न्हई व्हनार. आतां चला वेगी वेगीन हकडून. अनया माझ्या मावळणीकड नी करा तत इवलीशी न्याहारी. नी मंग तुमच्या दोस्ताचा संमद्दा काढूया शोध. ह्या जीवामंदी अक्षी परान आहे तोपर्यंत मी आपनाला कदीबी दगा न्हई येनार—

[दोघे निघून जातात.

प्रवेश ४ था.

[**स्थळः**—राजवाड्यांतील एक खोली. रायबा कागदपत्रें वाचण्यांत अगदीं गढून गेला आहे. तोंच एक दाढी लावलेला चपराशी प्रवेश करितो. जेथें रायबा पाठमोरा वसला आहे तेथें पाय न वाजवितां हलकेंच मागून येतो व रायबाच्या पाठीवर सलगीनें हात मारून, त्यास मुजरा करितो. रायबा रागानें त्याजकडे पाहात आहे तोंच चपराशी दाढी काढतो. त्याक्षणीं रायबा सिधोजीरावांस ओळखतो, व कांहीं वेळ त्याजकडेस अगदीं चकित मुद्रेनें खालींवर पहातो.]

सिधोजी—(हांसून) हिंम्मतबहादूर प्रतिनिधि साहेबांस आमचें दंडवत.

रायबा—(रायबा बावचळल्या सारखा पाहातो.) कोण सिधोजीराव ? तुम्हींच का ?

सिधोजी—(हांसून) होय मीच तो आपला यजमान सिधोजीराव. असे दचकून पाहाता काय ? माझें दर्शन होईलसें आपणांस वाटलें नव्हतें कीं काय ?

रायबा—खरोखरच आपलें येणें आकस्मात झालें म्हणायचें. (स्वगत) अरेरे घात झाला घात ! हें विघ्न कोठून आलें ? (मोठ्यानें) धनीसाहेब आपल्या सारख्यानीं असल्या पट्टेकऱ्याच्या पोषाखांत यावं ना ? छे ! छे ! आपणांस हें शोभत नाहीं. आणखी आधीं कळवायाचें तरी होतें म्हणजे आपणांस चांगलें मानानें आणण्याची व्यवस्था केली असती.


सिधोजी—आग लागो त्या मानमरातबाला ? असाच हलकट पोषाख चढविला म्हणजे हवें तेथें जातां येतां येतें ! बाबारे येथें राजवाड्यांत मी केव्हां आलों

गेलों हें कोणासही समजत नाहीं. आणखी आपल्यासारख्या बऱ्या (हांसतो.) प्रतिनिधींची गांठ घ्यावयास फारच सुलभ पडतें! पाहिलेंत काय हिंम्मतबहादुर मी आपल्याच पट्टेवाल्याचा पोशाख घातला आहे. (पट्टयाकडे बोट दाखवितो व हांसतो.)

रायबा—आपणांस येथें राजवाड्यांतील माणसांनीं ओळखलें तर पंचाईत नाहीं का होणार ? खुद्द राणीसाहेबांची आपणांवर इतराजी होऊन आपणांस हद्दपार केलें आहे. तेव्हां जपून असलेलें बरें. म्हणून सांगतों. आपणांस येथें येतानां कोणी पाहिलें नाहींना ?

सिधोजी—(तुच्छतेनें) अरे रायबा, तुला वेड नाहींना लागलं ? अरे मजकडेस कोण पहातो ? तुझ्यासारख्या तरण्या बांड मंडळीकडे पाहिलें तर सार्थकता तरी होईल डोळयांचीं ! अरे मजसारख्या कंगाल चपराशाकडे पाहून स्वतःस अपशकून करून घेण्यास ह्या वाड्यांत कोण रिकामा बसला आहे! व्यर्थरे व्यर्थ इतक्या पदवीस चढलास ! (कोचावर ऐटीनें बसतो व रायबाकडे डौलानें पहातो. रायबा नम्रतेनें खालीं मान घालून उभा रहातो.) अरे रायबा, ह्या आपल्या राज्यांत तूं हे काय ढंग आरंभले आहेस ? आमच्या ह्या मोहनपूरांत तूं धुमाकुळ मांडिली आहेस हें खरें काय ? आपल्या देशांचें, आपल्या राज्याचे (हांसून) अरे आपल्या राणीसाहेबांचे (हांसतो.) हित साधण्याकरितां तूं मोठमोठ्या सरदारांचे अपमान करितोस म्हणून माझ्या कानावर आलें तें खरें काय ? तुझे मामा कान्होजीराव गांव सोडून गेले व इतर शिलेदार राजीनामा द्यावयास निघाले आहेत ह्याचा अर्थ तरी काय ? आपल्या आप्तवर्गीशीं, आपल्या सरदारमंडळीशी असा शिरजोरपणा करून कसें चालेल! रायबा, डोळे उघड. अरे प्रतिनिधि झालास, हिंम्मत बहादूर झालास म्हणून मंत्री मंडळीस असें झुगारून देऊन त्यांजवर एकदम ताशेरा झाडणें तुला शोभत नाहीं.

रायबा—(नम्रतेनें) तुम्हीं माझे पुरस्कर्ते, तुम्हांस खरा प्रकार सांगणें माझें कर्तव्य होय. मला कान्होजी मामासाहेबांचे वर्तन सांगण्यास लाज वाटते. सरकारची तिजोरी लुटून, ह्या आपल्या रियासतीचा निकाल लावण्यास जणूं काय त्यांनीं कंबर बांधिली आहे. बरें झालें माझ्या कानावर सर्व गोष्टी



शिवाजी—अरे रायबा ही डबी उचलून दे पाहूं ?

[पृष्ठ ५७

आल्या. नाहींतर गांवांत बंडावा माजून अनर्थ गुदरला असता. दरोडेखोरांनीं आमच्या प्रजेस भंडावून सोडिलें आहे—हें आपण ऐकलेंच असेल ?

सिधोजी—(ऐटीनें) अरे रायबा, मला वाटतें त्या बाजूनें थंड वारा सुटला आहे. (खिडकीकडे बोट दाखवितो.) मला थंडीचा भास होत आहे. तर बाबारे जरा ती खिडकी लावून घे. (रायबा रागानें पुटपुटतो, व खिडकी लावून घेतो. सिधोजी हांसतो, व कोंचावर पाय ताणून पडतो.) अरेरे ! माझ्या पायास वळ आलारे. (पाय ताठ करतो.) अरे रायबा जरा माझा पाय दाबून धर पाहूं. (बाजूस तोंड करून हांसतो. रायबा रागानें लाल होतो, परंतु पुनः विचार केल्यासारखें करून सिधोजीचा पाय दाबतो.)

रायबा—आणखी किती तरी सांगूं ! मीं जें वर्तन चालविलें आहे तें अगदीं बरोबर आहे ह्याबद्दल आपली अगदीं खात्री करून देईन. (सिधोजी लक्ष न दिल्यासारखें करितो व मुद्दाम आपली तपकिरीची डबी खालीं पाडतो.)

सिधोजी—अरे रायबा, ही डबी उचलून दे पाहूं ? (रायबा कष्टानें डबी उचलतो. सिधोजी आपल्याशींच हांसतो.)

रायबा—हे सारे देशद्रोही लोक—केव्हां मजसारख्यास तोंडघशीं पाडतील याचा कांहीं नेम नाहीं ! म्हणूनच ह्या मंत्रीमंडळीबरोबर वागतांना जरा खबरदारी ठेवावी लागते.

सिधोजी—(कंटाळल्यासारखें दाखवून) पुरे कर तुझें हें भारूड रायबा, अरे तुझें रक्त गरम आहे व म्हणूनच सांगतों, ऐक. अरे तुझी ही दुबळी प्रजा कोण लागते ? आपल्या सारख्यानें तर शिलेदारांचेंच हित साधलें पाहिजे. बाजारबुणग्या रयतेचें हित ! वाहवारे विचारशून्या ! अरे लूट—लूट करणें हाच उत्तम मार्ग. ज्यास फावेल तो जर आपली तुंबडी भरणार नाहीं तर त्याच्या सारखा वेडा कोणीच नाहीं, छे ! छे ! रायबा ! इतके दिवस राज्यकारभार केलास परंतु तूं आहेस तसा कोराचा कोरा. तूं उगाच झाला आहेस मोठा मुत्सद्दी ! तुला सांगायास हवें काय ? आपल्या बहुतेक राजेरजवाड्यांचें मूळ काय ? (हांसतो.) चोर व लूटारू. प्रथम लुटालुट करून विजयी झाले म्हणजे मग बनले सरदार,-उमराव—आणखी त्यांतल्यात्यांत अधिक गळेकापूपणा केला, विश्वासघात केला कीं झाले राजे ! रायबा, अरे बहुतेक राजेलोकांचा इतिहास असाच आहे

यासाठीं माझें ऐक. प्रजेचें हित कसलें घेऊन बसला आहेस? स्वतःचें हित तेंच देशहित! तुझ्या मनांत हलकट लोकांकडून पाठ थोपटून घ्यावयाची आहे असेंच दिसतें. करांचा बोजा झाला आहे म्हणून लोक ओरडतात? त्यांच्या ओरडण्याला कोण भीक घालतो? अरे आपण पाळलेलीं जनावरें भुंकतांना तूं ऐकिली आहेस कीं नाहीं? त्यांतलाच तो एक प्रकार आहे झालें. देशाचें हित! हं! हं! हं! (हांसतो.) देशाचें हित साधतो अशी शेखी मिरवून जे आपला तळीराम गार करून घेतात तेच धन्य समजले पाहिजेत! दया, धर्म, सचोटी यांस ह्या काळीं विचारतो कोण? तीं एखाद्या रंग उडून गेलेल्या जुन्या पुराण्या पताकेप्रमाणें फडफडत असतात इतकेंच; पण त्यांजकडेस पहाण्यास कोणास फुरसुद आहे? अरे, तूं कोण आहेस ह्याचें कांहीं तरी स्मरण असूंदे. सर्व भ्रमाचा भोंपळा फोडण्यास मला फारसा अवधी लागणार नाहीं समजलास?

रायबा—(हात जोडून) धनीसाहेब, मी अजूनपर्यंत कोणाशींही अन्यायानें वागलों नाहीं. मला व्यर्थ दोष कां बरें देतां?

सिधोजी—पुरे कर तुझें चऱ्हाट. चूप. ऐक माझा हुकूम. उद्यां रात्रीं मी आपल्या त्या वेताळवाड्यांत येईन. तेथें माझें तुजपाशीं कांहीं नाजूक काम आहे. तर त्यावेळीं तुझा तो हुजऱ्याचा पोषाख चढवून माझ्या तैनातींत हजर राहावयास विसरूं नकोस. वाड्यांत आपल्या त्या जुन्या बहिऱ्या मुक्या नोकरांशिवाय कोणासही ठेवूं नकोस. माझें निकडीचें काम आहे. तेवढें काम आटोपलें म्हणजे लगेच मला प्रवासास गेलें पाहिजे. म्हणून बगीखान्यांतून घोडागाडीची नीट व्यवस्था करून ठेव. त्यांची देखील मला कदाचित् जरूरी पडेल. तयारी कशी अगदीं बेतानें ठेवशील पण?

रायबा—(शंकित होऊन) जशी आपली आज्ञा सरकार. (हात जोडून) आपल्या कामांचा राणीसाहेबांशीं नाहींना कांहीं संबंध? तसें कांहीं असल्यास मला आधीं कळवाल तर उपकार होतील. आपलें व राणीसाहेबांचें बिनसलें आहे म्हणून विचारतों.

सिधोजी—(रागानें) काय हें उद्दामपणाचें वर्तन तरी? तुला मूर्खाला काय त्याची पंचाईत?

रायबा—(नम्रतेनें) माझें राणीसरकारावर अनिवार प्रेम आहे.

आपणांस हें कदाचित् माहित नसेल म्हणून आधीं सांगतों. त्यांना कांहीं धोक नाहीं ना?

सिधाजी—(हांसून) वाहवारे तुझें प्रेम—हं ! हं ! हं ! (हांसतो.) अरे तें तर आम्हांला आधींपासून माहित आहे व म्हणून तर रायबा आज तूं हुजऱ्याचा प्रतिनिधि झालास.

रायबा—(आश्चर्यानें) काय म्हणता? माझें प्रेम राणीवर आहे हें तुम्हाला आधींपासून ठाऊक आहे?

सिधोजी—(हांसून) होय ! तीच गोष्ट आमच्या पथ्यावर पडली !

रायबा—(कष्टी होऊन, स्वगत) ह्या पाषाणहृदयी सिधोजीचें हत्यार बनून राणीस दगा देण्याचें पातक, ईश्वरा मजकडून होऊं देऊं नकोस ! (कपाळावर हात मारून,) ही साडेसाती कोठून आली? हा कसाई आतां त्यां गायीचा गळा खचित कापील. हा खात्रीनें सूड घेण्याच्या विचारांत आहे. देवा, राणीचें रक्षण करण्याचें मला सामर्थ्य दे· (मोठ्यानें) धनीसाहेब, पाहिजे तें करा. (आपली तरवार पुढें करून) हवें असल्यास ह्या तरवारीनें माझा निकाल लावा. परंतु राणीसरकाराच्या केंसासही धक्का न लागेल इतकेंच करा. एवढेंच माझें आपणांपाशीं हात जोडून मागणें आहे. (गुडघे टेंकतो)

सिधोजी—(रागानें) पुरे कर तुझी ही सारी रडकथा. तुझ्या सर्व स्वप्नांचा अंत झाला असें समज. तूं कोण आहेस ह्याचें तुला स्मरण आहे काय? अरे नीचा, तूं माझा हुजऱ्या आहेस. गुलामा, प्रेम व प्रीति काय घेऊन बसला आहेस? मजसारख्या खंबीर म्हाताऱ्यास तूं कालचा पोर शिकवूं पहातोस? तूं आज प्रतिनिधि झाला आहेस. (हांसतो.) हिंमतबहाद्दर झाला आहेस. पण याद राख, मी जर बेत केला तर एका क्षणांत तुला जमिनदोस्त करून टाकीन. माझें वैर साधण्याकरितां म्हणून आज मी तुझ्या चपराशाचा पोषाख घातला आहे. तसाच तूं माझें वैर साधण्याकरितां हिंमतबहादुर व प्रतिनिधीचा पोषाख चढविला आहेस· (रागानें पाय आपटून) मला मुजरा करणें व माझें हवें तें काम करणें जसें तुझें कर्तव्य आहे त्याचप्रमाणें आमच्या राणीवर प्रेम करणें हें देखील तुझें कर्तव्य होय ! माझा हुकूम तुला मान्य केलाच पाहिजे. तुला जास्त चौकशी करण्याची जरूरी नाहीं.

रायबा—(स्वगत) शिव ! शिव ! ! हा थेरडा खात्रीनें राणी साहेबांवर सूड उगविण्याच्या बेतांत आहे. अखेरीची विनवणी करून पाहूं या. मन वळलें तर बरेंच. (जवळ जाऊन सिधोजीच्या पायांवर मस्तक ठेवून) सरकार, मी आपला विश्वासू व आज्ञाधारक नोकर आहें. आमच्या राणीसाहेबांस आपण दगा देणार नाहीं इतकेंच मला आश्वासन द्या. मी जास्त कांहीं—

सिधोजी—(पाय आपटून व रागानें) पुनः येरे माझ्या मागल्या ! हा असला लघळपणा मला मुळींच खपायचा नाहीं. पुरे ही दांडगाई !

रायबा—(नम्रतेनें) दया. दया. महाराज सेवकावर कृपा करा —

सिधोजी—(रागानें) चूप. बदमाष !

रायबा—(त्वेषानें स्वगत) अरेरे ह्या थेरड्यास एका क्षणांत चुरडून टाकण्याचें मला सामर्थ्य असून मी असें नामर्दासारखें काय करीत आहें ? (मोठ्यानें) धनीसाहेब, मी कोण आहें हें आपणांस ठाऊक नाहीं वाटतें ? मी प्रतिनिधि आहें. माझ्या मनांत आलें तर आपला सर्वस्वीं नाश करीन–आपण हद्दपार आहांत हें ध्यानांत ठेवा.

सिधोजी—(डोळे वटारून) काय म्हणालास ? रायबा, पुनः बोल पाहूं ?

रायबा—मी ह्या राज्याचा प्रतिनिधि आहे. तुम्हांस ह्या घडीस कैद करणें मला मुळींच कठिण नाहीं.—

सिधोजी—(रागानें) आणि तूं खरोखरच कोण आहेस हें मला जगजाहिर करतां येणार नाहीं असें तुला वाटतें काय ? अरे गुलामा, जगांत छीः थूः करून घ्यावयाची तुझी इच्छा आहे वाटतें ? त्याशिवाय ही अवदसा तुला मुळींच आठवली नसती !

रायबा—(ऐटीनें) तुमच्यासारख्या चपराशाच्या बोलण्यावर विश्वास ठेवणारा मूर्ख ह्या मोहनपुरांत कोण आहे ?

सिधोजी—(हांसून) खुळारे, खुळा ! मी अगोदरच सर्व व्यवस्था करून चुकलों आहे. तुला धुळीस मिळविणें मोठें मुष्किलीचें नाहीं. (वेडावितो.) " मी रायबा हुजऱ्या सिधोजीरावांचा नोकर असून ते मला जें सागतील तें करण्यास मी सिद्ध आहें. " हा लेख विसरलास वाटतें ? (रायबा विस्मित होऊन

कपाळावर हात मारतो.) मूर्खा, भलतेंसलतें करण्याच्या भरीस पडूं नकोस. मी सांगतों तें ऐक. उद्यां रात्रीं मीं बजावल्याप्रमाणें सर्व व्यवस्था करून ठेव. संभाळ, जर का माझी अवज्ञा केलीस किंवा माझे बेत ढांसळण्याचा प्रयत्न केलास, तर तूं व तुझें प्रेमपात्र दोघांसही मी चिरडून टाकीन. (पाय आपटतो.) बच्चा माझ्याशीं गांठ आहे. उगाच पश्चात्ताप करावा लागेल. (इतक्यांत पडद्यांत कानोसा घेऊन ऐकलेसें करितो.) आतां येथें जास्त वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. तुझें मंत्रीमंडळ येथें येत आहे. मीं सांगितल्याप्रमाणें तयारी ठेव, विसरूं नकोस. संभाळ.

[लगबगीनें दाढी लावतो व कोंचावरून उठून नम्रतेनें उभा राहतो व रायबास मुजरा करितो. सूर्याजी, मकाजी, रुपाजी परसोजी वगैरे सरदार एका मागून एक येतात व रायबास मुजरे करितात. रायबा मोठ्या ऐटीनें कंबरेवर हात ठेवून त्यांजकडे पाहतो व त्यांचे मुजरे घेतो. सिधोजी एके बाजूस तोंड करून डोळे मिचकावितो, व गालांतल्या गालांत हांसतो.

[पडदा पडतो.]

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**:–सिधोजीरावांचा वाडा. दाराभोंवतालीं पडदे सोडिलेले आहेत. भिंतीवर तऱ्हेतऱ्हेचीं चित्रें व तसबिरी टांगिल्या आहेत. मध्यभागीं एका वर्तुलाकृति मेजावर दौत, लेखणी वगैरे लिहिण्याची सामुग्री पडली आहे. एके बाजूस पडद्यांत टेबलावर ठेविलेले खाण्याचे पदार्थ दिसत आहेत. समोरच दुसऱ्या अंगास पडद्यांत एका मेजावर मद्याचे बिल्लोरी कुपे व पेले आहेत. एका कोनांत मोठें कपाट आहे. मध्यभागीं एक खिडकी उघडी आहे व त्याजवर बांबूच्या चिकांचा पडदा सोडला आहे. रायबा आपल्याशींच विचार करित फेऱ्या घालीत आहे. हुजरे दारापाशीं अदबीनें उभे आहेत.]

रायबा—ह्या चांडाळापासून तिचा बचाव मला करितां आला नाहीं तर माझा जन्म व्यर्थ आहे. ह्या वाड्याच्या उंच शिखरावरून जरी मला उडी मारण्याचा प्रसंग आला तरी फिकीर नाहीं, पण तिचें रक्षण मी करणार. ह्या राक्षसानें जाळें पसरलें आहे ह्यांत मुळींच संशय नाहीं. ह्या निष्ठुर सिधोजीचा कांहीं तरी फार दिवसाचा द्वेषभाव असला पाहिजे! काहींही होवो. राणीचा बचाव करण्यास प्राणाची आहुति देण्यास मी तयार आहे. अरेरे! इतक्या वैभवशिखरास माझ्या कर्तबगारीनें चढून शेवटीं ह्या सिधोजीनें माझा कडेलोट करावाना? हाय! हाय! मला जमिनदोस्त करण्यासाठीं हा ब्रह्मराक्षस कोठून पैदा झाला कोणजाणें! (दाराकडे पाहतो.) सिधोजी मोठा कारस्थानी व आंतल्या गांठीचा आहे. येथें तो केव्हां येईल याचा नेम नाहीं. या वाड्याचा जसा तो मालक आहे तसा तो माझाही यजमान आहे. (आपला प्रतिनिधीचा झगा मागें करून हुजऱ्याच्या पोषाखाकडे पहात पहात) काय मी सिधोजीरावाचा हुजऱ्या हं? (कपाळावर हात मारतो.) अरेरे! मित्रा फकिऱ्या, तुझें ऐकून हा भलताच नाद सोडला असता तर किती बरें होतें? माझें मन

ह्या घडिस इतकें अस्वस्थ झालें आहे कीं बोलतां सोय नाहीं! मीं चांगला पुरुषासारखा पुरुष असून मला ह्या किटाळांतून राणीस सोडवतां येऊंनये काय? धि:कार असो मला? (विचार केल्यासारखें करून) होय याचा शेवट अशाच रीतीनें करितां येईल. तर तसेंच करूं या. हा थेरडा माझें काय करणार आहे? फार झालें तर सर्व गोष्टि उघडकीस आणून माझी फजिती करील ना? त्यांत काय मोठें आहे? माझ्या जिवलग राणीसाठीं म्यां इतकें सोसण्यास कां तयार होऊं नये? बस, झाला, झाला माझा निश्चय. आतां विलंब न लावितां त्याच उद्योगास लागलें पाहिजे! (विचार करतो.) ते आपले इष्की पिराजीराव जामदार–त्याचा आमचा बे बनाव जरी झाला आहे तथापि त्याला सामिल करून घेतल्याशिवाय आमच्या राणीचा बचाव होणें कठीण दिसतें. तर आधीं त्यालाच गाठूं या. तो बेटा राणीसाठीं हवें तें करील. (दाराकडे पाहून) कोण आहेरे तेथें? (हुजऱ्या प्रवेश करितो व रायबास मुजरा करितो. त्याजकडेस नीट पाहून,) होय तूं विश्वासू आहेस. तूंच हें काम चांगलें करशील. हें पहा आपले ते पिराजीराव जामदार आहेत ना? त्यांनां जाऊन माझा निरोप दे. त्यांनां म्हणावें कीं तीन दिवसपर्यंत आपल्या राणीसाहेबांस कोठेंही महालाबाहेर पडूं देऊं नका. त्यांजवर तसेंच कांहीं संकट येण्याची भीति आहे म्हणून अशी खबरदारी घ्यावयास मीं स्वतः सांगितलें आहे म्हणून सांग. अरे पण कसा अगदीं तीरासारखा धांवत जाशील. (विचार केल्यासारखें करून) होय. थोडा थांब बरें. मी एक पत्र लिहून देतों तेंच पिराजीरावांस दे. (टेबलावर बसून पत्र लिहितो व तें स्वगत वाचतो.) " आपले विश्वासू व शूर जामदार पिराजीराव जें सांगतील त्यावर विश्वास ठेवून वर्तन करावें अनमान करूं नये." माझें अक्षर माझी प्रिया ओळखिलच. (हुजऱ्यास पत्र देतो व मोठ्यानें) हें पत्र पिराजीरावांस दे बरं. त्यांस म्हणावें जर तसाच प्रसंग पडला तरच ह्या पत्राचा उपयोग करा. आणखी त्यांस अगत्यानें सांगा कीं, आपल्यासारख्या थोर व प्रतिष्ठित सरदाराबरोबर वागतांनां जी मजकडून चूक झाली त्याबद्दल मला माफी करावी. पिराजीराव थोरच आहेत, ते मला माझ्या अपराधाची क्षमा करितील. जर त्यांची इच्छा असेल तर मी भर दरबारांत माफी मागण्यास तयार आहें. परंतु त्यांजबरोबर मला लढायचें नाहीं. त्यांची योग्यता कोठें व मी कोठें? हा

माझा निरोप त्यांस जरूर दे व मीं सांगितलेली कामगिरी करण्यास विनंती केली आहे म्हणून त्यांस सांग बरें. पहा फक्त तीनच दिवस त्यांनीं आमच्या राणीस जपलें पाहिजे. जा. धांव. आतां विलंब कशाकरितां? माझा निरोप पिराजीस केव्हां पोंहचेल असें मला होऊन गेलें आहे.

हुजऱ्या—(मुजरा करून) बरें आहे सरकार. (तांतडीनें निघून जातो.)

रायबा—माझा जीव निवांत झाला. आतां काय मी येथें सिधोजीची वाट पहात बसूं? आणि काल ज्याप्रमाणें तो दर घडीस मुद्दाम हलकट कामें सांगून माझी मानखंडना करीत होता तशी करून घेऊं. छे! छे! राणीच्या बचावाची व्यवस्था करून तर चुकलों. आतां ह्या थेरड्यास मी कां म्हणून बचकावें! मी त्यानें बजावून ठेविल्याप्रमाणें त्याच्या तैनातींत हजर नाहींसें पाहून हा थेरडा मजवर प्रथम कातावेल. पण माझें हा काय करणार आहे? आतां आपण येथून निघून जावें हाच उत्तम मार्ग. येथें सिधोजीची वाट पहात बसण्यापेक्षां त्या काळभैरवाच्या देवळांत जाऊन दर्शन तरी घेऊं. तेवढ्या पुण्याईनें तरी माझ्या प्रियेचें रक्षण होवो म्हणजे झालें! (हातानें टाळी वाजवितो, त्यासरसे दोन खिदमतगार येतात व लवून मुजरे करितात त्यांस) आतां मी बाहेर जातों. अंमळशानें कोणी मला भेटावयास येथें आलें तर त्यास आंत माझी वाट पाहात स्वस्थ बसूं द्या. मी लवकरच येईन.

[खिदमतगार मुजरे करून दाराबाहेर जातात. रायबा आपली तरवार लटकावून झपाट्यानें निघून जातो.

प्रवेश २ रा.

[**स्थळ**:—तेंच. जयंत खिडकीतून चोरट्यासारखा हळू हळू डोकावतो व एकदम खिडकी उघडून उडी मारून आंत प्रवेश करितो. त्याच्या अंगांत फाटके कपडे घातलेले आहेत. त्यानें दाढी लाविली आहे व तो लंगडत लंगडत धांपा टाकीत येथून तेथें फिरत आहे]

जयंत—(आपल्याशींच) आलों एकदांचा! सुटलों त्यांच्या कचाट्यांतून! (कावऱ्या बावऱ्यासारखा येथें तेथें पाहतो.) आतां हरकत नाहीं.

पण मी कोठें आलों? (आजूबाजूस पाहून) अरे हा तर आमच्या दादासाहेबांचा वाडा. जेथें पाहिजे होतें तेथेंच येऊन अचानक पोंहोंचलो. बरें, पण येथें कोणीच दिसत नाहीं हें कसें? (मोठ्यानें) अहो, राम! राम! काय? येथें तर चिट पाखरूंसुद्धां दिसत नाहीं. (इतक्यांत पडद्यांतील सिधोजींच्या तसबिरीकडे पाहून) राम राम! दादासाहेब राम राम! मी तर आपला धाकटा भाऊ. नका करूं मजवर इतराजी (हंसतो) राम राम घ्या की. वाहवारे! (स्वतःच्या फाटक्या वस्त्रांकडे पाहून) आमचा हा पोषाख. येथें आहे तरी कोण? चमत्कार म्हणायचा बारीजवळ बाहेर उभा होतों तेव्हां आंत माणसांच्या बोलण्याचा आवाज ऐकूं येत होता, आणि आम्हीं प्रवेश केला तों आंत कोणीच नाहीं! (कोंचावर तंगड्या ताणून पडतो व जांभया देत देत,) बाबा फकिऱ्या, थोडासा विसावा घे. अरेरे! माझी कर्माची कहाणी जर कोणी ऐकेल तर अगदीं तोंडांत बोटें घालील. त्या नबाबाच्या शिपायांच्या हातावर तुरी देऊन अस्मादिकांची स्वारी रानोमाळ भटकत भटकत मोहनपुरांत येऊन तर थडकली! बरें झालें कीं साद्या भेटला व म्हणून तर त्याच्या मावशीकडे लपत छपत मुक्काम करायास मिळाला. नाहींतर आमची पंचाईत झाली असती. वेड्यास पश्चात्ताप झाला आहे खास. (विचार करितो.) रायबाची गांठ नाहीं व दादासाहेबांचाही ठिकाणा नाहीं. दोन दिवस तर अगदीं कोंडल्यासारखें होऊन गेलें होतें. जरा बाहेर पडलों नाहीं तोंच ते पठाण लागले आमच्या पाठीस. (दाढी काढतो व फेंकून देतो.) आमचा वेष इतका छान बदलला असून, त्यांस कसा बरें संशय आला असेल? आमची तर बुवा अगदीं पांचावर धारण बसली. पण ह्या बागेंतून त्या बागेंत असे वळसे देत देत त्या पाठलाग करणाऱ्या हरामखोरांच्या हातांतून तर सुटलों. ह्या बागेंत बराच वेळ काळोखांत उभा राहिलों. व संधी साधून ह्या बारींतून आंत उडी घेतली. (जवळच्या आरशामध्यें पाहून) अरे हें रे काय येथें? आरसा! वाहवारे ऐना! आमचा मुखडा तर पाहूं द्या त्यांत. (मिशीस पीळ देतो व आरशांत पहातो.) ही आमची वीरमुद्रा! (हंसतो व तोंड वेडें वांकडें करितो.) ही आतां आमची वानरमुद्रा. (हंसतो.) हं! हं! हं! बा आरशा! तुझ्यापुढें हात टेकावेत बाबा! जसा माणूस आहे तसा हुबेहुब दाखवून सत्याविषयींचा आपला बाणा कायम ठेवितोस. अरे ह्या जगतामध्यें तुजसारखा

खरें प्रतिबिंब दाखवून सत्याचा झेंडा सदोदित फडकविणारा दुसरा कोणीच सांपणार नाहीं! असें जरी आहे तरी देखील कांहीं अंध लोक तुझ्या नांवानें उगाच खडे फोडितात, व " मुखडा क्या देखो दर्पणमे " वगैरे बडबड करून तुला नाकें मुरडतात. मूर्ख! शतमूर्ख! ह्या जगांत जेवढे म्हणून दांभिक आहेत त्यांची वेगडी साधुगिरी उघड उघड दाखविणारा जर एखादा, बेट्या आरशा, तुझ्या सारखा गडी मिळेल तर अगदीं बहार होईल? अरे ह्या मृत्युलोकीं किती तरी अंधेर आहे! ज्यास आपण सद्गुण म्हणतो त्यास आपल्या ह्या पृथ्वीवर थारा तरी आहे काय? (हांसून) अहो सद्गुण! सद्गुण आहे तरी कोठें? आपले दुर्गुण मोठ्या शिताफीनें लपवून, तुमच्या आमच्या सारख्यांच्या डोळ्यांत धूळ टाकणें व स्वतःस मोठें सात्विक म्हणवून घेणें ह्यासच सद्गुण म्हणतात! आपण बोलून चालून मानवी प्राणी. आपण जर सद्गुणी झालों तर मग आमच्यांत व देवादिकांत फरक तो काय उरला? अरेरे! ह्या जगतांत बाहेरून सदयता दाखवून लोकांच्या माना कापणारे नराधम किती तरी मिळतील! या साठींच मी म्हणतों कीं गड्या आरशा, ज्याप्रमाणें तू आमचें बाह्यस्वरूप हुबेहुब दाखवून आपली सत्याविषयींचीं आवड निर्भीडपणें व्यक्त करितोस, त्याप्रमाणें जर आमच्या मनाचें प्रतिबिंब दाखवितास तर तुझ्यासारखा थोर ह्या जगांत कोणीच नसता! तसें जर असतें तर ह्या लोकीं दुर्गुणांस मुळींच थारा मिळताना. आतां पुरे हें ब्रह्मज्ञान! (हांसतो.) बस, बस, दुनिया झुकती है! माझ्या सारखा झुकानेवाला मात्र पाहिजे आहे. बस, आतां पुष्कळ झालें हें पांडित्य. (हांसून) बोलून चालून आम्ही भामटे. आम्ही टवाळखोर. तरी पण आमची स्वारी आहे मोठी गमती! असला घाणेरडा पोषाख जरी आम्ही घातला तरी देखील सुंदर स्त्रियांनीं पहाण्याची खोटी कीं, झाल्याच त्या आमच्यावर फिदा! (मोठ्यानें हंसतो व तसबिरीकडे पहात पहात) हे आमचे दादासाहेब, वस्ताद रे वस्ताद! माझा कांटा काढून टाकण्याचा होताना आपला विचार? माझें नशीब थोर म्हणून तर यांच्या कचाट्यांतून निभावलों. आतां आमच्या हातून कांहीं तरी मोठा पराक्रम होणारच व ह्या जगांत अस्मादिकांचें नांव अमर होणार. येरव्हीं उगाच कोणास संकटें सोसावीं लागत नाहींत व जीवही वांचत नाहीं हें खास समजा! (कपाटाकडे पाहून जवळ जातो.) वाहवारे

कपाट! आमच्यासारख्यानीं आंत येऊन आपला समाचार घेऊं नये कीं काय? (चोरट्या सारखा इकडे तिकडे पाहून कपाट उघडतो.) दोस्ता कपाटा! तूं लेका बहार केलीस! (कपाटाच्या आंत पहातो व आनंदानें नाचूं लागतो.) वाळवीनें असा छानदार पोषाख खाऊन टाकूं नये असेंचनारे तुझें म्हणणें? (हांसतो) माझें देखील बोवा तुझ्यासारखेंच मत आहे. तर चला काढा बाहेर याला तुरुंगातून व चढवा आपल्या अंगांत! (आपले फाटके कपडे लगबगीनें उतरवितो व रायबाचे नवे कपडे चढवितो. जुन्या कपड्यास लाथ मारतो. उंची रुमाल डोकीस बांधतो व आरशांत पाहून हंसतो.) शाबास! नारंगी पटका! इतका झोंकदार रंग असून तुला लोकांनीं "नारंगी" म्हणावें? मला वाटतें अशा सुबक रंगास नारंगी म्हणणें म्हणजे भरदुपारीं पडलेल्या सूर्यप्रकाशास मध्यरात्र म्हणण्यासारखा मूर्खपणा नाहीं तर काय? हां! हां! हां! (हांसतो व सिधोजीच्या तसबिरीकडे पाहून,) आमच्या त्या फाटक्या वस्त्रांकडे पाहून दादांस आमची कींव आली खरीच. कारण त्यांनींच ही व्यवस्था मुद्दाम कशावरून केली नसेल? (तरवार लटकावतो व ऐटीनें इकडे तिकडे फिरतो.) वाहवारे तरवार! आतां कोणीही येवो. म्हणावें या पुढें मजसमोर. दांत वांसून पडावें लागेल. (पडद्यांतील तसबिरीकडे पाहून हंसतो.) दादा, आपले पठाण कोठें आहेत त्यांस आणा पाहूं? (नवे जोडे घालतो. व जुन्या जोड्यांस तसाच लाथेनें झुगारून देतो.) आतां आम्हीं बनलों अगदीं फक्कड! (लंगडत चालतो.) वाहवारे आमची अक्कड! आमच्या पायांस इजा झाली आहे म्हणून लंगडावें लागतें. (तोंड वाईट करितो.) काहीं फिकीर नाहीं. आम्हीं आहोंत शिपायी गडी! आमचा पाय मोडला तरच त्यांत भूषण आहे. (मिशीस पीळ देतो.) आतां आपला हा पोटोबा कसा शांत होणार? (पोटावर हात मारतो.) कसें करावें? आपला जीव भुकेनें तर व्याकुळ झाला आहे. (पडद्यांतील फराळाच्या पदार्थांकडे अकस्मात नजर जाते व तो आनंदानें नाचतो.) अरे फकिऱ्या आज तुझी बेट्या आहे चंगळ. अस्मादिकांच्या साठींच मुद्दाम ही फराळाची व्यवस्था करून ठेविलेली दिसते! (हंसतो) मग आतां पोटोबा शांत करून घेतलाच पाहिजे. (आंत पडद्यांत डोकावतो, नंतर खाण्याचे पदार्थ एकामागून एक तोंडांत कोंबून बाहेर पहातो व हंसतो.) बेट्या फकिऱ्या आतां हवा तितका हात मार. पहातोस काय?

चल कर यांचा फन्ना ! (खातो.) खाऊन तर झालें. पण आतां तहान लागली त्यांचें कसें काय ? पाणी ! पाणी ! (इतक्यांत समोरच्या अंगास पडद्यांत दारूचें कुपे व रुप्याचे पेले त्याच्या नजरेस पडतात. तें पाहून धांवत धांवत आंत जातो. एका हातांत दारूचें पात्र व पेला घेऊन बाहेर येतो व नाचत नाचत,) वाहवारे मदिरा ! (पेल्यांत दारू ओततो व पितो. एक दोन पेले तोंड वेडें वांकडें करून झोंकल्यावर) वाहवारे मदिरा ! तुझ्या सारखी अजब चीज सर्व जगांत मिळावयाची नाहीं. श्रमानें थकवा आला कीं तुजकडे धांव घ्यावी कीं बस सर्व थकवा पार ! म्लेंच्छानीं तुला अमृत म्हटलें आहे तें उगाच कीं काय ? समुद्रमंथनाच्या वेळेस तुला अमृत समजून दैत्यांनीं जी पळविली तें व्यर्थच काय ? दुःखित मनुष्यानें तुझें सेवन करण्याची खोटी कीं झाला त्याच्या दुःखांचा परिहार ! वाहवारे मदिरा ! (मद्याच्या पात्राकडे पाहून) जगतांत असावा तसा सर्वत्रांस जर तुझा परिचय असता तर आत्महत्त्येसारखें पातक कदापीही घडलें नसतें. काय ? ब्राह्मणानें तुझें सेवन केलें तर त्यास ब्रह्महत्त्येचें पातक लागेल ? (हांसतो.) हां ! हां ! हां ! ही काय बेबंदशाही आहे ? मदिरे माते तुझी ह्याप्रमाणें व्यर्थ निंदा करणारांस धिक्कार असो ! त्यांच्यासारखे मूर्खशिरोमणी कोणीच नसले पाहिजेत ! (विचार करितो.) अरे पण असले विचार करीत बसून वेळ कां म्हणून घालवा ? फकिऱ्या, येथें कोणी येण्याच्या आधीं बेट्या आपली न्याहारी उरकून घे. पुनः गांवांत त्या साद्याच्या मावशीकडे आपणांस असें मिष्टान्न थोडेंच मिळणार आहे ? (घाईघाईनें एके बाजूस जाऊन खाण्याचे पदार्थ तोंडात कोंबतो व दुसऱ्या बाजूस समोरल्या अंगास जाऊन दारूचे पेले झोंकतो. छाकट्याप्रमाणें त्याच्या झोकांड्या जातात.) फकिऱ्या ! फकिऱ्या पुनः गांवांत आला ही हुल ऐकून गांवांतील मंडळीच्या तोंडाचें पाणीच पळालें असेल. मोहनपुरांतील शेंदाड शिपायी आपलीं नाकोटें संभाळण्याच्या उद्योगास लागले आहेत ! (हांसतो.) एखाद्या नामर्द शिपायाचें नांक केव्हां कापीन म्हणून माझे हात कसे हुरहुरले आहेत ! (हांसतो) दादा. (तसबिरीकडे पाहून) दादासाहेब. मी येथें गांवांत आलों हें ऐकतांच आपली अगदीं तिरपीट उडेल नाहीं काय ? मी प्रत्यक्ष तुझा भाऊ असून मला असा दगा दिलास ? दादा, तुला भाऊ म्हणावें तरी कसें ? पाहून

घेईन. सर्वच दिवस सारखे नसतात बरें काय ? आज ह्या वाड्यांत आमची तर चैन उडाली आहे ! (आपल्या पोषाखाकडे पहातो.) नवीं कोरीं घडीचीं वस्त्रें मिळालीं. आणि पक्वानांचें भोजन मिळालें. (मिटक्या मारतो.) आतां बेट्या जयंत्या–छे आपल्याला तर बुवा फकिऱ्या हेंच नांव जास्त आवडतें. काय असेल तें असो. होय आतां आपल्या सावकारांचीं कर्जें फेडतां येतील तर अगदीं बहार होऊन जाईल. आम्हीं जरी अगदीं उलट्या काळजाचे बिलंद भामटे झालों तरी ज्या सावकारांनीं आयत्यावेळीं आपली थैली ढीली करून आमची गरज वाळली त्यांस बुडवावें, असें आपल्या जन्मांतरीं देखील होणार नाहीं ! (दारापाशीं आवाज ऐकतो.) येथें कोणी तरी येत आहे खास. होय तसेंच दिसतें. पहा दार उघडलें. (एक हुजऱ्या पैशाची थैली पाठीवर मारून प्रवेश करितो.) अरे बेट्या फकिऱ्या रहा सावध, भिऊं नकोस, जरा ऐटीनेंच उभा रहा. (जयंत मोठ्या ऐटीनें शीळ वाजवीत उभा राहतो. हुजऱ्या-जवळ येऊन मोठ्या अदबीनें मुजरा करितो. जयंत एकदम पाय आपटून त्रास-ल्यासारखें दाखवीत) ही काय किटकिट आहे ? जरा स्वस्थ म्हणून बसायास हे लोक द्यावयाचेच नाहींत ? (हुजऱ्याकडे ऐटीनें पाहून) तूं कोण ? (रागानें) तूं येथें कशासाठीं आलास ?

हुजऱ्या—(थरथरत अदबीनें) हिंम्मतबहाद्दुर जयंतराव शिरके यांचा जयजयकार, क्षमा करा, महाराज—

जयंत—(स्वगत, हांसून) काय त्या बेट्यानें माझेंच नांव घेतलें ? व मला हिंम्मतबहाद्दुर म्हटलें. आश्चर्य—

हुजऱ्या—सरकार आपल्या चरणापाशीं मी आलों आहें. घ्या हे रुपये ! हे आपणांसाठीं आणले आहेत.

जयंत—(स्वगत) आश्चर्य ! महदाश्चर्य ! ! रुपये, रुपये हा आमचा दादा-साहेबांचा वेताळ गंजेतील महाल जादुनें भारलेला तर नाहींना ? त्याशिवाय हें असें होतें तरी कसें ? अस्मादिकांनीं फक्त रुपयांचें स्मरण केलें तोंच ते आमच्या चर-णापाशीं चालत आले ! (आश्चर्यानें हुजऱ्याकडे पहातो व हांसतो.) ठेव ती थैली तुला पावतीबिवती हवी असेल.

हुजऱ्या—(अदबीनें हांसत) काय सरकारांनीं थट्टा आरंभली आहे. आपल्या हुकुमावरून तर खजिन्यांतून हे रुपये आणले आणि आपण कसली पावती देतां महाराज ? आपलें कांहीं जरूरीचें काम असल्यास सांगा. (स्वगत) आज सरकारची स्वारी खुब रंगलेली दिसते. (मोठ्यानें) माझी महाराज आज पहिल्यांदाच वाड्यावर नेमणूक झाली. मी आपलें हवें तें काम झपाट्यानें उरकून टाकीन. महाराजांनीं वाटल्यास खात्री करून घ्यावी.

जयंत—(दारूच्या धुंदींत) काय म्हणतोस-हं- तु-तु-ला मी आ-आज्ञा करूं ? (हांसतो) हं ! हं ! हं !

हुजऱ्या—(अदबीनें हात जोडून) सरकारानीं माझी थट्टा मांडली आहे. (जयंत दारूचा पेला झोंकतो.)

जयंत—(झोकांड्या खात खात) अरे–थ–थ ट्टा–नाहींरे. आ–आज्ञा करितो ऐक नीट. (विचार केल्यासारखें करून स्वगत) माझे सावकार ! बरी आठवण झाली. त्यांचें देणें देऊन टाकावें एकदाचें. अशी अचानक आलेली संधि व्यर्थ दवडूं नये. (मोठ्यानें) हुजऱ्या–चलाव–हं चलाव.

हुजऱ्या—(हात जोडून) काय आज्ञा आहे ? महाराज ? (झोकांड्या खात खात जयंत हुजऱ्याचे खिसे थैलींतील रुपयानीं गच्च भरतो.)

जयंत—अरे हु-हुजऱ्या पहा बे-बे-बेट्या हुषारीनें काम कर. तुझ्या परीक्षेची वेळ आली आहे ! पण कसें अगदीं बिनबोभाट काम करशील ? येथून असा तडक नीघ व त्या गवताच्या गंज्या आहेतना त्यांच्या बाजूसच त्या देवक्या कलालाचें दुकान आहे. त्याच्यापासून आम्हीं दारू घेतली होती. (हुजऱ्या दचकतो.) अरे असा काय करतोस ? आमच्या सारखे संभावित असेच चोरून छपून मद्य पितात बरें. (हांसतो.) त्यास दे बाबा दहा रुपये. मग जो निघशील तो थेट जा त्या जव्हेर चौकांत अगदीं त्या सत्तावन खाणीच्या नाक्यावरचीच माडी. तेथें ती आमची मोहना मुरली रहाते. अरे होय तेथेंच रे बाबा तेथेंच. (हुजऱ्या चपापतो.) अरे हें रे काय करितोस ? वेडारे वेडा ! आमच्या सारख्या सभ्य गृहस्थांनीं जर असले ढंग चोरून छपून जर केले नाहींत तर ह्या गणिकांचीं पोटें तरी कशी भरावीत? अरे (हांसतो.) मोठ मोठ्या पेशव्यांनीं जर नाटकशाळा ठेविल्या होत्या तर आमची काय विशाद ? पण नीट

याद ठेव बरें. त्या मोहनाजीस यांतील पन्नास रुपये दे. मग उजव्या हातास ती लाल पेंठ आहेना तुला ठाऊक ? तेथेंच त्या हब्या मारुतीच्या देवळाशेजारीं त्या सावळाराम शिंप्याचें दुकान आहे त्यास पांच रुपये दे. तेथून जो निघशील तो थेट कसब पुऱ्यांत ये. तेथेंच तो खाणावळवाला आहे. काय बरें त्याचें नांव ? काय तरी असेल लेकाचें नांव. त्याला दे हे चार रुपये ! त्याचे उपहारगृह मुसलमानांच्या वस्तींत पडल्यामुळें तर तुमच्या आमच्यासारख्यांची बहार उडून जाते. तेथेंच आमच्यासारखे टिळा टोपी लावणारे शिल्लेदार (मिशीस पीळ देतो.) कडाकड हाडांचा चुराडा करून पाण्याच्या ऐवजीं दारूचे हंडे आमच्या ह्या फुगाऱ्यांत आम्हीं रिकामे करितों ! (पोटावर हात फिरवितो.) फार काय सांगूं अरे आमच्या पोटांत जी मासळी जाते ती ह्या अमृततुल्य मदिरेंत पुनः जिवंत होऊन आनंदानें पोहूं लागते ! अगदीं खरें सांगतों ! असा हांसतोस काय ? (दारुच्या पेल्याकडे पाहून) ह्यास उगाच अमृत म्हणतात वाटतें ? आतां पहा तुला काम फार पडणार आहे. त्याच्या आधीं आण पाहूं मदिरा ? (हुजऱ्या मद्याचें पात्र घेऊन येतो.) हं आतां ओत त्या पेल्यांत, वाहवारे मदिरा ! यांतील मजा लेका हुजऱ्या तुला काय ठाऊक असणार ? आतां मी सांगतों तसें कर पाहूं ? हं घे हा पेला हं झोंक. बघतोस काय ? चलाव अरे माझी आज्ञा मान्य केलीच पाहिजे. त्या शिवाय तुझ्या पायांत ताकद तरी कशी येईल ? (हुजऱ्या दारू पिण्यास कांकूं करितो पण जयंत शेवटीं जुलमानें त्याच्या तोंडांत पेला ओततो. व थैलींतील रुपयांनीं स्वतःचे खिसे चापून भरतो व झिंगल्याप्रमाणें येथून तेथें नाचूं लागतो. शेवटीं दारूचा शिसा तोंडास लावतो.)

जयंत—आणि ऐकलेंस कायरे ? तूं दारू प्याला आहेस. रस्त्यांत झोकांडी जाईलबीईल. जर कोणी शिपुरड्यानें अडविलेंच तर त्याचा हात ओला कर. बाबा अशा कुत्र्यांस अवश्य भाकरीचा तुकडा टाकलाच पाहिजे ! हं आतां विलंब नको. चल हो चालता. काम कसें करशील पण, यंव रे यंव.

हुजऱ्या—(अदबीनें) सरकार आणि रुपये उरतील त्यांचें काय बरें करूं ?

जयंत—अरे उरले तर तूं घे. पण ऐक घरीं जाण्याच्या अगोदर दारूच्या गुत्त्यांत जाऊन चांगलासा बार भर. आपल्या दोस्तांस यथास्थित दारू पाज. आणखी माझ्या नांवें त्रिवार जयजयकार करण्यास सांग. आणखी

पहा नीट लक्षांत ठेव बरें? (हांसतो.) वाटेंत जातांजातांनां जर कोणी भुकेकंगाल कवि भेटला तर त्यास एक दोन रुपडे फेंक. व मजवर एक संगित ठुमरी रचण्यास सांग बरें ? (हांसतो.) विसरशील तर संभाळ! आपल्या ह्या शहराच्या गल्लीकुचींत असले शेंकडो कवी आहेत. त्यांस उपाशी मरतानां पाहिलें म्हणजे मला त्यांची अत्यंत कींव येते! (हांसतो.) जा. चल निघ. (हुजऱ्या झोंकांच्या खात खात मुजरा करितो व निघून जातो.) क्या मझा है! क्या बात है! इनषल्ला!! आज आमचें नशिब उदयास आलें. (तोंड वेडें वांकडें करून) माझ्या पोटांत असें जळजळतें कां? (विचार करून) अरे बेट्या फकिऱ्या नुस्ती कच्ची दारू प्यालास. आतां त्यावर कांहीं खाशील कीं नाहीं? होय, तर तसंच करूं या.

[पडद्यांत जातो.

प्रवेश ३.

[स्थळः—तेंच, एक म्हातारी हळू हळू चोरट्या पावलांनीं प्रवेश करिते. व इकडे तिकडे पाहाते.]

म्हातारी—(हलक्या आवाजानें) अहो जयंतराव! जयंतराव! अगबाई इकडे तर कोणीच दिसत नाहीं? (मोठ्यानें) अहो जयंतराव! आंत कोण आहे?

(जयंत तोंडात खाण्याचे पदार्थ कोंबीत कोंबीत म्हातारीकडे आश्चर्यानें डोकावून पहातो.)

जयंत—(हळूंच) हें काय आणखी प्रकरण? ही कोण म्हातारी? येथें हिचें काय काम? माझेंच माझेंच नांव हिला घेतानां मी ऐकलें!

म्हातारी—(जयंताकडे पहात पहात डोळ्यावर हात ठेवून) अहो जयंतराव शिरके येथें आहेत काय? (जयंत मोठ्या अकडीनें पुढें सरसावतो.)

जयंत—(मोठ्यानें) मीच तो जयंतराव! मजपाशीं काय काम आहे? सुंदरी बोल झटपट.

म्हातारी—(हांसून) ही भलतीच काय मेली थट्टा म्हाताऱ्या माणसाची?

जयंत—(मोठ्यानें हांसून) आपण भूतपिशाच्च नाहींतना?

म्हातारी—(स्वगत) कशा खुणा न् खुणा सर्व पटल्या ! किती तरी सरकारचा थट्टेखोर स्वभाव ? (मोठ्यानें) मी कीं नाहीं भूत नाहीं नी पिशाच नाहीं.

जयंत—(मोठ्यानें हांसून) मग कोणी हडळ, डांकीण, जखीण यांपैकीं कोणी आहांत वाटतें ! असेल तर सांगा लवकर आपलें काय काम आहे तें ?

म्हातारी—भिऊं नका. या पैकीं मी कोणी नाहीं बरं. मी कीं नाहीं ती सुवर्ण पेठेंतील कमळा आपल्यापाशीं महाराज तसेंच नाजूक काम आहे म्हणून आलें आहें. (कानाशीं लागते व हांसून डोळे मिचकावते.) हा निरोप आपल्या प्रियकरणीनें दिला आहे बरं का ? येथें दुसरें कोणी नाहींना ?

जयंत—(मोठ्यानें हांसतो.) हां ! हां ! हां ! काय म्हणतां ? माझ्या प्रियकरणीनें तुम्हांस पाठविलें ? (स्वगत) ही सर्व येथें आज भूतचेष्टा चालली आहे असेंच म्हटलें पाहिजे. (म्हातारीकडे आश्चर्यानें पहातो.)

म्हातारी—महाराज, असे चकित होऊं नका ? मजकडे ती बाईसाहेबांची दासी आली. व तिनेंच हा निरोप आपणांस द्यावा म्हणून मला कामगिरी सांगितली. (हांसून) असलीं नाजूक कामें ह्या मोहनपुरांत मी कमळा एकटीच करूं जाणतें ! आपलेंच नांव जयंतराव ना ? (आठवल्यासारखें करून) होय आपणासच कायसें " हिमतब्हादुर " असा किताब दिला आहे नव्हेका ? आपल्या प्रियेला आपला निरोप पोंहोंचला. महाराज आपणच त्यांस आज मध्यरात्रीस आपल्या भेटीस बोलावलें आहे खरेंचना ? त्या कीं नाहीं यावयास आतुर आहेत. त्यांची खात्री झाली पाहिजे इतकेंच. तर आपल्याकडून उलट निरोप काय देऊं ? बाईसाहेबांची दासी माझ्या घरीं वाट पहात असेल.

जयंत—(मोठ्यानें दरडावून) बाईसाहेब कोण ? बोल, बोल ! सांगतेस कीं नाहीं ?

म्हातारी—(हांसून) आतां तर बया अगदींच खूण पटली ! महाराज आपण माझी परीक्षा घेतां वाटतं ? त्या दासीनें मला तें जस्सं सांगितलं तस्सं अगदीं ! (हांसून) सरकार, आपण आपल्या प्रियकरणीस ओळखत नाहीं ह्याची बतावणी फारच सुरेख केलीत. आपण सरकार बहुरूप्याचें काम फारच फक्कड कराल.—

जयंत—(स्वगत) आतां भेद फोडून उपयोग नाहीं. आपल्या पदरचें काय जातें ? जणूं आपल्याच प्रियपात्राकडून निरोप आला आहे अशी म्हातारीची खात्री आहे. होय थोडीशी मजा तर उडून जाईल. आपण उलट निरोप देऊं या. असली तसली एखादी फटाकडी तर हं—नाहीं तर एखादी थेरडी आली तर देऊंया परत लावून. ह्या आमच्या दादांच्या वाड्यांत आज निव्वळ अगदीं भुताटकीचा बाजार झाला आहे. होय येथें जर आपली सर्वच गोष्टींची चैन उडत आहे, तर मग ह्याच गोष्टीची उणीव कशासाठीं ? चला आपली तर तयारी आहे. माशुक मनासारखें मिळालें तर त्याचा उपभोग घेऊं, नाहींतर अस्मादिकांवर जुलूम करण्याची कोणाची प्राज्ञा लागून गेली आहे ! (मोठ्यानें म्हातारीस) फार उत्तम आहे. आमच्या प्रियेस म्हणावें कीं जरूर जरूर आज रात्रीं यावें. मी अगदीं चातकाप्रमाणें माझ्या प्रियेची वाट पहात बसेन बरें ? कमळाबाई आपली अलौकिक सचोटी पाहून आपण तर बुवा अगदीं तल्लीन होऊन गेलों ! तर घ्या हें बक्षीस. (म्हातारीस रुपये देतो. कांहीं खालीं पडतात तिकडे लक्षच देत नाहीं.) घ्या बरं.—

म्हातारी—(रुपये घेते.) देव आपलें भलें करो. सरकार दयाळू आहेत. ईश्वर आपणास व आपल्या प्रियेस उदंड आयुष्य देवो. (म्हातारी मुजरा करून चालती होते. जयंत आपल्याशींच मोठ्यानें हांसतो.)

जयंत—(आनंदानें) वाहवारे फकिऱ्या ! आज सकाळीं तूं कोणाचें तोंड पाहीलें होतेंस ? आज आम्हीं अगदीं मनोराज्यांत आहोंत. एक एक प्रकार पहावा तो विलक्षण ! आज रात्रीं आम्हांस कोणचें माशुक मिळणार आहे कोण जाणें ? कोणीही असेना ? फकिऱ्या लेका त्याची तुला कशास हावी पंचाईत ? तर चला आपण आणखी एक बार मारूं या ? होय त्या पात्रांतील मद्य आमच्या ह्या फुगाऱ्यांत गेल्याशिवाय आपणांस तर मुळीं चैनच पडायाचें नाहीं ! [पडद्यांत जातो.

प्रवेश ४ था.

[**स्थळः**—मागच्या प्रवेशाप्रमाणेंच. हातांत नागवी तरवार घेऊन पिराजीराव जामदार हळू हळू प्रवेश करितात.]

पिराजी—पहिल्यांदा गमजा लावल्या नी आतां आला आहे लेकाचा माफी मागायला ! माझी येथून श्रृंगारपुरास रवानगी करण्यांत ह्याच राजेश्रींचें



पिराजी—अरे, आमच्या घराण्यास, मोर्चेल दिवटी, व छत्रीचा मान आहे ? समजलास ! [पृष्ठ ७५

अंग असलें पाहिजे. पण बच्चा माझ्याशीं गांठ आहे! येरव्ही उगाच आमच्या कुळास मोर्चेल दिवटी व छत्रीचा मान मिळाला काय? आतां मी काय त्यास सोडणार आहे? (मिशीवर हात फिरवून) शेंदाड बच्चा, मला क्षमा करा म्हणून थापाथापी करून माझ्या हातांतून निसटून जावयास पाहतो आहे. एकदां फसलों म्हणून आणखी एकदां फसविण्यास पहातोस काय लेका! पण मी आतां तुला पुरा ओळखून आहें! बच्चाजी माझ्याशीं गांठ आहे! (इतक्यांत जयंत दारूचे पेले झोंकीत झोंकीत दाराबाहेर येतो.)

जयंत—(आश्चर्यानें स्वगत) वाहवा! हारे थेरडा येथें कोण? आतां आम्हांस लढायाचें आहे वाटतें? (पिराजीकडे नखशिखांत पहातो व हांसून) काय पण थाट आणि माट! वाहवारे इष्कीबाज बुड्ढेराव! आम्हांस तुमची अक्कड नीट तरी पाहूं द्या! तुमची ती गोलदार छाती, ती सांखळीदार गंध नी कमानदार भिंवया! वारे वा–बुड्ढी घोडी लाल लगाम! डोळ्यांत सुरमा आणि गळ्यांत कंठा घालून हा बेटा आला आहे येथें! (मोठ्यानें) कस्सें काय चंदनहौसी म्हातारे बाबा या! रामराम! आपण असे धापा कां बरं टाकितां? असे उभे कां? आपण कोणास शोधीत आहांत?

पिराजी—(तुच्छतेनें,) मला म्हातारा समजतोस? अरे चुकतोस रे बाबा! मला तुझ्यासारख्या अल्लड पोरांबरोबर बोलण्यास फुरसुद नाहीं. जयंतराव कोठे आहेत तें सांगशील काय? मला त्यांचीच गांठ घ्यावयाची आहे. (धांपा टाकितो.)

जयंत—(मोठ्यानें हांसतो) हां! हां! हां! म्हातारेबाबा, मी आपणांस आजोबा म्हणू कीं पणजोबा म्हणूं? (हांसतो) आपण खात्रीनें चष्मा घालायास विसरलांत. त्याशिवाय मी जयंतराव शिरके समोर उभा असून मला ओळखायास आपण खात्रीनें चुकलां नसतां. आपलें काय काम आहे? बोला आपलं नांव गांव?

पिराजी—(रागानें) अरे पोरा? माझी थट्टा आरंभली आहेस वाटतें! कदाचित् तूं पिराजीराव जामदारांस बरोबर ओळखलें नसशील! ऐक नीट. अरे आमच्या घराण्यास मोत्यांचा तुरा व पदकांचा हक्क असून, (मिशीवर पिळ देतो.) मोर्चेल, दिवटी, व छत्रीचा मान आहे? समजलास! बेट्या नीट अदबीनें वाग, नाहींतर मग पस्तावशील. (स्वगत) ह्या जयंतरावास मी हात दाखवीन

तरच नांवाचा पिराजी! (दांत ओंठ खाऊन) अरेरे, मला कसें पण अचानक श्रृंगारपुरास पाठवून दिलें व ह्या मूर्ख शिरोमणीस कैदेंतच ठेवावा म्हणून राणीनें आपल्या बापास लिहिलें? मजबरोबर असा दगा हं? आतां या जयंत्याचा सूड मीं केव्हां घेईन असें मला झालें आहे! (मोठ्यानें) अरे ए छाकट्या, जयंतराव कोठें आहे तें सांग?

जयंत—(थट्टेनें) काय म्हटलंत वृद्ध छेलबटावू?

पिराजी—(रागानें) बचा तोंड संभाळ! आम्हीं कांहीं असेंतसें नाहींत! आम्हांस मोर्चेल दिवटी व छत्रिचा मान आहे. तूं समजतोस काय?

जयंत—(हांसून) हं! हं! हं! अहो दिवटीवाले गृहस्थ! माझें जर ऐकाल तर दिवटी घेऊन मिरवण्यापेक्षां आपण अंधारांतून दिवटीशिवाय जाल तर बरें. कारण आपण कलफ लावितां हें तशानें गांवांतील तरूण स्त्रियांस समजणार तरी नाहीं! हां! हां! हां! (हांसतो.)

पिराजी—(रागानें) चूप. तोंड संभाळ. तूं म्हातारा कोणास म्हणतोस? अरे लाज लज्जा कांहीं तरी?

जयंत—(हांसून) ईश्वरानें आम्हांस डोळे दिले आहेत-अंध झाल्यावर मग आपणांस हवें असल्यास ज्वान मर्द म्हणू—

पिराजी—(स्वगत)अरेरे! ह्या वेड्यापिराबरोबर निरर्थक वेळ घालविण्यांत काय हांशील आहे? (मोठ्यानें)अरे ए, तो हरामखोर, दगलबाज, जयंत कोणीकडेस गेला त्याचा शोध केलाच पाहिजे! त्याच्यासारखा भित्रा मी कधींच पाहिला नसेल. भागूबाईसारखा आपल्या हुजऱ्याबरोबर (वेडावतो.) 'मला क्षमा करा' म्हणून निरोप पाठविण्यास त्यास लाज कशी नाहीं वाटली! अरे हरामखोरा जयंत्या?

जयंत—(रागानें) माझ्या तोंडावर मला शिव्या देणारा थेरडा तूं कोण? मला तूं भागूबाई म्हणतोस, तुझी छाती काय? चल, चल, हो तयार. होऊंदे आपले चार हात! माझेही हात अगदीं हुरहुरले आहेत. (तरवार म्यानांतून काढतो.) थेरड्या, मला तूं भागूबाई म्हणतोस, तुला खात्रीनें म्हातारचळ झाला आहे.

पिराजी—अहो, अहो, गरम रक्ताचे-तरणे बांड ! जरा हळू ! हळू ! मला तुमच्याबरोबर लढायाचें नाहीं. मला म्हातारचळ झालेला नाहीं. मला तो हलकट पाजी, जयंत्या पाहिजे—

जयंत—(रागानें पिराजीस गचांडी देऊन.) थेरड्या, तोंड आवरून धर. मला शिव्या देऊन मी त्या निमुटपणें ऐकून घेईन असें तुला वाटलें होतें काय ? हो पुढें ! डोळ्यांत सुरमा घालून व गळ्यांत कंठ्या अडकवून स्त्रियांस भुलविण्याचें काम करण्याऐवजी आतां थेरड्या तुला लढावें लागणार आहे समजलास!

पिराजी—(तरवार फिरवून) मी अशा हुलकावणीस भिणारा गडी नव्हे. अरे भल्या माणसा कदाचित् तुला ठाऊक नसेल आमच्या घराण्यास छत्री मोर्चेल व दिवटीचा मान होता. आतां बोलतां बोलतां तुला यमसदनास देतों पाठवून. मग मला त्या हरामखोर जयंत्याचा सूड उगविण्यास फारसा विलंब लागणार नाहीं !

जयंत—(रागानें तरवार उपसून) जयंत्यावर सूड घेणार? अरे मूर्खा थेरड्या मला मारल्यावर तुझे सारे पितर जरी खालीं उतरले तरी जयंत तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं. चल हो पुढें—

[जयंत पिराजीच्या अंगावर चालून जातो. त्यास गचांडी देतो व दोघेही लढत लढत पडद्यांत जातात.

प्रवेश ९ वा.

[**स्थळः**—मागल्या प्रवेशाप्रमाणेंच सिधोजीराव शिलेदारी पोषाखांत, विचार करीत हळू हळू प्रवेश करीतो. जेथें तेथें अस्ताव्यस्त पाहून आश्चर्यानें]

सिधोजी—हें रे काय येथें ? हा फाटका जोडा कोणाचा ? रायबा आहे कोणीकडे ? त्याला बजावून ठेविल्याप्रमाणें तो अजूनपर्यंत येथें कां बरें आला नाहीं ? येथें मला कांहींच तयारी दिसत नाहीं. मी येथेंच फराळ करावयास येणार म्हणून त्यास ताकिद केली होतीना ? (पडद्यांत डोकावून पहातो) अरे येथें सर्व काहीं अस्ताव्यस्त पडलें आहे चमत्कार म्हणायचा ! हे फराळाचे जिन्नस कोणी बरें खाऊन फस्त केले असतील? (कानोसा घेऊन) अरे हा बाहेर कसला आवाज होत आहे ? कोणी तरी लढत आहे वाटतें. मी रायबास इतके बजावून

सांगितलें तरी त्यानें माझ्या मनासारखा बेत जुळविला नाहीं. माझ्या गुप्त हेराकडून इतकें मला समजलें कीं पिराजीराव जामदारांस कांहीं गुप्त निरोप पाठविण्यांत आला आहे. साद्यास देखील पाळतीवर राहावयास सांगितलें आहे. पण तो बेटा पूर्वींप्रमाणें विश्वासू असेल काय ? मला त्याचा संशय येत आहे. जरा त्याच्याशीं वागतांना सावधगिरीनेंच वागलें पाहिजे. मी इतक्या कर्तबगारीनें केलेला माझा चक्रव्यूह न ढांसळो म्हणजे जिंकलें ! ("अरे, मेलों रे मेलों " असे शब्द पडद्यांतून ऐकूं येतात. सिधोजीराव एकदम चपापल्यासारखा होतो. समोरच्या बाजूनें पडद्यांतून हातांत रक्तानें भरलेली तरवार घेऊन, जयंत प्रवेश करितो.)

जयंत—(स्वगत) काय चमत्कार आहे ? ह्या थेरड्यानें मरतां-मरतांनां सुद्धां " याद राख जयंत्या, आतां जरी नाहीं तरी पुढल्या जन्मीं तुझा सूड घेईन," असें ओरडत ओरडत प्राण सोडला. ह्यांतील गूढ काय बरें असेल ? आमच्या कारस्थानी दादासाहेबांनीं हा नवा जयंतराव येथें कोण तयार केला असावा? त्याशिवाय ती म्हातारी, व हा गुलहौसी थेरडा कोणत्या जयंतास बरें शोधीत आले असतील ? हें काय गौडबंगाल आहे समजत नाहीं ! (इतक्यांत सिधोजीकडे पाहून चकित होतो.) काय दादा ? (डोळे चोळून पहातो.) होय दादासाहेबांचीच स्वारी ! कस्सं काय दादा आलांत का ? आपण होतां कोठें ?

सिधोजी—(विस्मित होऊन) कोण जयंत ? अरे जयंता तूं रे येथें कोठें ? आणि ही रक्तानें भरलेली तरवार घेऊन काय करीत होतास ?

जयंत—(हांसत) फार बरें झालें दादासाहेब. आपण पाठविलेल्या मोरकऱ्यांच्या सपाट्यांतून सुटलों. नाहींतर आपलीं कारस्थानें काय काय चाललीं आहेत याचा मला सुगावा तरी कसा लागला असता ? मीं येथें एकाएकीं येऊन आपल्या रंगांत भंग केलाना ? आपण कोणाचा तरी गळा कापण्याच्या विचारांत होतां वाटतें ? दादा, असे स्तब्ध कां झालांत ? आपले सर्व बेत मला अचानक समजले. मला येथून घालवून देऊन आपण ह्या मोहनपुरांत एक नवे जयंतराव तयार केले आहेत असा ठाम संशय आला आहे ! सांगा पाहूं ! दादासाहेब खरेंच काय ? (हांसतो.)

सिधोजी—(दांत ओंठ खाऊन स्वगत) ही मध्यें कसली व्याद आली? आमच्या पठाणांच्या सपाट्यांतून ही स्वारी निसटली कशी? अरेरे, घात झाला. (मोठ्यानें) कोण, जयंत? (हांसून) अरे जयंता? तूं केव्हां आलास?

जयंत—(हांसून) अहो दादा, आपण फारच कनवाळू दिसतां. त्याशिवाय मला रुपये पाठवून देऊन येथें माझ्या फराळाची इतकी छान व्यवस्था आपण केली नसती. आपण इतके दयाळू केव्हां झालांत दादा? बोला—

सिधोजी—(विचार करीत, स्वगत) अरेरे, घात झाला! सर्व बेत फसला! त्या हुजऱ्यानें रुपयांच्या थैल्या ह्याच्या स्वाधीन केल्या वाटतें! (मोठ्यानें) अरे जयंता, बाबा, त्या रुपयांचें काय केलेंस सांग पाहूं?

जयंत—(हांसून) सांगूं काय? बरें तर सांगतोंच. मला काय? (हांसतो.) अहो दादा, आम्हीं पडलों कर्जबाजारी, तरी तुमच्या पैशाचा चांगल्याच कार्याकडे उपयोग केला! (खिशांतील रुपये वाजवितो.) यांतील कांहीं रुपये माझ्या निराश झालेल्या सावकारांस दिले पाठवून. कारण ह्या गरजवारू सावकारांची दुवा घ्यावी असें आमच्या मनांत आलें. आणखी ऐकलंत काय? थोडेसे रुपडे त्या फटाकड्या मोहनेस दिले पाठवून. (डोळे मिचकावून) आमचें आहे आपलें तें जुनें वक्कल. (सिधोजी नाक मुरडतो.) तोंड असें वेडेंवाकडें काय करतां दादा? अहो ह्या वारांगनांची बरोबरी करणारा ह्या जगांत कोण आहे? दादा काय हो सांगू त्यांच्याखारखीं परोपकारी माणसें कोठेंच सांपडायाचीं नाहींत! तुमच्या आमच्यासारख्यांस तर असलीं पाखरें फारच उपयोगी! (हांसतो.) अहो खरें सांगायचें. त्यांत लाज कसची! (खिशांतील रुपये वाजवितो व नाचतो.) दादा आजच्या सारखी तर बुवा आपण मजवर कधींच मेहरबानी केली नव्हती! माझ्या फराळाची इतकी छान व्यवस्था व आणखी रूपयांची त्यावर दक्षणा! वाहवारे! (आठवल्यासारखें करून) होय बरी आठवण झाली. आमच्या करमणूकीसाठीं एक आवा आज मध्यानरात्रीं येथें पाठविण्याचा आपला विचार आहे वाटतें? पण कायहो, ती सुंदर व तरुण आहेना? नाहींतर, आपण पडलांत म्हातारे, कदाचित् एखादी वृद्ध आजीबाई येथें आली तर आपल्या मुलींच कामीं यावयाची नाहीं, म्हणून विचारतों!

(सिधोजी दचकल्यासारखें करितो.) काय दादा ? आपण कसला विचार चालविला आहे ?

सिधोजी—(आनंदानें) काय म्हणालास ? तुझी भेट घेण्यासाठीं येथें कोणी स्त्री येणार आहे ? (स्वगत) हें एक बरें झालें म्हणायचें. राणी रायबाच्या भेटीस आज रात्रीं येणार खास. आमचा सारा बेत येथपर्यंत तर अगदीं मनाप्रमाणें जुळला ! (मोठ्यानें) बरें जयंता, मग तूं त्या स्त्रीस काय निरोप पाठविलास ?

जयंत—(शंकित होऊन, स्वगत) अरे ह्यांत तुझा कांहीं तरी कावा आहे पण आतां मी खबरदार आहें. (हांसून मोठ्यानें) बेलाशक ये म्हणून म्हटलें. आपण तर तिला तृप्त करणार. पण दादा तो वृद्ध नटव्या मजबरोबर लढण्यासाठीं आपणच पाठविलांत काय ?

सिधोजी—(आश्चर्यानें) कोण ?

जयंत— मूर्ख रे मूर्ख ! मी लढण्यास सिद्ध नसतांनांही मजबरोबर कुरापत काढून व मला नाहीं नाहीं त्या शिव्या देऊन शेवटीं माझ्या ह्या तरवारीस (रक्तानें लाल झालेली तरवार दाखवितो.) व्यर्थरे, व्यर्थ बळी पडला ! या दादा असे. आपण कदाचित् त्यास ओळखत असाल. (सिधोजी व जयंत पडद्याजवळ जाऊन डोकाऊन पाहातात.)

सिधोजी—अरेरे ! हा तर आपला म्हातारा पिराजीराव जामदार? (स्वगत) हा म्हातारा येथें कसा आला बरें ? आमचा व्यूह अजून फिसकटला तर नाहींना ? (मोठ्यानें) कायरे जयंता ? हा तुजबरोबर कमजास्त कांहीं तरी बोलला काय ?

जयंत—(हांसून) मूर्ख चढेल थेरडा ! मरतां मरतां इतकेंच म्हणाला 'अरे जयंत्या ! जयंत्या ! मी ह्या भलत्याच हातांनीं जरी आज मरत आहें तरी देखील पुढच्या जन्मीं तुझा सूड उगविल्याशिवाय कदापि राहणार नाहीं' ! दादा ह्या तुमच्या वाड्यांत शुद्ध भुताटकीच्या खेळासारखे खेळ चालले आहेत. हें आहे तरी काय गौडबंगाल ? तुमच्या ह्या महालांत हा नवा जयंत कोण ? सांगा ! माझा निकाल लावून माझ्या ऐवजीं हा दुसरा जयंत कोण तयार केलात ? होय ! आपला हा सर्व कावा आला माझ्या लक्षांत ! हें आपण मांडलें आहे तरी काय ? आतां मात्र माझ्या हातांतून तुम्हास खास निसटतां येणार नाहीं. तुमच्यावर मी सूड उगवीन तरच नांवाचा जयंत ! आलें, आलें सारें माझ्या ध्यानांत ! आज

मध्यरात्रीस कोण्या स्त्रीस आपण येथें बोलाविलें आहे ? आपण कोणत्या तरी स्त्रीचा गळा कापण्याच्या विचारांत आहां खात्रीनें (आठवण केल्यासारखें करून,) होय, आठवण आहे मला. मागें देखील तुमच्या भेटीस मी आलों होतों तेव्हां कोणा तरी स्त्रीवर सूड उगविण्याच्या विचारांत आपण होतात. आणि त्यावेळीं माझी मदत मागत होता. मला आहे त्याचें स्मरण ! ह्या क्षणीं जें कांहीं असेल तें कबूल करा नाहीं तर प्राणांशीं गांठ आहे ! तुम्ही मला काय समजतां, दादा ?

सिधोजी—वेडारे वेडा ! भलताच संशय मनांत कशासाठीं आणतोस ? बाबारे, रुपये तूं घेतलेसना ? आतां आणखी काय पाहिजे ? आतां नीट जा कसा येथून. गांवांत फकिऱ्या आला आहे म्हणून हूल उठली आहे. उगाच जिवावर आणशील बाबा !

जयंत—(वेडावून) जा येथून ! होय जातों ! आणि दादा, माझ्या पाठीशी मारेकरी ठेवून माझा प्राण घेण्याचा आपण खुशाल बेत करा ! मला अगदीं पोर समजलांत ना ? (मिशीवर पीळ देतो.) चला ह्या मोहनपुरांत दुसरा कोण जयंत आपण तयार केला आहे तें मला आधीं कळूं द्या, मग माझ्या जाण्याचा विचार पाहूं ? दादा, आपण कोणाचा तरी घात करण्याच्या विचारांत आहां. पण माझ्याशीं गांठ आहे बरें ? आपलीं सारीं कृष्णकर्मे ह्या मोहनपुरांत उघडकीस आणीन तरच नांवाचा फकिऱ्या ! बंधुद्रोहाचें पातक करून आणखी विश्वासघात करून आपण कोणाचे गळे कापायास सिद्ध झालां आहां? आतां मी तुम्हांस हात दाखवितों. (बारींतून डोकावतो व मोठ्यानें) अहो शिपायी ! पाहरेकरी ! आत्तांच्या आत्तां आंत या–हो-हो–हो (टाळी वाजवितो.) कसें काय, दादा ? (सिधोजी भयानें गांगरून जातो.)

सिधोजी—(आपल्याशींच) ही पीडा कोठून आली कोण जाणें ? आतां जर का पहारेकऱ्यांनीं मला ओळखलें तर मात्र माझी पंचाईत होईल ! आतां येथें पळतांसुद्धां येत नाहीं. (हत्यारबंद शिपायी एकामागून एक येतात व जयंतास व सिधोजीस लवून मुजरे करितात.)

जयंत—(सिधोजीकडे बोट दाखवून) जमादार, ह्या चोरट्या म्हाताऱ्याच्या मुसक्या बांधून आत्तांच्या आत्तां त्यास चावडीवर घेऊन चला.

सिधोजी—(हात वर करून) खबरदार ! शिपायाच्या आधीं चोराच्या बोंबा. (जयंतास) चोर कोण ? तूं कीं मी ?

जयंत—(ऐटीनें उभा राहून) चूप! (शिपायी दोघांच्या तोंडांकडे आश्चर्यानें पहातात.)

सिधोजी—(जयंताकडे बोट दाखवून) हाच वरें चोर. आमच्या ह्या वाड्यांत चोरी करित असतांना आम्हीं त्यास पाहिलें !

जयंत—(शिपायांस) अरे असे पहातां काय? बांधा गुलामाला. चोर आणि शिरजोर ! (शिपायी एकमेकांच्या तोंडांकडे पहात तटस्थ उभे राहतात.)

जमादार—(आश्चर्यानें) आपण उभयतां तर दिसतां शिलेदार. चोर कोठें आहे? आम्हांस येथें बोलावलें कोणी? (जयंतास ओळखून) होय शिलेदार; आपणच वारींतून आम्हांस हाक मारिली.

जयंत—(ऐटीनें) मग समजत नाहीं–जास्त कशास बोलतां? चला ह्या थेरड्यास बांधून घेऊन चला.

सिधोजी—(पुढें होऊन) खबरदार, जमादार! हाच चोर. हातच्या कांकणास आरशी नको. त्याचा आंतील मळकट पोषाख दिसत नाहीं काय? ध्या ह्या हरामखोराचा झाडा. पहा ह्या चोरट्याचे खिसे कसे रूपायांनीं चिकार भरले आहेत !

(जयंत सिधोजीकडे रागानें पहातो. जमादार शिपायांस जयंतावर एकदम छापा घालण्यास इषारत करितो आपण खुद्द पाठीमागेंच राहातो. शिपायी लोक हलकेंच त्याची तरवार काढून घेतात व त्यास चतुर्भुज करितात. त्याचा झाडा घेतांना आंतील फाटका पोषाख व खिशांतील रुपये पाहून अगदीं चकित होऊन जातात. जयंत हिसकाहिसक करून सुटण्याचा प्रयत्न करितो व एक दोन शिपायांस पाडतो. परंतु त्याचें कांहींही चालत नाहीं.)

सिधोजी—अरे, हा तर बिलंद भामट्या दिसतो. पहा त्यानें आमच्या वाड्यांत शिरून, आमचा पोषाख चढवून, खिसे रुपायांनीं कसे लादले आहेत? बांधा त्याच्या मुसक्या—पाहतां काय?

जयंत—(दुःखी होऊन स्वगत) अरेरे, शेवटीं माझ्या ह्या फाटक्या पोषाखानेंच माझा घात केला! सांपडलोंच शेवटीं ह्या राक्षसांच्या तावडींत आतां माझा निभाव लागणें कठीण.

(शिपायी धक्क्या बुक्या मारीत जयंताच्या हातांत बिड्या ठोकतात. इतक्यांत जयंत जमादाराच्या अंगावर चालून जातो. जमादार भयानें पाठीमागें सरतो व खालीं पडतो.)

शिपाई—(अदबीनें सिधोजीस) शिलेदार, येथें आपल्या महालाच्या दाराजवळ एक मुडदा पडला आहे. कोणीतरी खून केला असला पाहिजे.

सिधोजी—तोच-तोच हा खुनी. पहा त्याची वस्त्रें कशीं रक्तानें भरलीं आहेत! (जयंताची तरवार हातांत घेऊन) पहा ही तरवार कशी रक्तानें लाल झाली आहे! (तरवारीकडे शिपायी व जमादार अजागळाप्रमाणें पहात उभे आहेत.) जमादार, ह्या चोराकडे नीट न्याहाळून पहा बरें ? मला वाटतें हा गांवांत पुंडाई माजविणारा फकिऱ्या भिल्ल तर नाहींना ? मला तसा संशय येत आहे. पहा. नीट सावधगिरीनें ह्यास कैदेंत ठेवा बरें. (शिपायी जयंतरावास धक्के मारीत घेऊन जातात. जयंत त्यांस हिसके देत आहे तोंच दुसऱ्या बाजूनें साद्या खिदमतगार हलक्या पायानीं येतो.)

साद्या—(स्वगत) अर हे रे काय आमच्या धाकल्या धनीसायबावर लचांड ? अखेर सिधोजीरावानं डाव साधला. पण लेका, मी हयात हाय तोंवर धनीसायबांचा बचाव करीन तरच नांवाचा साद्या. अरे मी असा तसा पठ्या नव्ह ! (जयंतास शिपायी ओढीत ओढीत नेतात. त्यांच्या मागोमाग सिधोजीच्या नजरेस पडल्याशिवाय साद्या लगबगीनें निघून जातो.)

सिधोजी—(आनंदानें) वाहवा! शेवटीं देव पावला. मधलें हें संकट अजिबात टळलें. उद्यां जयंताची वाट लागेलच काय चमत्कार आहे पहा, इतकीं अरिष्टें आलीं परंतु आम्ही आमच्या राणीसाठीं तयार केलेला चक्रव्यूह जशाचा तसा कायम राहिला ! सिधोजी लेका तूं नशीबवान खरा ! आज मध्यरात्रीस आमच्या रायबा हुजऱ्याच्या भेटीस ती येईलच. माझी अगदीं खात्री आहे. आतां ह्या मोहनपुरांत राणीचे मला धिंडवडे काढतां येतील. राणी ! राणी ! (हांसून, मिशीवर हात फिरवितो.) आज मजसारखा सुखी कोण आहे ? ह्या मोहनपुरची राणी अस्मादिकांच्या हुजऱ्याचें अंगवस्त्र हां! हां! हां! वाहवारे–

[आनंदानें नाचतो.


[पडदा पडतो.]

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

[स्थळ:—मोहनपुरांतील एक रस्ता. सिधोजींचा खिदमतगार साद्या फिरत फिरत चालला आहे.]

साद्या—(विचार करित) व्हय. त्यामंदी साद्या ल्योका तुझ्या बाच काय ग्येलरे ! व्हय व्हय साद्या नांवापरमानें जर तुला करनी करायची असेल तर ल्योका ये, बे, त्या थ्येरड्या सिधोजीरावाच्या हातावर तुरी न दुसर काय ? ह्यो जलाल थ्येरडा आपल्या भावाच्या कस्सापण हात धुवून पाठीस लागला है. त्यो मजसारख्या चाकुरड्या बराबर जास्त त्ये काय करनार ? अर तु धनी झालास, तुजबरोबर बैमान करूं न्हई म्हुन माझं मन मसी सांगतया. अन धनी होऊन-शेनी बेगुमान कावा करून जर लोकांच्या मुंड्या कापायला तयार झाला तर मी-बी कसाब होऊं ? छी ! छी !.! माझ मन सांगतया कीं साद्या अर तुझा बा कसा व्हता इमानी नी तुझी आई कशी नेकदार. अर त्येंचा लेक तूं नी असं बैमान व्हतोस ? (विचार केल्यासारखें करून) अन आमच मन अस बी बोलतिया—हा थेरडा सिधोजी हातावर साखर पेरून मानेवर कातर ठेवितोया. ह्येच्या बराबर इमान कसच ? असल्या सोद्याबराबर बैमान करन ह्यच इमान. न्हइ तर काय ? अरर आमच्या धाकल्या धनीसायबांच्या अजून बी हात धुवून पाठीस लागल्यास ? अर तूं भाऊ कीं दुष्मन् ? अन त्यांच्या हातापायांत बिड्या घालून अन शिपायांच्या हवाली क्येलंस तुला म्हनावं तरी काय ? अर ह्या दुनियेंत भावबंदकी कसली ? ज्यो उठला त्यो बसला गळ्यावर सुरी फिरवाया न काय ? लइ लई हलकट बस आपुन न्हई सिधोजीजवळ र्‍हानार ! व्हय त्यंची नोकरी सोडूनशेनी देनार ! आतां गाढीच्या साद्या—(मोठ्यानें) अर साद्या तूं साधू व्हो ल्योका अन दे ह्या खविसाच्या हातावर तुरी ! असंच कराव. झाला माझ ब्योत ! (विचार करितो.) आता हकड असा येल गमावून काम व्हनार ? आमच्या जयंतरावांना ते शिपुरडे कोतवालींत घेऊन ग्येलेवी. आतां त्यांना सोडवा-याची कायबी युगत केली पाहिजे ! चावडीवरच त्यो हवालदार बदाजी



राणी—देवा काय हा मजवर प्रसंग ! [पृष्ठ ८५

आपला हाय दोस्त. देऊ एक गांजाचा बार भरूनशेनी अन मंग धाकल्या धनी-सायबांस जाऊनशेनी भेटूं. बरं मग साद्या त्योका त्यना सोडवशील कसा ? (विचार करीतो व हांसतो) हां ! हां ! हां ! अर त्यामंदी काय हयर मोठं ? जयंतरावाची अन रायव्राची लयी हय दोस्ती मग अपुन बेगी बेगी जाउनशेनी जयंतरावाच्या हातचा कागुज रायव्रास देऊया ? ह्यो रायव्रा हकड मोटा सरदार वनलीया नी कायसा परतीनीधी झालाया. मग काय आमचा बेडा पार ! (नाचतो.) व्हय रायवाची मदत घेऊनशेनी आपुनाला धाकल्या धनीसायबांस सोडवायास काय पंचाईत पडणार न्हई. वरं मंग सिधोजी तुमच काय ? अवो धनीसाब— तुम्हीं ह्या पिर्थिमीचे संमंध-तुमच्याशी नको आमचा संबंध ! तर चला राम राम ! आतां साद्या चल व्ह पुढं. अन कर झटपट ! नी जयंतरावाना सोडवन्याची कर खटपट ! [लगवगीनें निघून जातो.

प्रवेश २ रा.

[स्थळः–राणीच्या महालासमोरील बाग. अंधारी रात्र. राणी काळें पातळ नेसून थंडीमुळें कुडकुडत चोरट्या पावलांनीं प्रवेश करिते.]

राणी—(दचकल्यासारखें करून) देवा, काय हा मजवर प्रसंग ! आज सर्वांची नजर चुकवून माझ्या महालांतून निघण्याचा मी निश्चय केला ! केवढें हें धारिष्ट ! (चोहोंकडे पहाते) इकडे तर अगदीं सामसूम दिसत आहे ! माझी दासी सुगंधी कशी अगदीं गाढ निद्रेंत होती. आणि वाड्यांतील पहारेकरी कसे अगदीं आपल्या जागेंत घोरत पडले होते. मेले आफिणबाज जसे. आजची अंधारी रात्र मला सुप्रसन्न झालेली दिसते. आतां मी येथपर्यंत सुखरूप आलें. पत्रांत लिहिलेल्या साऱ्या खुणानूखुणा मला पटल्या. मी वाट चुकूं नये म्हणून प्रियकरा, आपण मजसाठीं मुखवटा चढविलेला एक बहिरा व मुका खिदमतगार पाठविण्याचें लिहिलें आहे. काय तरी ही दरबारी मंडळीची खुबी ! मुकीं व बहिरीं माणसें ह्याजकरीतां वाटतें बाळगायाची ! मला आज तें पत्र आल्यापासून दिवसभर चैन नाहीं ! केव्हां मध्यान रात्र पडेल व मी माझ्या प्रियकरास संकटांतून दूर करीन असें मला होऊन गेलें आहे ! मी जर भेटीस आलें नाहीं तर माझ्या प्रियकराचा सर्वस्वी नाश होणार ! छे ! छे ! ! प्रिया तुमच्यासाठीं मी माझे

प्राणही देण्यास तयार आहे. मी येणार म्हणून प्रियकरा, त्या म्हातारीबरोबर आपणांस निरोप पाठवून आपली खात्री केली. (विचार करते.) आज मी ह्या मोहनपुरची राणी. मजसारखें थोर राजपद प्राप्त व्हावें म्हणून महत्त्वाकांक्षी लोक अहोरात्र खटपट करीत असतील. पण हेंच राणीपद मला विषतुल्य भासूं लागलें आहे! हायरे देवा! मी असा तुझा कोणता अपराध केला आहे कीं मला मध्यम स्थितींत जन्म देऊन आतां अशा दुःखांत लोटा-वेंस! अरेरे मला राणी कां केलेंस? मी आपल्या गरीब स्थितींतच जास्त सुखी होतें! मला श्रृंगारपुरची आठवण झाली म्हणजे कसेंसेंच होऊन जातें! प्रिया जयंतरावा, मध्यमस्थितींत जर मी असतें तर आपणांबरोबर सुखानें नांदतें! हाय! हाय!! ज्याप्रमाणें एखादा लोहचुंबक लोखंडास आपलेसंन्निध बळें ओढून पहातो, त्याप्रमाणें मी जरी राणीचें वैभव भोगीत आहे तरी देखील माझी पूर्वीची मध्यम स्थिति मला पूर्ववत् खालीं ओढण्यास पाहात आहे. हायरे देवा! (कपाळावर हात मारते.) सदोदित थरथरणाऱ्या उंच मनोऱ्याप्रमाणें माझी स्थिति होऊन गेली आहे. दर घडीस जमिनदोस्त होण्याच्या भीतीपेक्षां माझी पूर्वीची गरीबी हजार वाटेनें चांगली! माझ्या योग्यतेप्रमाणें मला ऐश्वर्य उपभोगितां येतें तर किती तरी बरें होतें? देवा, मजवर दया कर. ओढून ताणून चंद्रबळ आणून महाराजांवर प्रेम करण्याचा मी प्रयत्न करितें. परंतु माझा हा प्रियकर जयंत नजरेस पडला म्हणजे माझे सारे बेत ढांसळून जातात! (कपाळावर हात मारते.) आतां ईश्वरा, मी काय करूं? पुढें जें होईल तें होवो. मी आज माझ्या प्रियाची संकटांतून सुटका करणार. (बारांचा तास वांजतो.) अगबाई! (दचकते.) बारा वाजून गेले. मध्यान झाली. अजून तिकडून जा-सूद कां बरं आला नाहीं? (इतक्यांत तोंडावर काळा मुखवटा चढविलेला व दाढी लावून वेश पालटलेला असा सिधोजी खिदमतगाराच्या पोषाखानें हळू हळू प्रवेश करितो त्याजकडेस पाहून,) हा पहा संकेताप्रमाणें आलाच. (सिधोजी दुरूनच हातानें पाठीमागून येण्याविषयीं संकेत करितो. राणी हळू हळू त्याच्या पाठीमागून जाऊं लागते.)

राणी—ईश्वरा, तुजवर माझा सर्वस्वी भार आहे. माझ्या प्रियकरास दगा देऊं नकोस.

[सिधोजी व राणी पडद्यांत जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ:**–सिधोजींच्या वाड्यासमोरील रस्ता. साद्या वेश बदलून हातांत लखोटा घेऊन वाट पहात उभा आहे.]

साद्या—वाहवारे साधूजी ! तूं साधू खरा. काम कस्सं पण क्येलंस फत्ते ! अरे बदाजी हवालदार तूं लई नामी माणूस. तूं थत लेका पहाऱ्यावर जर नसतास तर आमची कामगिरी झालीच नसती. आमच्या धाकल्या धनीसायबासनी गाठलिया अन काय म्हंगता ? आमची मसलत बी लई लई ब्येस. आमचे जयंतरावांनीं लगेच कागुद लिवलीया. (लखोट्याकडे पाहून) अर इतका वेळ ह्यांत काय लिवलाया ? अर पन गाढीच्या साद्या, तुलारे कशास व्हावी पंचाइत ? या कागुजावर काय बर लिवलाया ? (लखोटा खालीं वर करितो.) अर बेट्या लखोट्या मजशी सांग तर गड्या ? (हांसतो.) अर एडारे एडा, अस कागुज बोलतुया की काय ? (हांसतो) अर लेका साद्या तुला लिवायास वाचायास येतं तर—मग काय मी इतका म्वोटा बाप्यामानुस झाल्या ते व्यर्थ ? थू ! थू ! माझ्या जिनगानीवर. अरे (समोर हात करून) माझ्यावानी जे म्वोटे बापेमाणूस होऊनशेनी ज्यांस लिवता वाचता येत न्हई त्यांच्याबी त्वोंडावर थू ! (विचार करून) बदाजी हवालदार वस्ताद ! मला त्योकाचा दाद देईना. मंग मीबी काय कमी वस्ताद ? चिलीम काढलीया आनी बस गांजाचा बार भरून बदाजीस घेतलाया वश करून. ह्यो आमचा रायबा म्वोटा अंमलदार झालाया. कायसा परतिनीधी बनलाया. (मोठ्यानें) अन म्वोटा हिंम्मतब्हादुर झालाया ? अर (विचार करितो.) पण ह्यो रायबा तर आमच्या सिधोजीरावाचा हुजऱ्या ? मग असं कसं रे झाले ? अर साद्या लेका तुला कशास व्हावारे पंचाइत ? अर झाला असेल म्वोटा आपल्या कर्तबगारीनें अनं काय ? काय लेका साद्या तुलाबी जर अक्कल असती तर तूंबी त्येच्यावानी दिवाना झाला असतास. (मिशीवर पीळ देतो.) बरं आमचं ह्ये स्वोंग ह्यो रायबा ओळखील कायरे ? न्हई. न्हई. 'हा लखोटा दुसऱ्या कोणावर इश्वासू नकोस. तूं. तूं स्वता दे. हाव असल्यास वेश बदल.' अशी धनीसायबांनीं ताकीद दिली त्यापरमाने तर आपुन केलाया. अनं बेगी बेगी रायबाच्या वाड्याजवळ येऊन ठेपलूया. आमच्या जयंतरावास्नी सोडवीन तवांच अन् घेईन म्हून शपथ घेतलीया. आज ह्यो रायबा कोठं बरं लवंडलाय ?

दारावरला पहारेकरी म्हंगला कीं परतिनीधी त्या कालभैरवाच्या देवळांत गेल्याती. मग अजून कां बरें नाहीं आला? (डोळ्यावर हात ठेवून पडद्यांत पहातो.) अरे ह्योरे कोन? (पुनः पाहिलेंसें करितो.) व्हय रायबाची सवारी—व्हय तर, बा साद्या व्ह पुढं चल व्ह पुढं. कर झटपट मुजरा परतिनिधीस अन द्यो हा लखुटा.

[लगबगीनें निघून जातो.

प्रवेश ४ था.

[**स्थळः**–रायबाचें शयनमंदिर. पलंग एका कोपऱ्यांत आहे. दिवा अंधुक टेबलावर असून कागदपत्रें लिहिण्याची सामुग्री तेथें पडली आहे. एके बाजूस कोच ठेविली आहे. दारासभोंवती पडदे सोडिले आहेत. इतक्यांत मोठ्या लगबगीनें रायबा आंत हुजऱ्याचा पोषाख परंतु वर काळा झगा घालून दारांतून प्रवेश करितो. आपला पटका टेबलावर ठेवून अगदीं दिव्याजवळ येऊन दिव्याच्या उजेडानें पत्र वाचतो.]

रायबा—(पत्र वाचतां वाचतां आश्चर्यानें) काय सही 'फकिऱ्या उर्फ जयंतराव सिधोजींचा कनिष्ठ बंधु?' (पुनः विचार करितो) हें काय गौडबंगाल? एकून आमच्या दोस्ताचें खरें नांव जयंतराव! व तो सिधोजीरावांचा बंधू! आलें सर्व माझ्या ध्यानांत! झाला सर्व गोष्टींचा खुलासा! यानें आपल्या ह्या सावत्र बंधूस छळून त्याच्याऐवजीं जयंतराव म्हणून ह्या दरबारांत माझी स्थापना केली व त्यास ठार करण्याचे सर्व बेत फसल्यामुळें आतां त्यास कैद केलें आहे. वाहवारे सिधोजी! तुजसारखा अधम कोणी नसेल! आपल्या मित्रास सोडविण्याच्या तयारीस लागलेंच पाहिजे. (टेबलावरून कागद घेऊन कांहीं लिहितो.) हा आमचा हुकूम किल्लेदारास पाठवून देऊन मित्राची सुटका केव्हां करीन असें मला झालें आहे. बरें झालें, फकिऱ्या, मला वेळेवर सर्व गोष्टी कळल्या. (पत्र पुनः वाचतो.) हा आणखी ताजाकलम काय लिहिला आहेः—"कोणा निरपराधी स्त्रीवर सिधोजी आज मध्यान रात्रीं "सूड उगविणार आहे तर मित्रा रायबा, त्या अबलेचें रक्षण कर आणि नंतर माझी "सुटका कर. एखाद्या निराश्रित स्त्रीचें रक्षण करणें तुझें कर्तव्य आहे. तुं शूर आहेस

"मीं फार काय लिहूं ?" वाहवारे शूर फकिऱ्या. कैदेंत असूनसुद्धां निराश्रित अबलेंचें रक्षण करण्याविषयीं इतका उत्सुक. धन्य आहे तुझी. सिधोजीचा बेत मी फिसकटविला हें ह्या बिचाऱ्यास काय माहीत ! माझा निरोप पिराजीस मिळालाच असेल. आतां राणी येथें कसची येणार म्हणा. (हांसतो.) सिधोजीराव, आपण मनांत मांडे खा खुशाल. आज रात्रीं तुमची माझी भेट झाली नाहीं म्हणून मजवर संतापला असाल. परंतु आपल्यासारख्या राक्षसाचें दर्शन घेण्याऐवजीं मीं आपला वेळ काळभैरवाच्या देवळांतच घालविला. घे बेट्या आतां राणीवर सूड ! तुझे सर्व पूर्वज जरीं खालीं उतरले तरी आतां तुला तें साधणार नाहीं. माझा हुजऱ्या विश्वासु आहे. त्यानें पिराजीस माझा निरोप दिलाच असेल. आमचे खुळे पिराजीराव जामदार राणीचा बचाव करण्यासाठीं हवें तें करतील. पहा माझ्या ह्या वाड्यांत किती तरी सामसुम आहे. मध्यरात्रीस सिधोजी संकेताप्रमाणें पुन: एकदां येथें येईलच. व त्याच्या हुकुमाप्रमाणें मी हा हुजऱ्याचा पोषाख चढवून हजर आहे. (झगा पाठीमागें सारून हुजऱ्याचा पोषाख दाखवितो.) ईश्वरा, तूं दयाळू आहेस. ह्या निष्ठुर सिधोजीच्या हातून आमच्या राणीसाहेबांचें रक्षण कर. त्या साध्वीवर माझें किती खरें प्रेम आहे तिच्या हात धुवून पाठीस लागलेल्या थेरड्यावर सूड केव्हां उगवीन असें मला झालें आहे. त्या नराधमाचा मी हुजऱ्या, हं? त्याची हांजी हांजी करून थुंकी झेलण्यापेक्षां मला मरण हजार वाटेनें पुरवेल ! (खिशांतून विषाची कुपी काढून) राणी, माझें तुजवर प्रेम आहे व म्हणूनच मी तुजकरितां प्राणत्याग करीन. (बाटलीकडे पाहात) हे माउली माझें हातून कोणतेंही दुष्कर्म होऊन राणीच्या अब्रूस धोंका पोंहचण्याचे आधीं माझें प्राणहरण कर. (कपाळावर हात मारून,) हायरे हाय ! ईश्वरा—राणीचें मजवर किती तरी प्रेम आहे. अरेरे ! अशा साध्वीच्या फजितीस म्यां कारणीभूत व्हावेंना ? असलें कृत्य मजकडून होऊं नये म्हणून देवा मला सुबुद्धि दे. माझ्या स्वामिणीचें रक्षण कर. काय मी हिंम्मतबहादूर प्रतिनिधि हद्दपार झालेल्या सिधोजीचा हुजऱ्या, शिव ! शिव ! (बाटलीकडे पाहून) असल्या मानहानीपेक्षां प्रिये ! मी खुषीनें माझ्या प्राणाची आहुती देणार. झाला, झाला माझा निश्चय—काय निष्कपट प्रेम तरी ! मजसारख्या हलक्या कुळांत जन्मलेल्या हुजऱ्यावर राणीनें आषक व्हावें ? नाहीं नाहीं. म्यांच अधमानें प्राणत्याग करून हे साध्वी, तुझें रक्षण

करावें हेंच माझें कर्तव्य आहे. (हातांतील विषाच्या कुपीकडे टक लावून पाहातों, तोंच काळें पातळ नेसलेली राणी घाबरलेली अशी आंत प्रवेश करिते. तिजकडे रायबा पाहातो; आपला झगा अंगाभोंवतीं गुंडाळून आंतील हुजऱ्याचा पोषाख लपवितो. विषाची कुपी पुनः आपल्या पट्टयांत ठेवितो.)

राणी—(हलकेंच पुढें जाऊन) जयंतराव-जयंतराव-प्रिया—

रायबा—अरेरे घात! घात झाला! शेवटीं गरीब बापडी राणी सांपळ्यांत सांपडलीं! (मोठ्यानें) कोण? राणीसाहेब? खरोखरच काय? राणीसाहेब?

राणी—(जवळ येऊन) जयंतराव असे आपण कां बरें घाबरतां? प्रिया, असं झालं तरी काय? संकेताप्रमाणें मी आपली गांठ घ्यावयास आलें आहे.

रायबा—(भीतीनें लटलटतो) राणीसाहेब, हें काय केलेंत, येथें माझ्या शयनमंदिरांत कां आलांत?

राणी—(आश्चर्यानें) पण तुम्हींच, तुम्हींच ना मला अगत्यानं इथं बोलावलं?

रायबा—केव्हां? कोणी? हें काय म्हणतां?

राणी—आपणच पत्र पाठविलंत—

रायबा—(विस्मित) मीं पत्र पाठविलें! छे. छे. असें कधींही होणार नाहीं.

राणी—असं काय म्हणतां बरं? आपल्याच हातचं पत्र पाठवून—

रायबा—(आश्चर्यानें) काय म्हणतां मी पत्र पाठविलें? राणीसाहेब क्षमा करा. आपणास भ्रम झाला असेल—

राणी—(चोळींतून पत्र काढते व पत्र देते.) वाचा. हेंच तें पत्र. (रायबा दिव्याजवळ जाऊन पत्र वाचतो. राणी इकडे तिकडे घाबरल्यासारखी पाहाते.)

रायबा—(वाचतो:-) " प्रिये, मजवर मोठा प्रसंग येऊन गुदरला आहे, " तर जिवलगे आज रात्रीं मला येऊन जरूर भेट. तूं स्वतः माझ्या भेटीस जर " आली नाहींस तर माझा सर्वस्वी घात होईल. तुला सुखरूप माझ्या रंगमहालांत " पोंहोंचविण्यास माझा विश्वासू मुका व बहिरा खिदमतगार मुखवटा घालून " राजवाड्यांत मध्यान रात्रीस येईल. तर लाडके, विलंब लावूं नकोस. तुझा प्रियकर, " जयंत " हायरे हाय! घात झाला. (कपाळावर हात मारून) शेवटीं मीं हरलों. माझे सर्व उपाय फसले!

राणी—(पत्राकडे बोट दाखवून)प्रिया, हें आपलेंच अक्षर–" तूं माझ्या भेटीस जर आली नाहींस तर माझा सर्वस्वी घात होईल." असें आपण लिहिलें असतां, आपणांस तसेंच संकटांत ठेवणं हें माझ्यानं कसं बरं होईल ?

रायबा—(आपल्याशींच) हायरे हाय दुर्दैवी रायबा, शेवटीं ह्या हरामखोरानें तुझ्याच अक्षरांनीं तुझा गळा कापला ! मला ह्या पत्रासंबंधानें कशी भुरळ पडली कोण जाणें ! अरेरे. (मोठ्यानें) राणीसाहेब, येथें धोका आहे. आपणांस कोणी तरी फसवून येथें आणलें आहे. आपण आलां तशा परत जा. मी तुम्हांस हात जोडून विनंति करितों, माझें ऐकाच—

राणी—प्रिया, आपण संकटांत असतांनां आपणांस तसेंच सोडून, मी येथून चालती होऊं ? छे, छे, माझा प्राण गेला तरी देखील हें होणार नाहीं.

रायबा—(काकूळतीनें) मला जास्त खुलासा करितां येत नाहीं. आपण अशाच परत आपल्या वाड्यांत जा. देवा, राणीचें रक्षण कर—

राणी—(आश्चर्यानें) आपण ही माझी व्यर्थ विटंबना काय मांडिली आहे ? प्रिया, मी इथं यावं कीं नाहीं ह्याची खात्री करण्यासाठीं मुद्दाम एका विश्वासू म्हातारीबरोबर आपणांस निरोप पाठविला व मी खुशाल यावं म्हणून आपला उलट निरोप मला पोंहोंचला. आतां असं काय म्हणतां ? मजवर एवढा रोष कां बरं ?

रायबा—(कपाळावर हात मारून) हें मी काय ऐकतों ? मला निरोप—सर्व खोटें–खोटें–यांत कांहीं तरी दगा–दगा–राणीसाहेब, ह्याच घटकेस आपण आल्या पावलांनीं परत जावें. त्यांतच आपला बचाव आहे. मी आपल्याला उलट निरोप पाठविला ? सर्व खोटें.—पाहिजे ती शपथ घेऊन सांगेन. मला ती म्हातारी मुळींच भेटली नाहीं व मी उलट निरोप पाठविलाहि नाहीं.

राणी—(गहींवरून) आपण मजपासून कांहीं तरी गुप्त ठेवितां ! पण प्रियकरा, मी साफ सांगते कीं जोंपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत ऐन संकटाच्या वेळीं मी कदापिही जाणार नाहीं. हाच माझा निश्चय.

रायबा—(स्वगत) काय विलक्षण प्रेम तरी ! मजसारखा धन्य कोण आहे ? परंतु मजसारखा अभागी तरी कोण आहे ? (मोठ्यानें,) राणीसरकार, मी सांगतो तें ऐका. अरे देवा कोण हा प्रसंग तरी—

राणी—मला इथं मुद्दाम बोलावून घालवून देतां. असें आपणांवर कोणतें संकट आलें आहे तें सांगा पाहूं ?

रायबा—जा–जा येथून, लवकर. मजवर जर आपलें खरोखर प्रेम असेल तर आलांत तशा जा. मी खरें सांगतों. मी तुम्हाला मुळींच बोलावलें नाहीं. आपण आज शत्रूंच्या सांपळ्यांत सांपडलों आहोंत? लाडके,–असें म्हटल्याबद्दल मला एकवार क्षमा कर, माझें तुजवर जिवापाड प्रेम आहे व म्हणूनच सांगतों कीं, तूं ह्या क्षणीं जा-जा ! येथें आपणास कोणच्या खिदमतगारानें आणलें, सांगा? या माझ्या शयनमंदिरांत आपण कोणाबरोबर आलांत?

राणी—आपला विश्वासु खिदमतगार! आपण पत्रांत लिहिल्याप्रमाणें तो राजवाड्याच्या बागेंत आला. मी त्याजबरोबर आलें. काळोखांत मला त्याचं तोंड दिसलं नाहीं. त्यानें मुखवटा तोंडावर चढविला होता. तो आपल्या दारापाशीं उभा असेलच (दाराकडे पाहाते, इतक्यांत दारांतून मुखवटा लाविलेला व काळा झगा घातलेला खिदमतगार प्रवेश करितो व पुढें येऊन)

मुखवटा—मींच, मींच राणीसाहेबांस येथें घेऊन आलों. (मुखवटा काढून) मला आपण ओळखलेंच असेल. (सिधोजी हांसतो, व त्यास पाहून राणीची भयानें गाळण होते. ती रायबाचा हात धरून उभी राहाते.)

रायबा—राणीसाहेब–जा,–जा, येथून. ह्या दुष्टाच्या सपाट्यांतून निघून जा एकदांच्या.

सिधोजी—(हांसून) पुरे! पुरे! राणी हें नांव आटोपलेंच आतां ! (मिशीला पीळ देतो व राणीकडे पाहून हांसतो.)

राणी—(भयानें गांगरून जाऊन) कोण सिधोजी?

सिधोजी—मीच वरं तो सिधोजी-(हांसून) कशी पण पकडली, त्याच्या अगदीं रंगमहालांत! (पलंगाकडे बोट दाखवितो) त्या त्या-(रायबाकडे पाहून) त्या माणसाचें तूं आजपासून प्रीतिपात्र आहेस–राणी ! (हांसतो) हं ! हं !! हं !!! (स्वगत) राणी? या माझ्या दिडदमडीच्या हुजऱ्याचें माशुक ! (हांसतो)

राणी—(दुःखानें) हाय ! हाय ! दगा, मजवर सूड उगविण्यासाठीं ह्या दुष्टानं हें कपटाचं जाळं पसरलं.

रायबा—(राणीस) जा येथून जा, आतां. सरकार, जा–येथून एकदम.

सिधोजी—(हांसून) राणीसाहेब, मोहनपुरच्या राणीसाहेबांचा अस्त झाला.

राणी—काय सिधोजी आपण हें काय मांडलें आहे ? मामासाहेब, आपण काय बोलतां ?

सिधोजी—(हांसून रायबाकडे बोट दाखवून) तोच तोच आतां तुझा राजा ! तोच तुझा जिवलग. आणि तूंच त्याची पट्टराणी. (हांसून) हां ! हां ! हां ! कस्सा पण जोडा शोभतो आहे. यंवरे यंव. (मोठ्यानें हांसतो.)

रायबा—(राणीस) देवा हा काय प्रसंग आणलास ? तरी राणीसाहेब आपणांस येथून जाण्याविषयीं आधींपासून मीं वजावलें. परंतु आपण माझें ऐकलें नाहीं.

सिधोजी—(हात वर करून व वेडावून मुजरा करितो.) राणसिरकारांस व प्रतिनिधींस आमचा मुजरा. आतां जास्त विलंब करूं नका सरकार, अजूनपर्यंत आपणां तिघांशिवाय हा प्रकार बाहेर समजलेला नाहीं. (वेडावून मुजरा करितो) राणीसरकार, आपण कशापण माझ्या तावडींत सांपडलांत ! आतां माझ्या सपाट्यांतून सुटण्याची आशाच नको. माझें वैर साधण्यास देवानें ही संधि दिली त्याबद्दल मीं त्याचा किती तरी ऋणी आहे. (हांसून) राणी—भरमध्यरात्रींस आमच्या ह्या प्रतिनिधि हिंम्मतबहादुरांच्या शयनमंदिरांत ! वाहवारे ! खाशी ! ! जयंतराव हिम्मतबहादुरांच्या बरोबर एकांतांत राणीसाहेब होत्या हें समजण्याची खोटी ? मग काय विचारतां ? ह्या मोहनपुरांत आपल्या अब्रूचे धिंडवडे निघतील. जेथें तेथें छिः थूः होऊन आमचे महाराज राणीसाहेबांचा उघड त्याग करितील. त्या बापड्यास काय त्याचें ? राणी असून नसून सारखीच ! हें पहा, राणीसाहेब, (हांसतो) प्राण जरी घेतलांत तरी मी आपलें गुह्य फोडणार नाहीं बरं. (खिशांतून कागद काढतो.) ह्या येवढ्या दस्तऐवजावर राणीसाहेब आपण फक्त सही शिक्का करा म्हणजे पुरे. मला जास्त कांहीं नको. मग खुशाल ह्या शहरांतून उभयतां ह्याच क्षणीं पोबारा करा. पाहिजे असल्यास निजामशाहींत जा. नाहीं तर उत्तर हिंदुस्थानांत जा. वेलाशक ! आपणांस चारी दिशा अगदीं मोकळ्या आहेत. व एकमेकांवर अगदीं जिवापाड प्रेम करा. आपणांस कोणती हरकत नाहीं. आपल्यासारख्या तरुण जोडप्यांस जगाशीं काय कर्तव्य आहे ? बस, प्रेम-प्रेम ! उठतां बसतां प्रेम ! (हांसतो.) राणीसाहेब ? हं ! हं ! हं ! (हांसतो.)

सर्व कांहीं सोई करून ठेविली आहे. बगीखान्यांतून गाड्यांची व्यवस्था करण्यांत आली आहे. अगदीं बेत असा करून ठेविला आहे कीं, पुसूंच नका. (हांसतो.) मात्र राणीसाहेब, सकाळ उजाडण्याच्या आंत हें मोहनपूर सोडून जा म्हणजे झालें. आपण कीं नाहीं, राणीसरकार माझ्या तावडींत अचानक सांपडलांत. आतां यांतून सुटणें अशक्य. हं तर आतां विलंब कां करीतां ? चला (राणीस पुढें येण्यास खुणावितो.) या पुढें ! घ्या घ्या ही लेखणी आणि करा ह्या दस्तऐवजावर आपला सहीशिक्का म्हणजे झालें आमचें काम. (लेखणी पुढें करितो.)

राणी—जगदंबे ! आतां कसं करूं ? मला ह्या संकटांतून तार. (भांबावल्यासारखी करिते व लेखणी सिधोजीजवळून घेते.) काय म्हणतां ? मी काय करूं ? (इकडेतिकडे वेड्यासारखी पहाते.)

सिधोजी—(रायबास हळूच) प्रतिनिधिसाहेब-हिम्मतबहादूर, आपणास आपलें प्रियपात्र मिळावें म्हणूनच तर हा सर्व खटाटोप चालला आहे. (डोळे मिचकावितो.) अगदीं आपल्या मनासारखें जुगवून दिलें आहे. (राणीस मोठ्यानें) चला बाईसाहेब, करा आपला सहीशिक्का आणि व्हा ह्या जंजाळांतून मोकळ्या.

राणी—(भीतीनें गांगरून जाते.) अगबाई ? मी काय करूं ?

सिधोजी—राणीसरकार. अशा घाबरतां कां ? जसें करावें तसें भरावें ! राणीचें वैभव कसलें घेऊन बसलांत ? चला हा पहा दस्तऐवज. (दस्तऐवज पुढें करितो. रायबा रागानें लाल होऊन जातो व दांतओंठ खात सिधोजीकडे पहातो.)

राणी—(कागद घ्यावयास जाते) काय ? हा कसला कागद आहे ? त्यावर काय लिहिलें आहे म्हणालांत ? मला बाई घेरी येते! हायरे देवा !

सिधोजी—(वेडावून मुजरा करितो.) राणीसाहेब ! असा उशीर करूं नका. सही करा आणि व्हा एकदांच्या मोकळ्या. हें जर आपणांस पत्करत नसेल तर मला एकदाचें तसें उघड उघड सांगा. होय, त्यांत आमचें काय जातें म्हणा. उद्यां पहांटेस ह्या मोहनपुरांत सर्व कांहीं समजलें म्हणजे आपली बेअब्रु होऊन धिंडका निघेल-तें जर पत्करत असेल तर तसें होऊंद्या. बापडें आमचें काय जातें त्यांत ? परंतु एकदांचा निकाल करून टाका म्हणजे झालें.

राणी—(कपाळावर हात मारिते.) हायरे देवा ! हें मी काय ऐकतें ? ह्या वेळीं मला मरण येतं तर फार चांगलं.

सिधोजी—(रायबाकडे बोट दाखवून) हे हेच हो आपले प्रियकर. आमचे हे जयंतराव कीं नाहीं मोठे थोर कुळांतले आहेत ! हां ! हां ! हां ! (मोठ्यानें हांसतो.) हे आमच्या राज्यांतील मोठे प्रतिनिधि आहेत. हे मोठे थोर पुरुष आहेत. आमच्या महाराजांची त्यांच्यापुढें काय बिशाद आहे म्हणा. यांस मोठा हिंमतबहादुर हा किताब मिळाला आहे—

रायबा—(रागानें पुढें येतो.) सरकार, हा थेरडा खोटें बोलत आहे. (आपला प्रतिनिधीचा झगा मागें सारून) हा पहा मी कोण आहे तो ? माझें नांव जयंतराव नाहीं. माझा जन्म थोरकुळांत झालेला नाहीं. माझें खरें नांव रायबा. मी ह्या दुष्ट थेरड्याचा हुजऱ्या आहे. सरकार–(खालीं मान घालून,) हा वृद्ध चांडाळ आपणांस खोटें सांगत आहे. (राणी चकित होऊन रायबाकडे पाहाते तीस,) होय सरकार, मी खरोखरच ह्या राक्षसाचा हुजऱ्या आहे. (राणीच्या हातांतील लेखणी घेऊन फेंकून देतो.) हं खबरदार, आपण त्या कागदावर सही काराल तर—

राणी—(भांबावल्याप्रमाणें करिते.) काय–जयंतराव, हें आपण काय म्हणतां ? आपण सिधोजीचे हुजरे ?

रायबा—(आपला झगा पाठीमागें सारून) होय. हा माझा पोषाख पहा. मी सिधोजींचा हुजऱ्या आहें.—

राणी—(कपाळावर हात मारून) अरे देवा, हें मी काय ऐकतें ? ह्या वेळेस मला धरित्री माता पोटांत घेईल तर किती बरें होईल ?

रायबा—(सिधोजीच्या अंगावर जाऊन रागानें) अरे हरामखोरा, मला आपल्या दुष्ट मसलतींत सामील होण्याकरितां लालचावीत होतास ना ? पण धिःक्कार असो तुला ! (राणीकडे बोट दाखवून) हजार सुंदर राण्या मला प्राप्त होण्याची जरी आशा असली तरी मी त्या सर्वांस झुगारून देऊन, ह्या माझ्या राणीचा बचाव करण्यास समर्थ आहे. आग लागो तुझ्या सरदारी घराण्यास. मला आपल्या सूड उगविण्याच्या बेतांत मी गैरसावध असतां मला गुरफटवून, आतां राणीसाहेबांस पेंचांत आणायास पहातोस ? अरे स्त्रीवर सूड उगविणाऱ्या नीचा, तुझा सरदार घराण्यांत जन्म होऊन व्यर्थ ! नीचा, आपल्या कनिष्ठ बंधूची संपत्ति लुटून त्याचा

घात केलास. त्यास मारण्यासाठीं मारेकरी ठेवून रानोमाळीं भटकावयास लाविलेंस. धिक्कार असो तुला ! अरे आतां त्यास कैदेंत ठेवून त्याचा प्राण घेण्याचा बेत केला आहेस. पण तें सर्व व्यर्थ होय. तुझ्या पापाचा घडा भरला म्हणून समज. अरे चांडाळा ! आपल्या भावाचा घात करून त्याचें नांव मला धारण करायास लाविलेंस. खरा जयंतराव कोण हें मला सारें समजून चुकलें आहे. (सिधोजीकडे दरडावून पाहातो.)

सिधोजी—(मोठ्यानें हांसून मुजरा करून,) राणीसाहेब, ह्यांनीं जें आपलें चरित्र आतां निवेदन केलें तें अगदीं शब्दशः खरें आहे. (रायबाकडे बोट दाखवून,) हा इसम माझा हुजऱ्या आहे समजलांत राणीसाहेब? (हांसतो.) व तोच आपला प्रियकर ! हं ! हं ! हं ! (हांसतो.) आपल्या त्या दासीबरोबर माझें लग्न लावून देणार होतांत त्याचें स्मरण आहे काय राणीसाहेब ? (मुजरा करितो व हांसतो. रायबास,) अरे हरामखोरा, तूं आणखी एक शब्द बोलशील तर खबरदार. पहा कसा पाहतो आहे ! (रायबा दांतओंठ खाऊन इकडे तिकडे त्वेशानें पहातो.)

राणी—(कपाळावर हात मारून) हायरे हाय, कोण माझी ही विटंबना?

सिधोजी—(राणीजवळ जाऊन तिला हालवितो.) अग ए पोरटे, राणी झालीस तेव्हां फारच शेफारली होतीस नव्हें काय ? (रायबाकडे पाहून) मी माझ्या हलकट चाकराच्या हुलकावणीस भिणारा नव्हे. आणखी एकदां याद देतो. ऐक ऐक नीट. (मिशीला पीळ देतो.) मला तूं हद्दपार करण्यास लाविलेंस त्याचें स्मरण आहे काय? आणि तुझ्या सुगंधी बटकीबरोबर मजसारख्या थोर सरदाराला लग्न करायास फर्माविलेंस. (मोठ्यानें हांसतो.) त्याचा हा मीं सूड उगाविला आहे. शेरास सवाशेर कोणी तरी भेटतोच, ऐकलेंस काय ? अग ए कारटे, माझा हा हलकट हुजऱ्या तुझा यार आहे ! आतां त्यास दिवाणकर. हवें तें कर. (रायबाकडे पाहून हांसतो.) तो तर तुजसाठीं अगदीं दिवाणा होऊन गेला आहे. अग ए पोरी ! तूं हलकट ती हलकट. तूं आपलें गुण शेवटीं उधळलेस तुला ह्या पदावर आणून बसविलें त्याचे हे उपकार फेडलेस. (इतक्यांत रायबा हलकेंच खोलीचें दार आंतून लावून घेतो व हलक्याच पायांनीं सिधोजींच्या मागें येऊन त्याची तरवार काढून घेतो व त्वेषानें)

रायबा—अरे नीचा, मी येथें हजर असतांना माझ्या राणीसाहेबांचा,

तूं कोण उपमर्द करणार ? तुला मी चांगलाच हात दाखवितों. चल ईश्वराचें शेवटचें नामस्मरण कर. (सिघोजीची भयानें गाळण होऊन जाते व तो पळावयास पहातो त्यास रायबा अडवितो,) अरे थेरड्या, आतां तूं माझ्या कचाट्यांतून कसचा सुटणार ? तुझीं आतां शंभर वर्षें भरलींच असें समज. (राणीस) राणीसाहेब ह्या चांडाळानें आपला अपमान केला. आपणांस व्यर्थ छळलें. हा विषारी साप आहे. ह्यानें माझाही फार छळ केला. तर त्यास प्रायश्चित्त मी देणारच. अरे अधमा, इतका वृद्ध झाला आहेस तरीदेखील तुझ्यांत दयेचा लवलेश सुद्धां नाहीं. तूं जीं पापें केलीं असशील त्याचा हिशेब देवाजवळ द्यावा लागेलच. पण माझ्या डोळ्यांदेखत देवतेसमान पवित्र जी राणी तिचा त्वां अपमान करावा आणि म्यां निमुटपणें तो ऐकून घ्यावा इतका मी नामर्द नाहीं. अरेरे ह्या निष्ठुर माणसाचा मी यःकश्चित् हुजऱ्या असून, माझ्या अंगीं त्यास सुळीं देण्याचें सामर्थ्य आहे. धन्य ! धन्य ! माझी !

राणी—(केंविलवाणीनें) मग काय तुम्हीं यास ठार करणार वाटतं ? मला याची कींव येते ! अहो, जाऊं द्या जयंतराव, याला क्षमा करा.

रायबा—(त्वेषानें) यास क्षमा ? या अधमास क्षमा करून महत्पाप करूं ? छे ! छे ! ! याला ठार करण्यांतच पुण्य आहे. (सिधोजीस गचांडी देऊन.) अरे चल. हो तयार नीचा—

सिधोजी--खून ! खून ! धांवा ! धांवा ! ! अरे नामर्दा, मला तुजबरोबर लढून तरी मरूं दे—

रायबा—(वेडावून) काय म्हणतोस ? अरे तूं मोठा सरदार. (हांसतो) हं ! हं ! हं ! आणि मी तुझा हलकट हुजऱ्या. तुझी माझी बरोबरी कशी होईल ? अरे मी तुजबरोबर लढणार ? छे मला तुझा खूनच केला पाहिजे ! तर चल हो पुढें (त्याची गर्दन पकडतो.) नीचा, हरामखोरा—

राणी—अहो, त्यास कृपा करून जिवदान द्या. दया करा.

रायबा—राणीसरकार आपली मी अवज्ञा करितों त्याबद्दल क्षमा असावी.

[जयंत सिधोजीस धक्के देतो. उभयतां हातघाईवर येतात. राणी मूर्च्छा येऊन पडते. सिधोजी व रायबा लढत पडद्यांत जातात. तरवारीचा आवाज होतो. 'मेलों, मेलों, अरेरे शेवटीं माझा, डाव फसला !' हे शब्द पडद्यांतून सिधोजीच्या तोंडून ऐकूं येतात.

प्रवेश ९ वा.

[**स्थळ**:-तेंच, राणी बेशुद्ध पडली आहे. जेथें तेथें अंधार आहे. तोंच कपडे रक्तानें भरलेले व हातीं नागवी तरवार असा रायबा प्रवेश करितो.]

रायबा—(त्वेषानें) जा, जा, थेरड्या, आपल्या बापदादांच्या भेटीस. 'शेवटीं डाव फसला' हे ह्या म्हाताऱ्याचे शेवटचे शब्द मला कस्सेपण अमृताप्रमाणें मधुर लागले! (राणी हळू हळूं सावध होते. तिजकडे जाऊन) राणीसाहेब, शेवटीं ह्या म्हातारड्यास यमसदनीं पाठवून तर दिलें. आतां विलंब न लावितां मला ह्या घटकेस कांहीं गोष्टींचा खुलासा आपल्यापाशीं करावयाचा आहे. तेवढा करून टाकतो म्हणजे झालें. आपलें जुनें वैर साधण्यासाठीं म्हणून ह्या वृद्ध सिधोजीनें आपणाविरुद्ध जो कपटव्यूह रचिला त्यांत त्यानें मला न कळवितां अचानक गुरफटवून घेतलें. आपणांस फसविण्याचें माझ्या ध्यानींमनींसुद्धां नसतांना मजकडून जें घडून आलें त्याबद्दल मी खरोखरच दिलगीर आहे पण मी निरपराधी आहे. मला क्षमा व्हावी. आतां आपलें रक्षण झालें आहें. मीं त्या दुष्ट सिधोजीचा सूड तर उगविलाच आहे. आतां मला मरण, बस मरण येईल तर बरें असें वाटू लागलें आहे. राणीसाहेब आज दोन दिवस मीं एखाद्या वेड्यासारखा आपलें रक्षण कसें करावें व ह्या दुष्टाच्या तांवडीत आपण कशा सांपडणार नाहींत ह्याच तजविजींत होतों. मी अगदींच वेडा होऊन गेलों होतों. (राणीपुढें हात जोडून,) राणीसाहेब, मी आपला गुन्हेगार आहें. मजवर दया करा. आपल्या मुखानें मजला क्षमा करा म्हणजे मीं सुखानें मरेन. हीच शेवटची विनंती. (गुडघे टेंकतो.)

राणी--(रागानें) मजबरोबर कपटानें वागणारावर मी दया करूं?

रायबा—(कमरेच्या पट्यांतील विषाची कुपी एकदम बाहेर काढून तोंडास लावितो.) आतां मी थोड्याच पळांत राम म्हणेन. तर राणीसरकार, माझी शेवटची प्रार्थना ऐका. (खिशांतून कागद काढून राणीस देतो) मी तर आतां मरेन परंतु आपण हा हुकूम किल्लेदारांस पाठवून या व माझा जिवलग मित्र जयंतराव-सिधोजीचा कनिष्ठ बंधु याची सुटका करा म्हणजे मी कृतकृत्य झालों. (खिशांतून

मित्रा न देतो.) हें पत्र वाचा म्हणजे आपणांस सर्व गोष्टींचा खुलासा होईल. तेच तराव शिरके. ह्या सिधोजीच्या सर्व मालमत्तेचे खरे वारस तेच. ांसच आपण आश्रय द्यावा. राणीसाहेब गुणग्राही आहेत. मीं फार काय खालीं पडतो व छातींत दुखल्यासारखें करून डोळे फिरवितो.)

राणी—(घाबरल्यासारखी त्याजकडेस पहाते) हें काय केलेंत ! जयंत-
–विष (रडूं लागते.)

रायबा—(पडूनच) माझ्या दुःखाचा शेवट केला. आतां हवें असल्यास णीसाहेब क्षमा करा वा नका करूं. देव आपलें भलें करो.

राणी—(भयानें कांपत कांपत) जयंतराव, प्रियकरा, हें आपण काय केलंत ?

यबा—(हलक्या आवाजानें) काय राणीसाहेबांनीं मला प्रियकर डते.

ी—(कपाळावर हात मारून) हें भलतंच काय केलंत ? प्रिया, ाय आत्महत्त्या ? प्रियकरा, तुम्हांस मी मनापासून क्षमा करितें. माझें म आहे, हें देखील प्रिया जयंतराव, मला कबूल करण्यास लाज !

यबा—(हलक्या स्वरानें) सरकार, आपण चुकतां ! मी—मी—जयंतराव ी आहें एक यःकश्चित् हुजऱ्या ! माझें नांव रायबा—

ाणी—(दुःखानें) तुम्हीं ह्यापेक्षां देखील जरी हजारपटीनं हलकट ळांत तरी मला पत्करलं. (त्याच्या गळ्यास मिठी मारते.) प्रियकरा, ा केली. हें काय भलतंच केलंत? खरोखरच विष—

ा—(पडल्या पडल्या राणीच्या डोक्यावर हात ठेवून) मी आतां होय, प्रिये, मीं ा घेतलें—अगदीं जालीम विष ! खरोखरच गेर. मी केवळ यःकश्चित् हुजऱ्या असून मला राणीच्या अंकावर आज हे ! धन्य ! न्य ! ! (डोळे फिरवून उचकी आल्यासारखें करितो.)

—(रडते) घात ! घात ! मजसारखी घातकी कोणीच नसेल. प्रिया, र आपणांस क्षमा केली असती तर असा प्रसंग कदापि आला नसता.

ायबा—(डोळे उघडतो व हळू हळू) तरी देखील मी विष प्राशन करून

आत्महत्त्या केली असती-हं(उचकी येते) येतों बरें आतां मीं ? माझ्या मित्राचा बचाव कर ! वचन दे (राणी वचन देते तिच्या हाताचें चुंबन घेऊन,) (एकदम दचकून उठतो व दाराकडे बोट दाखवून) राणि, राणी, त्याच आपल्या वाड्यांत मुकाट्यानें जा. तूं येथें आलीस हें, तो सिधोजी, मीं व कोणासही ठाऊक नाहीं. सारें गुप्त राहिल. येथें सर्व सामसूम आहे. आता गोष्ट विसरून जा. आपलें सर्व प्रेम महाराजांवर ठेव त्यांस सुखी कर व तूंहि हो ! (उचकी आल्यासारखें करून) म-महाराजांच्या वृत्तींत लवकरच बदल हो काळजी करूं नकोस. देवा, राणीचें रक्षण कर-(प्राण सोडतो)

राणी—(कपाळावर हात मारून,) रायबा, शेवटीं मला आपण गेलांतना? आंतां मी काय करूं? (रडते.) रायबा ! रायबा ! ! माझ्या घिसाव्या.

[त्याच्या आंगावर प

[पडदा पडतो.]

समाप्त.